# सुखाचा वेध

डॉ. श्री. द. देशमुख

प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ।।

– मुण्डकोपनिषद्

ॐ


श्रीकृपा प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | : | श्रीकृपा प्रकाशन,<br>२२७ अ गोकुळपेठ नागपूर. |
| मुद्रण | : | मुद्राशिल्प ऑफसेट<br>प्रिंटर्स, बजाजनगर, नागपूर |
| अक्षरजुळणी | : | डॉ. ज्योत्स्ना पाटणकर, रत्नागिरी. |
| प्रकाशन | : | आषाढ पौर्णिमा, (गुरूपौर्णिमा) शके१९३८<br>मंगळवार दिनांक१९ जुलै २०१६. |
| मूल्य | : | रु. ४०/- |
| लेखक | : | **डॉ. श्रीकृष्ण द देशमुख,**<br>मुरगुड , जिल्हा कोल्हापूर |



© श्रीकृपा प्रकाशन, नागपूर.



**www.shrikrupaprakashan.com**

।।श्री।।

# सुखाचा वेध

## अनुक्रमणिका


| क्र. | नाव | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ‘मी’ आणि स्वरूप ...! | १ |
| २ | मोक्षमार्गावरील प्रवास | ५ |
| ३ | आत्मशक्ती आणि दैव | १२ |
| ४ | स्वरूप अभंग संकीर्तन | १९ |
| ५ | पारमार्थिक यशाची गुरुकिल्ली | २४ |
| ६ | कल्पना | २८ |
| ७ | फसवा | ३२ |
| ८ | जीवाची पाच घरे | ३६ |
| ९ | संतवाङ्मयाची फलश्रुती | ३९ |
| १० | श्री मनाचे श्लोक | ४७ |
| ११ | तन्निष्ठस्य मोक्षोपदेशात् | ५३ |
| १२ | श्रवण | ६० |
| १३ | श्री दासबोधातील भक्तिमार्ग | ६९ |
| १४ | चंचळ-निश्चळाची संधी | ७४ |
| १५ | गती | ७७ |
| १६ | भक्तीची व्यथा | ८४ |
| १७ | विटेवरील समचरण दृष्टी | ९२ |
| १८ | सुखी भव | १०३ |




# ‘मी’ आणि स्वरूप ...!

‘स्वरूप पत्र मंजूषा’ या ग्रंथातील पत्र क्र. २६च्या आधारे आपण चिंतन करणार आहोत.

स्वरूपाचा वेध व शोध घेण्याचा प्रयत्न करताना असे लक्षात येते की, शोध घेणारा ‘मी’ हाच सुखरूप आत्मा आहे. सुखराशी, आनंदघन, सुखरूप हे समानार्थी शब्द आहेत. सुख हेच ज्याचे रूप आहे त्याला ‘सुखरूप’ म्हणतात. ‘मी’ सुखरूप असल्याने खरे तर मला सुखी होण्याची गरज पडू नये. पण सर्वांची तशी धडपड चालूच असते कारण त्यांना हे कळत नाही, त्यांच्या ते अनुभवात येत नाही.

आकार असलेल्या पदार्थाला रूप असते. शरीराला आकार असल्याने त्याला रूप आहे. ह्या रूपामध्ये पूर्णपणे व्यापून पण पूर्णपणे अलिप्त स्वरूप आहे. शरीरालाच उपाधी, क्षेत्र, देह, अध्यात्म इत्यादी शास्त्रीय नावे आहेत. ह्या उपाधीमध्ये गुप्तपणे चैतन्य म्हणजे स्वरूप व्यापून राहते.

**या उपाधीमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत।**
**तें तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।** ज्ञाने. २-१२६

स्वरूपालाच आत्मा, चिती, साक्षी, चैतन्य इत्यादी शास्त्रीय नावे आहेत.

वेदान्तशास्त्र व संत असे सांगतात की, सुखी होण्याचा सतत प्रयत्न करणारा जीव वास्तविक स्वत: सुखरूपच आहे. असे असताना सुखरूपाने स्वत:चा शोध घेणे कसे शक्य आहे? अज्ञानामुळे हे पारमार्थिक वास्तव लक्षात न आल्याने तो शोध चालूच राहतो. सुखरूप ‘मी’ भोवती माणूस अनेक भिंती उभारून स्वत:च्या सुखरूपतेला कोंडून ठेवतो. ह्या सर्व भिंती मिथ्या म्हणजे काल्पनिक आहेत. जे सत्‌विलक्षण व असत्‌विलक्षण असते त्याला मिथ्या म्हणतात. म्हणजे जे सत्‌च्या लक्षणांशी जुळत नाही व असत्‌च्या लक्षणांशीही जुळत नाही त्याला मिथ्या म्हणावे. तीनही काळात जे अबाधित असते त्याला सत् म्हणतात. जे कधीच अस्तित्वात नसते त्याला असत् म्हणतात. शरीर असे मिथ्या आहे. म्हणजे ते सत्य म्हणावे तर संतांनी त्याचा बाध केलेला असतो. असत्य म्हणावे तर अज्ञान्यांना

ते सत्य वाटते. शरीर मिथ्या असून शरीरात व्यापून राहणारा आत्मा सत्य आहे, असा संतांचा अनुभव असतो. अज्ञानी माणूस हरघडी मृत्यूचे दर्शन होत असूनही शरीर सत्य समजतो व आत्मा हा त्याच्या विचाराचा कधीच विषय नसतो.

शरीराचे स्थूल, सूक्ष्म व कारण असे तीन भाग शास्त्राने मानले आहेत. अस्थी व मांसाचे जे शरीर ते स्थूल शरीर असून अन्त:करण व प्राणांना मिळून सूक्ष्म शरीर म्हणतात. गाढ झोपेतील अवस्थेला कारण शरीर असे नाव आहे. हे शरीर म्हणजेच मी असे जो समजतो त्याला ह्या तीन शरीरांची दु:खे भोगावीच लागतात. जखमा, रोग, इ. 'स्थूल' शरीराची व संताप, मत्सर इ. 'सूक्ष्म' शरीराची दु:खे आहेत. झोपेत व्यत्यय येणे व त्यामुळे तळमळणे हे 'कारण' शरीराचे दु:ख आहे. ह्या तीन शरीरांच्या सुख दु:खांचा भोक्ता जीव असतो. तीन देहांच्या अतीत म्हणजे त्याहून वेगळा आत्मा सुखरूप असतो. तो खरा 'मी' असून देहरूप मी, व्यवसायरूप मी, नात्यांनी ठरणारा मी, यशस्वी किंवा अपयशस्वी असणारा मी इ. सर्व 'मी' जीवाशी संबद्ध आहेत. सोऽहं चा अर्थच असा होतो की, 'तो' आत्मा 'मी' आहे. प्रत्यक्ष व ब्रह्मरूप असलेला गणपती **'त्वं देहत्रयातीत:'** असे अथर्वशीर्ष सांगते. शास्त्रशुद्ध विचार व तदनुकूल असलेल्या संतांचा उपदेश लक्षात घेऊन विचार केला असता ह्या तीन देहरूप भिंती पाडता येतात.

भ्रामक जीवरूप 'मी'च्या भिंतीबरोबरच 'माझे'च्या कित्येक भिंती उभारल्या जाऊन आत्मदर्शनाची शक्यता अधिकाधिक कमी होत जाते. माता, पिता, कांता, भ्राता, कुळ, गोत्र, शत्रू, मित्र, घर, शेत, धर्म, पंथ, संस्कृती, ग्रंथ, देश, दैवत ह्या भिंतींच्या आड आपणच कोंडलेला आत्मा अनुभवाला येणे अशक्य होते. समर्थ म्हणतात –

**ऐसे मूर्ख अज्ञान जन। केलें संकल्पें बंधन।**
**शत्रू आपणांसि आपण। होऊन ठेला।।** दा. ८-७-३०

वरील सर्व बाबी प्रत्येकाच्या वाट्याला आलेल्याच असतात. जीवनाचा त्या भागच होऊन राहतात. परंतु त्यांचेवर माझेपणाचा अभिमान ठेवून त्यांच्या अनुसंधानात राहण्यामुळे बंधन निर्माण होते. त्यांचेविषयी अनुकूल, प्रतिकूल चिंतन बंधनात टाकते. त्यांचे संबंधातील ईर्षा, स्पर्धा, तुलना, मत्सर, द्वेष इत्यादी बंधनाला जबाबदार असतात. त्या त्या वेळी त्यांचा त्यांचा परामर्श घेऊन नंतर त्यांना हलकेच बाजूला सारले तर बंधन टळते.



माझे माझे म्हणणाऱ्याने 'माझे'च्या आधी असणाऱ्या 'मी'चा विचार केलेला असतो का? श्रीज्ञानदेव म्हणतात –

**तैसीं अहंममतेचिये लवडसवडी। मातें न पवतीचि बापुडीं।**
**म्हणोनि जन्ममरणाचेचि दुथडीं। डहुळितें ठेलीं।।** ज्ञाने. ९-६२

'मी आणि माझेच्या गोंधळात हे बिचारे गोंधळी माझ्या स्वरूपाला प्राप्त न होता जन्ममरणाच्या चक्रात सापडतात'. असे व्हावयास नको असेल तर 'मी'चा शोध घेऊन त्याचे खरे स्वरूप ओळखणे आवश्यक आहे. संत तुकोबा म्हणतात – **'मी हे ऐसी काय जाति। अवघड किती पाहता।।'** – 'मी'ची जात ओळखणे फार अवघड आहे. पण हे काम करावेच लागते. खातो, पितो, खेळतो, बोलतो इत्यादिकातील 'मी' हा जीवरूप आहे. माझ्यासारखा कोणी नाही, तुम्ही मला काय समजता? इत्यादी 'मी' अन्त:करणाच्या अहं वृत्तीचा आहे. आणि ह्या दोन्हीचे अधिष्ठान असलेला 'मी ' आत्मरूप आहे. शिवाय मागे म्हटल्याप्रमाणे मी गोरा हा वर्णाच्या संदर्भातील मी, मी उंच हा देहाच्या संदर्भातील मी इत्यादी अनेक मी जीवनात ये जा करतात. एक आत्मरूप मी सोडून इतर सर्व मी मूलत: जीवाच्या संदर्भातील आहेत. जीवाला जन्म, जरा, मरण व पुनर्जन्म असल्याने तो मायिक आहे. आत्मा अज, अजर व अमर असल्याने तो सत्य आहे. जीवाचे सर्व व्यवहार शरीराच्या माध्यमातून चालतात. शरीराला जन्मणे, वाढणे, मरणे इत्यादी सहा विकार असल्याने ते मायिक आहे. निर्विकार आत्माच सत्य असून तो खरा मी आहे. 'तोच तू आहेस' असे श्रीगुरू शिष्याला सांगतात. हा आत्मरूप 'मी' एकमेव व अद्वितीय असल्याने त्याला माझे, तुझे, त्याचे, इत्यादी दुसरे कोणी नसतात. जे असतात ते सर्व मायिक असतात. व्यवहारदृष्टीने पाहिले तरी ज्यांना आपण माझे माझे असे म्हणतो ते खरे तर त्यांचे त्यांचेच असतात. पती, पत्नी, आई, मुलगा, मुलगी, बहीण, भाऊ इत्यादी 'सख्खी' नाती सुद्धा हळूहळू विरळ होत जातात व शेवटी विलग होतात. प्रसंगा-प्रसंगाने एकत्र आले तरी विलगता हाच त्यांचा स्थायिभाव असतो. मृत्यू या सर्वांना कायमचे अलग करतो. कारणा-कारणाने वैर निर्माण झाले तर जिवंतपणीच काही नाती मेलेली असतात. हे लक्षात घेऊन जीवन जगले नाही तर समाधान बिघडते.

'मी ब्रह्म आहे', 'जग मिथ्या आहे' इत्यादी तत्त्वज्ञानाच्या अनुभवासाठी काही साधनेचे मार्ग स्वीकारावे व आपले समाधान जोडून घेऊन टिकवावे. असे म्हणून साधना करू लागले तर साधनेच्या निमित्ताने पुनःपुन्हा मी, ब्रह्म, जग, मिथ्यात्व ह्यांचेच बंड माजते. 'मी हे सर्व समजावून घेईनच' असे म्हणणाऱ्याचा मी आणखीच मजबूत होतो. भिंती पाडण्याऐवजी भिंतींचाच विचार जास्त होतो व त्यांची उंची, जाडी वाढतच जाते. वैऱ्याचा विचार विसरण्यासाठी त्याचाच अधिक विचार करावा तसे हे होते. कंसाचे व रावणाचे असेच झाले (त्यात त्यांचा लाभच झाला ही गोष्ट वेगळी!). एकेक भिंत पाडल्यावर, माझे-माझेतून सुटका करून घेतल्यानंतर व देहतादात्म्य विरळ झाल्यावर 'मी मुक्त' हे एक नवीनच बंधन तयार होते. हे बंधन एवढे सूक्ष्म व गोड असते की, त्यातून बाहेर पडावे असे वाटत नाही. उलट कोणीतरी आपल्या ऐवजी दुसऱ्या कोणाला मुक्त म्हटले तर आपले समाधान बिघडते.

श्रद्धा, तत्त्वज्ञान, साधना, व्रतवैकल्ये, वैराग्य इत्यादी सर्व साधने कृत्रिम असून ती करावी लागतात. आत्मस्वरूप कृत्रिम असून नित्यसिद्ध, नित्यप्राप्त, स्वयंवेद्य, स्वयंज्योती व वस्तुतंत्र आहे. असे आत्मस्वरूप कोणत्याही कृतीने अनुभवाला येत नाही. ते अनुभवाला न येण्याची कारणे दूर झाली की त्याचे ते अनुभवाला येते. '**विवृणुते तनुं स्वाम्**' असे त्यासंबंधी काठक श्रुती सांगते. ह्यालाच स्वामी '**घ्यावे तत्त्वता आकळोनि**' असे म्हणतात. असे झाले म्हणजे दिशांच्या मर्यादा नसलेले व्यापक व कालमर्यादा नसलेले अनादी, नित्य असे ब्रह्म अनुभवाला येते. ज्ञानचक्षू उघडल्यावर ज्ञानाचे नवे नवे उन्मेष येऊन समाधान वाढत राहते. मनाच्या उलाढाली थांबून दृष्टी जाईल तिकडे ते ब्रह्मच जणू दिसू लागते. शाश्वत स्वरूप ठाव न लागण्यासारखे आहे असा अनुभव येतो. म्हणजे ते अखंड व अनंत असल्याचे लक्षात येते. सर्वत्र आत्मभाव निर्माण होतो. पाच ज्ञानेंद्रियांचे विषय आत्मरूप होतात. जणू प्रत्येक विषयाच्या निमित्ताने आत्मा नव्यानेच प्रगट होतो. सर्व घडामोडी व कृती आत्मरूप होतात.

शेवटी श्रीस्वामी पत्र वाचकाला वरीलप्रमाणे सर्व घडून यावे असा आशीर्वाद देतात.

* * *



# मोक्षमार्गावरील प्रवास

'**बहुनाम् जन्मनाम् अन्ते ज्ञानवान् माम् प्रपद्यते**'(गीता ७-१९), '**जन्मान्तर सहस्रेषु योग कर्म समाधिभिः। नराणां क्षीणपापाणां कृष्णे भक्तिः प्रजायते।**'(श्रीभागवत), '**जन्मो जन्मी आम्ही बहू पुण्य केले**'(तुका.) '**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं। अनंत जन्मोनी पुण्य होय।**'(ज्ञा.हरि.२४-४) ह्यासारखी शास्त्र व संतवचने असे सुचवितात की, मोक्षमार्गावरील प्रवास फार फार प्रदीर्घ आहे. त्याचबरोबर ही वाटचाल वेगाने करावी असा आदेशही संत देतात. '**तरि झडझडोनी वाहिला निघ**', '**करावी तांतडी परमार्थाची**' ही ज्ञानदेव - तुकोबारायांची वचने साधकाला मोठीच प्रेरणा देतात. ह्यानंतर '**हेंचि देही हेंचि डोळां भोगू मुक्तीचा सोहळा**' (वि.सिं) अशी वचने पारमार्थिक महत्त्वाकांक्षा जागी करतात. शेवटी '**तुका म्हणे मुक्ति परिणली नोवरी। आता दिस चारी खेळीमेळीं**' ह्या अनुभवामध्ये ह्या प्रवासाची परिणती व्हावी हा आदर्शही संत पुढे ठेवतात.

मोक्ष हे एक धाम आहे किंवा तो एक प्रवास आहे असे गृहीत धरून उपनिषदामध्ये त्याच्या प्राप्तीचा किंवा वाटचालीचा आशीर्वाद दिलेला दिसतो.

**स मोदते मोदनीय९ हि लब्ध्वा**

**विवृत९ सद्म नचिकेतसं मन्ये।।** कठ १-२-१३

'आनंदरूप परब्रह्माचा अनुभव घेऊन मुक्त आनंदरूप होतो. ते मोक्षधाम तुझ्यासाठी उघडले आहे असे मी मानतो'. **सत्येन पन्था विततो देवयानः।।** (मुंडक ३-१-६)-'देवयान पन्थ सत्याने परिपूर्ण आहे'. ह्यामुळे मोक्ष हा प्राप्तव्य किंवा गन्तव्य आहे असे वाटते (मिळविण्यासारखा, जाण्यासारखा). हा मार्ग चालावयास अत्यंत बिकट असल्याचेही श्रुती सांगते.

**क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया।**

**दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति।।** कठ १-३-१४

'हा मोक्षमार्ग सुरीच्या तीक्ष्ण धारेप्रमाणे फार कठीण आहे असे विद्वान सांगतात'. मोक्षसाधनेला उपनिषदात सेतूचीही उपमा दिली असून जणू अलीकडे बंधन असून

साधनेच्या पुलावरून पलीकडील मोक्षाकडे जाणे सूचित केले आहे.

**तमेवैकं जानथ आत्मानमन्या**

**वाचो विमुञ्चथामृतस्यैष सेतु: ।।** मुंडक २-२-५

'त्या आत्म्यालाच जाणा. दुसऱ्या सर्व गोष्टी बोलणे सोडून द्या. हाच अमृताचा पूल आहे'. ह्या सर्वांबरोबरच मोक्षमार्ग हा पंथरहित मार्गावरील वाटचालीप्रमाणे आहे हे 'अनध्वग' या शब्दाने श्रुती सुचविते. 'अनध्वग' म्हणजे मार्ग. अध्वन म्हणजे मार्गावरून चालणारा. अनध्वग म्हणजे मार्गावरून न चालणारा. आकाशात फिरणाऱ्या पक्ष्याचा मार्ग, तो त्यावरून गेला असूनही दाखवता येत नाही. आत्मा स्वरूपाने स्वत:च प्रगट होत असल्याने त्याकडे जाणे संभवत नाही असेही श्रुती सांगते.

**यमेवैष वृणुते तेन लभ्य -**

**स्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ।।** मुंडक ३-२-३

'ज्याचा तो स्वीकार करतो त्याच्याकडूनच त्याची प्राप्ती होते'. म्हणजे तो त्याला स्वत:चे स्वरूप स्वत:च अनुभवाला आणून देतो. ब्रह्मज्ञानासाठी म्हणजे मोक्षासााठी 'ज्ञानाचा प्रसाद' अशीही भाषा श्रुतीमध्ये आहे.

**ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्व-**

**स्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमान: ।।** मुण्डक ३-१-८

'निर्मळ अंत:करणाचा साधक ते निरवयव तत्त्व ध्यानाच्या साह्याने, ज्ञानाच्या प्रसादाने पाहतो'.

एवढ्या अनेक प्रकारांनी मोक्ष किंवा आत्म्याच्या अनुभूतीचा विचार केल्यावर त्यातील सुसंगतीचा किंवा क्रमविकासाचा विचार करता येईल. मोक्षाचा मार्गच नाही येथपासून तो फार कठीण आहे येथपर्यंत श्रुतीची प्रमाणे आहेत. ज्ञान झाले पाहिजे व ज्ञान त्याचे तेच प्रगट होते अशा दोन्ही प्रकारे ज्ञानासंबंधी सांगितले जाते. नित्यप्राप्ताचीच प्राप्ती होते. साधना ही आत्मज्ञानाची झलक दाखवते पण ती ज्ञानाची कारक नाही. ज्ञान वस्तुतंत्र आहे, कर्तृतंत्र नाही. आत्मा हा प्राप्य, उत्पाद्य, संस्कार्य नाही. आत्मा स्वसंवेद्य आहे. गुण, जाती, क्रिया, संज्ञा व संबंध ह्या शब्दांच्या पाचही प्रवृत्ती आत्मज्ञानाला निरुपयोगी आहेत. '**यन्मनसा न मनुते**', '**यो बुद्धे:परतस्तु स:**'. आत्मानुभवकाळी '**चित्त चाकाटले**' हा



समर्थांचा अनुभव, '**तैसा विचारूनि अहंकारु सांडिजे। मग असतीचि वस्तु होईजे।**' हे ज्ञानदेवांचे सांगणे ह्या सर्वांवरून अंत:करणाला आत्मज्ञान होत नाही हेही निश्चित होते. असे असूनही शास्त्र व संतवाङ्मयात अन्त:करणाच्या ह्या चारी पदरांच्या मदतीची आत्मज्ञानासाठी केलेली अपेक्षाही स्पष्टपणे दिसते. हा सर्व गुंता सोडविल्याखेरीज विचारी व प्रामाणिक साधकाला 'वाटचाल' करता येणे महाकठीण आहे. 'शास्त्र व संतवाङ्मयात कर्म व उपासना ही केवळ मोक्षाला साह्यकारी असून साधनचतुष्टय, परोक्षज्ञान, श्रीगुरुकृपा व अपरोक्ष ज्ञान असा क्रम स्पष्टपणे सांगितला आहे.

कोठून तरी निघून कोठेतरी जाणे किंवा पोहोचणे हे माणसाच्या एवढे अंगवळणी पडले आहे की मोक्षाच्या संदर्भातही हाच विचार सहजपणे केला जातो. त्यामुळे 'बंधनाकडून मोक्षाकडे होणारा प्रवास' ही शब्दयोजना त्याला लगेच पटते. हे वास्तव गृहीत धरून शास्त्र व संत ती शब्दयोजना वापरतात. '**मना सज्जना भक्तिपंथेचि जावे**' ह्या बाळबोध शिकवणीमध्ये मार्गाचा स्पष्ट उल्लेख आहे. '**विमुक्तो मामुपैष्यसि**' (गीता ९-२८) 'मुक्त झाल्यावर माझ्याकडे येशील' ह्या शब्दात भगवान श्रीकृष्ण भक्ताशी बोलतात. येथेही येण्याची भाषा मार्गसूचक आहे. एकदा मार्गाची भाषा स्वीकारली की तो सुगम की दुर्गम हे सांगणे सोपे होते. नंतर तो दुर्गम का व कसा आहे हेही सांगता येते. तो सुगम कसा करून घ्यावा ह्याची युक्तीही सांगता येते. 'काही तरी केल्याशिवाय काही मिळत नाही' असा माणसाच्या दैनंदिन जीवनात सतत अनुभव आहे. येण्या-जाण्याप्रमाणेच मिळणे-घालविणे हाही जीवनाचा स्थायिभाव आहे. त्यामुळेच मोक्ष मिळविण्याचा पूर्वार्ध सहज कळतो. पंचज्ञानेंद्रिये व अंत:करणाच्या मदतीने दृश्य पदार्थाचे ज्ञान होण्याचा सहज सराव लहान वयापासून असल्याने त्यांच्याशिवाय आत्मज्ञान होऊ शकते हे पटत नाही व अशी एखादी वस्तू असू शकते ह्याची कल्पनाही करता येत नाही. म्हणून अंत:करणाची मदत घेऊन व पाच ज्ञानेंद्रियांना कामाला लावून सगुण ब्रह्माची उपासना सांगावी लागते. '**तू मन हे मीचि करी**', '**तुझे रूप चित्ती राहो**', '**मयि बुद्धिं निवेशय**', '**सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती**', '**कान ऐका हो तुम्ही नाम**' इत्यादी प्रकारे हे शक्य होते. हेच सगुण उपासनेचे रहस्य व माहात्म्य आहे. ह्या सर्व अनुसंधान, चिंतन किंवा

ध्यानाच्या पद्धती आहेत. सगुणाला निर्गुणाचे आलंबन म्हणतात. '**एतद् आलंबनं श्रेष्ठम्**' असे काठक श्रुती प्रणवाच्या बाबतीत म्हणते. हे सर्व लक्षात घेऊन '**सगुणाचेनि आधारे निर्गुण पाविजे निर्धारें**' असे समर्थ सांगतात. सगुणाला डोळे भरून पाहण्यासाठी रूप, नाम घेण्यासाठी व ऐकण्यासाठी वाणी व कान, चरणस्पर्शासाठी हात, तीर्थयात्रेसाठी पाय, तीर्थप्रसादासाठी जीभ, रंगून ऐकण्यासाठी व सांगण्यासाठी चरित्र व पराक्रम अशी अद्भुत सामग्री आहे. ह्या सगुणाच्या सहवासातून त्यावर अपार व निरपेक्ष प्रेम निर्माण झाले किंवा पूर्वसुकृताने ते प्रयत्नावाचून असले तर त्याच्याच कृपेने श्रीगुरूंचा लाभ होतो, संतांची संगत मिळते व नंतर समर्थांच्या वरील सांगण्याच्या '**सारासार विचारे संतसंगे**' ह्या उत्तरार्धाची व्यवस्था होते. '**ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते**'(गी. १०-१०) हे भगवद्वचन सार्थ होते. ह्या बुद्धियोगात सांख्य बुद्धीचा समावेश असून मोक्षमार्गावरील प्रवासाचा हा बुद्धियोग फार महत्त्वाचा जोडीदार आहे.

'जन्माला येणे' ह्या कर्मापासून 'मरणे' ह्या कर्मापर्यंत माणूस सतत कर्म करीतच असतो. '**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्**' (गीता ३-५) हे भगवद्वचन प्रसिद्धच आहे.

ह्या कर्मालाच उपासनेचा दर्जा देऊन उपासनेचे 'ज्ञान' हे फळ मिळविण्यास मदत होते. हा दर्जा देता यावा म्हणून कर्माचे पारमार्थिक तत्त्वज्ञान सांगितले गेले आहे. ह्या दर्जामुळे ते सर्व कुटुंब व समाजाला सुखकर होते ह्यात शंका नाही, पण हा त्याचा मुख्य हेतू नाही. साधकाने हे भान सतत सांभाळले पाहिजे. कुटुंब सहजच विस्कळीत होते. समाजाची व्याप्ती फार मोठी असून 'समाजमन' हेही फार फार विस्कळीत, चंचल, उथळ व बेभरवशाचे (Fickle) असते. ऐहिकता हा समाजमनाचा स्थायिभाव असून तो व्यक्तिगत स्तरावर क्वचित बदलला तरी सामूहिक स्तरावर बदलत नाही. म्हणून साधकाने कुटुंब व समाजाच्या संदर्भात खरोखरची जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडून आपली साधकाची भूमिका निष्ठापूर्वक सांभाळावी. सांप्रदायिक जबाबदारीविषयीसुद्धा हीच भूमिका हिताची आहे. कर्माला उपासनेचा दर्जा देण्यासाठी पुढील मार्गदर्शक तत्त्वे उपयोगी पडतात.

१) जगाची निर्मिती करण्याचे मुख्य कर्म ईश्वराचे आहे, माणूस हा त्या जगाचा घटक असल्याने त्याने केलेली कर्मे दुय्यम किंवा पोटकर्मे आहेत.



२) ईश्वर त्याचे जग सांभाळण्याचे काम प्रारब्ध ह्या तत्त्वाच्या माध्यमातून करतो. सर्व जीवसृष्टी प्रारब्धाधीन असून फक्त माणसाला मिळालेल्या क्रियमाण कर्मस्वातंत्र्याचा त्याने ईश्वरी आज्ञेनुसार उपयोग करावा. आज्ञेनुसार केलेल्या कर्माचा अहंकार होण्याची शक्यता कमी असते.

३) '**ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति**'(१८-६१) ह्या गीतावचनानुसार नियामक ईश्वर नियम्य जीवाच्या अंतःकरणात राहून त्याला प्रारब्धानुसार जीवन जगण्याची प्रेरणा वासनेच्या माध्यमातून देतो. त्याच ईश्वराच्या आज्ञेनुसार अशुभ वासनांचा त्याग करून शुभ वासनांनुसार जीवन जगण्याचे स्वातंत्र्य माणसाला आहे.

४) सर्व कर्मे शुभवासनानुसारी करून ती ईश्वरार्पण बुद्धीने केल्याने त्यांचा लेप न लागता ती चित्त शुद्ध करतात.

५) मी देवामुळे आहे, मी देवाचा आहे व मी देवच आहे असा विकास झाला असता कर्म व उपासना जणू एक होऊन बुद्धियोग मिळतो.

मोक्षमार्गावरील प्रवासाचा बुद्धियोग किंवा सांख्यबुद्धी हा शेवटचा भाग आहे. हा भाग चालून गेल्यावर आत्मानुभव आल्यावर हा भागही पुसून जातो. ज्या आत्म्याचा जणू पुन्हा अनुभव घ्यावयाचा आहे त्या अनुभवाचे मुख्य साधन आत्मचिंतन आहे. अनात्मचिंतन हा त्या चिंतनाचा पोटभाग आहे. दोन्ही मिळून आत्मानात्म विचार करावयाचा असतो. हा विचार करता करताच आत्मस्वरूप मोक्षाचे एक धाम किंवा मार्ग असणे कसे शक्य आहे, अशी शंका येऊ लागते.

**ह्या उपाधीमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत।**
**तें तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।** ज्ञाने. २-१२६

ह्या ओवीचा विचार करतांना देहरूप उपाधी अनात्म असून त्यात निरुपाधिक आत्मचैतन्य सर्वत्र व्यापून आहे व हे तत्त्व जाणणारे त्याच्याच अनुसंधानात असतात असे कळते. हाच विचार जगत् रूप अचेतन उपाधीच्या बाबतीतही खरा आहे.चेतन आत्म्याच्या सान्निध्याने अचेतन शरीर चेतन आहे असा भ्रम होतो. हा भ्रम दूर करताच शरीर व जग दोन्ही अचेतन व विनाशी आहेत, असा बोध होतो. चैतन्याचे अस्तित्व जाणीवरूपाने लक्षात येण्यास वेळ लागत

नाही. ह्या जाणिवेचे अशुद्ध व वृत्तिनिरपेक्ष शुद्ध असे दोन भाग वृत्तीमुळे आहेत. अशुद्ध जाणिवेच्या मदतीने शुद्ध जाणिवेचा म्हणजे आत्मचैतन्याचा अनुभव घेता येतो. ह्यासाठीच ध्यानाची एखादी प्रक्रिया उपयोगी पडते. जशी –

**यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञस्तद्यच्छेज्ज्ञान आत्मनि।**

**ज्ञानमात्मनि महति नियच्छेत्तद्यच्छेच्छान्त आत्मनि।।**कठ १-३-१३

– प्राज्ञ: वाक् मनसी यच्छेत् तत् ज्ञान आत्मनि यच्छेत्। ज्ञानम् महति आत्मनि नियच्छेत् तत् शान्त आत्मनि यच्छेत्।। बुद्धिमान साधकाने –

१) वाणीला मनामध्ये लीन करावे.

२) मनाला ज्ञानरूप बुद्धीमध्ये लीन करावे.

३) ज्ञानरूप बुद्धी महान आत्मस्वरूपात लीन करावी

४) व तो आत्मा शांत परमात्म्यात लीन करावा.

ह्या मंत्रामध्ये वाणी, मन, बुद्धी, जीव हे सर्व अनात्म असून त्यांना दूर केले असता आत्मानुभव येतो असे म्हटले आहे. वाणी म्हणजे वाणीचे व्यवहार, मनाचे संकल्प, बुद्धीचे निर्णय व जीव म्हणून असलेल्या ह्या सर्वांसह अस्तित्व, ह्यांचा निरास झाल्यावर उरतो तो शुद्ध जाणीवरूप आत्मा. हा आत्मा स्वसंवेद्य, नित्यसिद्ध, अनध्वग, वस्तुतंत्र, ज्ञप्तिमात्र, अंत:करणाच्या आवाक्यात न येणारा, स्वयंप्रकाश, साधकाला स्वत:च अनुभवरूप करणारा असा आहे. इतक्या प्रकारांनी त्याचा विचार करीत गेले असता सर्व धावपळ हळूहळू कमी होते. सातत्याने असा अभ्यास करण्यासाठी साधनचतुष्टय, वेदान्तचिन्तन, श्रीगुरुकृपा ह्यांची घेतलेली मदत किती मोलाची आहे ते त्यासह अभ्यास करीत गेल्यानेच कळते. ह्या मदतीवाचूनचा उथळ अभ्यास व ह्या अर्थासह त्याला येणारे गांभीर्य ह्यांतील फरक ज्याचा त्यालाच कळतो. महाविद्यालयात शिकविणे, चरितार्थ, हौस, पांडित्य, प्रतिष्ठा, छंद इत्यादी कारणांनी अभ्यास करणारे ‘किती जवळ, तरी किती दूर’ ह्या प्रकारात मोडतात. अर्थात ह्यांतीलही क्वचित कोणाला, मुमुक्षुत्व जागे होणे शक्य आहे मात्र त्यांनी ‘स्वत: कमाविलेल्या’ ज्ञानाचा अहंकार सोडून ज्ञानरूप श्रीगुरूंना सर्वभावाने शरण जाणे आवश्यक आहे.

सातत्याने चिंतन करण्यासाठी पुढील श्रुतिमंत्र नेटका असूनही अत्यंत अर्थपूर्ण आहे.



**यत्परं ब्रह्म सर्वात्मा विश्वस्यायतनं महत्।**

**सूक्ष्मात्सूक्ष्मतरं नित्यं स त्वमेव त्वमेव तत्।।** कैवल्य. १-१६

‘जे परब्रह्म सर्वांचा आत्मा, विश्वाचे अधिष्ठान, सूक्ष्माहून सूक्ष्म व नित्य आहे, तेच तू आहे, तेच तू आहेस!’

(काही अभ्यासू साधकांच्या आग्रहावरून प. पू. काकांकडून हा लेख मुद्दाम विषय देऊन लिहून घेतला आहे. प. पू. दयाळू श्रीगुरूंनी साधक शिष्यांची इच्छा या लेखाद्वारे पुरवली आहे. – संपादक)

* * *

## आत्मशक्ती आणि दैव

आत्मशक्तीने दैवावर मात करता येते का, ह्या प्रश्नातून 'आत्मशक्ती आणि दैव' हे शीर्षक तयार झाले. सर्वप्रथम ह्या प्रश्नातील सर्व शब्दांचा विचार केल्याशिवाय ह्याचे उत्तर मिळणार नाही. 'आत्मशक्ती केंद्र' अशासारख्या पाट्या वाचल्यावर ह्या जोडशब्दाविषयी बरेच कुतूहल जागे होते. काटेकोर शास्त्रदृष्टीने केलेला विचार व सामान्य जनमानसात रुजलेला व रुजवलेला विचार यांत फार मोठी तफावत पडते. या तफावतीमुळे अशा रुजलेल्या विचारातून निर्माण झालेल्या अवास्तव व अशास्त्रीय अपेक्षा व प्रत्यक्ष पदरात पडणारे फळ ह्यातही मोठी तफावत पडून आशा-निराशेच्या खेळात जीवन निघून जाते.

ज्यावर मात करावयाची त्या दैवाचे स्वरूप प्रथम विचारात घेऊ. दैव, प्राक्तन, प्रारब्ध, नशीब, ईश्वरेच्छा इ. शब्द दैवासाठी वापरले जातात. ह्यांतील 'प्रारब्ध' हा शास्त्रीय शब्द असून ईश्वरेच्छा हे त्याचे कारण आहे. 'प्रारब्ध अनिवार्य असते' व 'ईश्वरेच्छा बलीयसि' असे त्यासंबंधी दोन विचार आहेत. सजीव व निर्जीव अशा दोन प्रमुख घटकांच्या या सृष्टीचा कोणी निर्माता व नियामक आहे हे स्वीकारले तरच प्रारब्धाला शास्त्राचा दर्जा येतो. श्रद्धेने हे स्वीकारल्यावर त्याला तर्काची जोड देता येते. जसे कोणी, कोठे, कसे, केव्हा जन्माला यावे हे कोणाही व्यक्तीच्या स्वाधीन नसते, त्याचप्रमाणे कोणाला कोठे, कसे व केव्हा मरण यावे हेही स्वाधीन नसते. सिझेरिअन ऑपरेशनने जन्म व आत्महत्येने मरण हे दोन्ही विचारात घेऊनही हे वास्तव तसेच असते. मानवी जीवनाची ही दोन टोके जर माणसाच्या स्वाधीन नसतील तर त्या दोन टोकांमधील जीवन स्वाधीन आहे हे कशावरून ठरवावयाचे? येथेच दैववाद ( किंवा ) ही कल्पना अलगद समोर येते. दैववाद या शब्दात जो निष्क्रियतेचा, असाध्यतेचा व निराशेचा सूर आहे तो भारतीय प्रारब्धशास्त्राने कधीच स्वीकारलेला नाही. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' हा प्रारब्धशास्त्राचा विकृत अर्थ आहे. ह्या संदर्भात 'दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषं' हा महारथी कर्णाचा विचार भारतीय प्रारब्धशास्त्राला जवळचा आहे. भारताच्या हल्लीच्या परिस्थितीचे खापर भारतीय



तत्त्वज्ञानातून आलेल्या निष्क्रियतेवर व पर्यायाने दैववादावर फोडण्याची प्रवृत्ती दुर्दैवी आहे. भगवद्गीतेचा उद्गाता असलेल्या पूर्णपुरुष भगवान श्रीकृष्णाचे जीवन पाहूनही जर कोणी भारतीय तत्त्वज्ञानाला दैववादी म्हणत असेल तर त्याची कींवच करावी लागेल. न्याय, नीती व धर्माच्या भोळसट कल्पनांनी रणांगण सोडून भीक मागू पाहणाऱ्या अर्जुनाला कर्तव्यसन्मुख करणारे तत्त्वज्ञान दैववादी असणेच शक्य नाही. **'त्वं नियतं कर्म कुरु।'**(३-८), 'क**र्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।**'(२-४७), **'तस्मात् उत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय:'(२-३७)** ह्या तीन गीतावचनांत प्रारब्धाचे वर्म आहे. तू तुझे काम कर' ह्या गीतावचनावर श्रीज्ञानदेवांचे स्फूर्तिदायक भाष्य आहे.

**तैसे आपुलिया विहिता। उपायो असे न विसंबितां।**
**ऐसा कीजे की जगन्नाथा। आभारु पडे।।** १८-९१०

तू तुझे कर्तव्य जराही टाळाटाळ न करता असे कर की जगन्नियंत्याच्या मस्तकावर त्याचे ओझे व्हावे! येथे कर्माला प्रवृत्त करण्याचे (Motivate) एक आगळेवेगळे साधन सांगितले आहे. येथेच '**मा फलेषु कदाचन**' ह्या तत्त्वज्ञानाचा संदर्भ डोकावतो. कर्तव्य करणे व ते ईश्वराच्या कौतुकाला पात्र होण्यासाठी करणे ह्यांत प्रारब्धावर मात करण्याच्या कल्पनेची बीजे आहेत! '**ऐसा कीजे की**' ह्या तीन शब्दांत मोठी जादू आहे. टाळाटाळ, चुकवाचुकवी, टंगळमंगळ ह्या कर्तव्यासंबंधीच्या नकारात्मक बाजू आहेत. कर्तव्यासंबंधी पूर्ण ज्ञान, आवश्यक ते कौशल्य, नवे ज्ञान व कौशल्ये ह्यांचा स्वीकार, उत्साह, काम करतांना प्रसन्नता, कामाला नियोजित वेळ पूर्णपणे देणे ही सकारात्मक बाजू आहे. ह्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे काम करतांना ज्या माणसांशी संबंध येतो, त्या सर्व जगन्नाथाच्याच मूर्ती असल्याने त्यांना संतुष्ट केले पाहिजे.

**नारायेण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी।**
**या कारणें तोषवावी। कोणीतरी काया।।** दास.१५-९-२५

'ज्या जगन्नाथरूपी नारायणाच्या डोक्यावर ओझे चढावयाचे तो विश्वात भरून राहिलेला आहे, म्हणून त्या विश्वातील माणसांपैकी ज्यांचा संबंध येईल, त्यांना संतुष्ट करावे!' अशी संतवचने बोलकी आहेत.

आपले कर्तव्यकर्म वरील प्रकारे चोखपणे करीत असतांना त्याचे जे फळ

मिळते ते ईश्वराच्या योजनेनुसार जे मिळावयाचे ते मिळते. या योजनेलाच 'दैव' असे म्हणतात. ह्याने माणूस दैववादीही बनत नाही व दैवावर मात करण्याचीही भाषा बोलत नाही. 'दैवावर मात' या शब्दप्रयोगाचा 'प्रतिकूल परिस्थितीवर मात' असा व्यवहारात अर्थ केला जातो. आपले कर्तव्य अगदी चोख करीत असतानाही आकस्मिक व अनपेक्षित प्रतिकूल परिस्थिती निर्माण होत असल्याची हजारो उदाहरणे आहेत. खून, चोरी, दरोडे, अपघात, दंगे, रोगाच्या साथी, कर्करोग, अपमान, ईर्षा, स्पर्धा, मत्सर, द्वेष, भय, इत्यादिकांनी सुखाला प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते. ह्या दैवावर मात कशी व कशाने करावयाची? काश्मिर, नागालँड, त्रिपुरा, धर्मद्वेष इत्यादी भारतीय समस्यांचा प्रत्येकाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध येतो. त्यावर व्यक्ती कशी मात करणार? साम्राज्ये, उद्योजकांची घराणी, उद्योग, कुटुंब व व्यक्ती या सर्व स्तरांवर अवनतीचे दैव दिसते. रोमन, ब्रिटिश, अशोक, अकबर ह्यांची साम्राज्ये लयाला गेली. मोठे मोठे कारखाने बंद पडतात. घराण्यात एकच वाईट व्यक्ती (Black Sheep) जन्माला आली तर घराण्याचे दैव फिरते. अत्यंत उच्च स्तरावर गेलेली व्यक्ती अचानक घसरते. ह्या दैवावर मात कशी व कोण करणार?

'दैवावर मात करणे' ह्या शब्दप्रयोगात महत्त्वाकांक्षा दडलेली असते. महत्त्वाकांक्षेमागे ईर्षा, स्पर्धा, मत्सर, डावपेच, द्वेष, इत्यादींचा अलगद प्रवेश होतो. तुलना हा महत्त्वाकांक्षेचा स्थायिभाव असतो. या महत्त्वाकांक्षेला अशी विकृत वळणे लागत गेली की त्याने भ्रष्टाचाराला सुरुवात होते. दैवावर मात करण्याचे तेही एक साधन बनते! अगदी सामान्य विचार करणाऱ्यालासुद्धा असे लक्षात येते की, वरील कोणत्याही अपमार्गाला न जाता आपले कर्तव्य चोख केले तर यावयाचे ते फळ निश्चित येते. नियोजित फळापेक्षा अधिक फळ मिळविणे ही जर दैवावर मात करण्याची व्याख्या असेल तर ती दुर्दैवाला हाक ठरेल ह्यात शंका नाही. ईर्षा, स्पर्धादी प्रत्येक गोष्टीत मन अत्यंत अस्वस्थ राहते, संशयी बनते. दैवावर मात केल्याचे हे लक्षण आहे काय?

ज्या आत्मशक्तीने दैवावर मात करावयाची भाषा केली जाते तिचे स्वरूप आता पाहू. आत्मशक्ती म्हणजे आत्म्याची शक्ती असा अर्थ केला तर तो परमार्थशास्त्राच्या विरोधी होतो. आत्मशक्ती म्हणजे स्वत:ची शक्ती असा अर्थ



केला तर स्वत:ची म्हणजे नेमकी कोणाची हे समजावून घ्यावे लागेल. प्रकृती, अविद्या, माया, शक्ती इत्यादी मायेच्या अभिव्यक्तीचे आत्मा हे अधिष्ठान आहे. म्हणजे त्याच्या सत्तेवर त्यांचे कार्य चालते. केवळ आत्मा व केवळ शक्ती स्वतंत्रपणे काही करू शकत नाहीत. आत्मा शक्तीचा कधीच उपयोग करीत नाही, कारण तो स्वरूपाने निष्क्रिय आहे! म्हणून आत्मशक्तीच्या अशा व्याख्येने दैवावर मात करता येणार नाही. केवळ शक्ती परतंत्र असल्याने तीही दैवावर मात करणार नाही. आत्म्याच्या किंवा ब्रह्माच्या अधिष्ठानावर असणारी शक्ती अप्रसिद्धपणे किंवा निरंकुशपणे ईश्वर नावाच्या तत्त्वाच्या स्वाधीन राहते व अल्पप्रमाणात जीवाच्या (आपण सगळे!) स्वाधीन राहते. ईश्वर नियामक असून जीव नियम्य आहे.

**ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेर्जुन तिष्ठति।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया।।** १८-६१

असे गीता सांगते. म्हणून आत्मशक्ती ह्या शब्दाचा 'स्वत:ची शक्ती असा अर्थ केल्यावर 'जीवाची शक्ती' असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो. (जीव म्हणजे काय हा शास्त्रीय विचार ह्या लेखाच्या उद्देशाच्या मर्यादेत न केलेला बरा.) जीवसुद्धा केवळ जीवनरूपाने शक्तीचा वापर न करता त्याच्या शरीरातील साधनांच्या आधाराने ती वापरतो. उदा. - हात, पाय. डोळे, कान, मन, बुद्धी, चित्त इ.

जीवाला शक्ती वापरावयाला किती मर्यादा आहेत ते सतत अनुभवाला येते. दैवाने जी कमाल शक्ती दिलेली असते ती विक्रम मोडण्यासाठी कमी पडल्यामुळे खेळाडू बेकायदा उत्तेजक द्रव्ये वापरून नंतर स्वत:ची फजिती करून घेतात! ह्याला दैवावरील मात म्हणावे काय? वर्ग, शिकवणी व घर ह्यांत कितीही अभ्यास केला व सर्व सुखसोई पुरवूनही परीक्षेत उत्तर लिहिता येत नाही म्हणून कॉपी करणे हीच दैवावरील मात म्हणावी का? माणसातील बुद्धीचे प्रचंड सामर्थ्य असलेल्या वैज्ञानिकांना पृथ्वीवर उपलब्ध असलेली सामग्री वापरल्याशिवाय एकही पदार्थ तयार करता येत नाही. केवळ इच्छेने किंवा संकल्पाने मातीचा कणही त्यांना उत्पन्न करता येत नाही! त्यांनी शुक्रतंतू व स्त्रीबीज निर्माण करण्याचा जरी महान पराक्रम पुढे केव्हातरी केला तरी त्यासाठी उपलब्ध सामग्रीच वापरावी लागेल. दैवाने घातलेल्या ह्या मर्यादेवर कशी मात करणार? उतारवयात सर्व इंद्रियांची

शक्ती क्षीण होते. चष्मा, श्रवणयंत्र, पेसमेकर इ. वापरूनही क्षीणता वाढतच जाते. मरण्याची इच्छा नसून मरावे लागते! उसने अवसानही टिकत नाही.

ह्या ठिकाणी काही पारमार्थिक संकल्पना स्पष्ट करून घेणे आवश्यक आहे. त्या पुढीलप्रमाणे -

जीव = आनंद-आत्मा (कूटस्थ चैतन्य), बुद्धी व बुद्धीत पडलेला किंवा फाकलेला आत्मप्रकाश (चिदाभास). ह्या तिन्हींना मिळून जीव असे समजावे.

१) आत्मा - ज्ञानप्रकाश, स्वयंप्रकाश, नित्य आहे.

२) बुद्धी - तेजतत्त्व व सत्त्वगुण ह्यांपासून तयार झालेले स्वच्छ तत्त्व आहे. ह्यात आत्मप्रकाश घेण्याची क्षमता असून ते देहभर व्यापून राहणारे आहे.

३) चिदाभास - बुद्धिसापेक्ष आत्मा. हा बुद्धी लीन होताच आत्मरूप होतो व तत्त्वज्ञानाने बाधित होतो.

ईश्वर ही ब्रह्माची उपाधी आहे. अनंत विश्वे त्या व्यापक ब्रह्माच्या एकाच अंशात सामावलेली असून त्या विश्वापलीकडे ते अनंत अपार भरून आहे. ही उपाधी असलेल्या ब्रह्माला 'ईश्वर' म्हणतात. हे ब्रह्म जेव्हा शरीरात व्यापून राहते तेव्हा त्यालाच आत्मा म्हणतात. हा आत्मा जेव्हा बुद्धीशी एकरूप होतो व 'मी देह' या निश्चयाने राहतो तेव्हा त्यास जीव म्हणतात. या विश्वाचा ईश्वर नियामक असून जीव नियम्य आहे. जीवाने केलेल्या कर्माचे योग्य ते फल, योग्य प्रकारे व योग्य वेळी देण्याची जी व्यवस्था आहे, ती ईश्वराकडून होते. वास्तविक जीव, ईश व ब्रह्म एक असूनही उपाधीमुळे त्यांस अनुक्रमे अल्पज्ञत्व व सर्वज्ञत्व ब्रह्माच्या अधिष्ठानावर येते. ईश्वर हा स्वत: काही करीत नसूनही त्याच्या मायाशक्तीने जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे सुखदु:ख होते आणि हे काम ईश्वरामार्फत होते, अशी शास्त्रव्यवस्था आहे. यामुळे याचा विवेक जागविला पाहिजे. याकरिता ब्रह्म, ईश्वर, जीव यांचे परस्परसंबंध कसे आहेत याचा श्रद्धेने गुरुसान्निध्यात विचार करावा, कारण ब्रह्माचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे. ते कळण्यासाठी विवेक करण्याची शक्ती साधनाने कमाविणे आवश्यक आहे.

ब्रह्म - **'यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति यत् प्रयन्त्यभिसंविशन्ति।'** - जडजीव संदर्भ (ऐ. ३-१).

प्राप्तीचे साधन - **'नैव वाचा न मनसा प्राप्तुं शक्यो न चक्षुषा। अस्तीति ब्रूवतोऽन्यत्र कथं तदुपलभ्यते।।'** कठ २-३-१२.

ब्रह्मज्ञानाचे अधिकारी साधक - **'यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिता:। अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते।।'** कठ २-३-१४



सत्त्वादी किंवा निर्भयत्वादी गुण नसलेले निराकार अवयवशून्य, शुद्ध जाणीवरूप, सत् चित् आनंद असे ब्रह्म कळत नाही पण ते आहे. जे कळते ते नाही!

ब्रह्माच्या अधिष्ठानावर ईश्वराच्या योजनेनुसार जीव जगतामध्ये जन्माला येतो. जीवाला मिळणारे प्रारब्धाचे सुखदु:ख भोग जगातून मिळतात व ईश्वरी योजनेनुसार मिळतात. प्रारब्ध ही ईश्वराची जगताच्या व्यवस्थापनाची व्यवस्था आहे. ती व्यवस्था निर्दोष व अनिवार्य आहे. ईश्वराची उपासना करणाऱ्या जीवाने ईश्वराला शरण जाण्याची अपेक्षा आहे. त्या शरणागतीचा एक भाग म्हणून ईश्वरी व्यवस्था विनातक्रार मान्य करावी अणि **'ठेविले अनंते तैसेचि राहावे। चित्तीं असो द्यावे समाधान।।'**(तुका.), **'जैसी स्थिती आहे तैशापरि राहे। कौतुक तूं पाहे। संचिताचें।।'**(तुका.), **'माळियें जेऊतें नेलें। तेऊतें निवांतचि गेले। तया पाणिया ऐसें केलें। होआवें गा।'**(ज्ञाने. १२-१२०) असे राहावे. प्रारब्ध सुखदु:खाचे भोग माणसापर्यंत आणून भिडविण्याचे काम करते, म्हणजे सुखदु:खाची कारणे किंवा निमित्ते त्याच्यापर्यंत पोहोचवते. परंतु माणसाने त्यामुळे सुखी किंवा दु:खी झालेच पाहिजे अशी सक्ती त्याला करता येत नाही - **'सुखीं संतोषा न यावें। दु:खीं विषादा न भजावे।'**(ज्ञाने. २-२२६). शरणागतीचा दुसरा भाग म्हणून त्याने त्याची कर्तव्ये ईश्वराची आज्ञा आहे म्हणून व तो प्रसन्न व्हावा म्हणून करावी. त्याला त्याचे नियोजित फळ मिळतेच मिळते. ते मागावे लागत नाही.

असे कर्म व उपासना केल्यावर चित्त शुद्ध, शांत होऊन श्रीगुरूकृपेने 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव येतो. शरीर व जगाचे संदर्भ कमीत कमी झाल्याने जगातून शरीराला मिळणाऱ्या सुखदु:खांचेही संदर्भ कमी होत जवळजवळ नाहीसे होतात. तेव्हा **'संचित प्रारब्ध क्रियमाण। अवघा झाला नारायण।'**, **'पिकलिया सेंड कडूपण गेले। तैसें आम्हां केले पांडुरंगें।।'** अशी स्थिती होते.

'मी आत्मा आहे' हे ज्ञानच आत्मशक्तीचे खरे सामर्थ्य तसेच साधन आहे.

मी जीव आहे, मी देह आहे, मी मन आहे, मी पराधीन आहे हाच दुबळेपणा आहे. दैव ह्यांनाच घट्ट धरून बसते. आत्मस्वरूपापर्यंत त्याचे हात पोहोचत नाहीत. हीच दैवावर मात करण्याची एकमेव रीत आहे. त्याचा असा पराभव करून त्याला वाकुल्या दाखवणे ह्यातच त्याचा पराभव आहे, माणसाचा पुरुषार्थ आहे.

**एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा।**
**हरिकृपें त्याचा नाश झाला।।** ए.ह.२३-५

हरिकृपेने प्रारब्धाचा नाश होत नाही तर त्याच्या भोग भोगण्यास भाग पाडण्याच्या अज्ञानजन्य सामर्थ्याचा नाश होतो.

***



# स्वरूप अभंग संकीर्तन

**निर्भय, निश्चिंत, निवांत, निरार्त। रतलेसे चित्त हरिपायीं।**
**सांडिला संसार व्हावया उद्धार। केली सारासार विचारणा।।**
**हरिकृपाबळें लाधला सत्संग। सांपडला मार्ग स्वानंदाचा।।**
**स्वामी म्हणे मज आकळले गुज। देखिले सहज आत्मरूप।।**

स्वामी स्वरूपानंदांच्या संजीवनी गाथेतील हा चौथा अभंग आहे. त्यांनी स्वत: कोणत्या रीतीने परमार्थमार्गाचा प्रवास करून जीवनाचे सार्थक करून घेतले ती रीत सर्वांना कळावी म्हणून त्यांनी काही अभंगांमध्ये लिहून ठेवली आहे. त्यांतीलच हा एक अभंग आहे. केवळ तत्त्वज्ञानात न रमता, साधनेसह केलेला तत्त्वज्ञानाचा अभ्यास प्रत्यक्ष फलदायी असतो हे सर्वच श्रेष्ठ संतांच्या शिकवणीतून स्पष्ट दिसते.

ज्या श्रीहरीच्या पायांपाशी स्वामींचे चित्त त्यांनी लाविले व म्हणून ते तरले, तो श्रीहरी 'हरति इति हरि:।' ह्याप्रमाणे हरण करणारा आहे. भय, चिंता, अशांती व आर्ती ह्या सर्वांचे तो हरण करतो. हरी स्वत: एकमेव असल्याने त्याला भिण्यासाठी कोणीच नाही. '**द्वितीयाद्वै भयं भवति**' असे श्रुती सांगते. म्हणजे जेथे दुसरे काही असते तेव्हाच भय असते. श्रीहरीला शरीर, कुटुंब, व्यवसाय इत्यादी काहीच नसल्याने व चिंता करणारे चित्तही नसल्याने तो निश्चिंत आहे. श्री संत तुकोबाराय म्हणतात – '**उपाधिवेगळे तुम्ही निर्विकार कंहींच संसार तुम्हां नाही।**'. श्रीहरीला शरीराची उपाधी नसल्याने '**अमन, अप्राण, अजिव्ह, अनेत्र, अपादपाणि**' (मुंडक उप.) असा तो आहे. त्यामुळे शरीर व शरीरसापेक्ष व्यवहार नसल्याने तो निश्चिंत आहे. त्याच्या पायापाशी चित्त रमविणाऱ्याच्या चिंतेचे तो हरण करून त्याला निश्चिंत करतो. त्याचा सर्व व्यवहार व जीवन हरिरूप होते.

श्रीहरी स्वरूपानेच शांत आहे. '**निर्गुणं निष्कलं शान्तम्**' असे त्याचे श्रुती वर्णन करते. '**तज्जलानीति शान्त उपासीत**' (बृह.) अशी श्रुतीची आज्ञा आहे. सर्व दृश्य जगत् त्याच्यापासून उत्पन्न होते, त्याच्या सत्तेवरच राहते व शेवटी त्यातच लीन होते. ह्या सर्व मायिक घडामोडींचा त्याच्यावर काहीच परिणाम होत

नाही तर तो शांतच असतो. त्याचप्रमाणे देहादिकांच्या व्यापारांना श्रीहरिचरणांपाशी ठेवून शांत असावे.

श्रीहरी सुखरूप, निर्भय व शांत असल्याने व त्याला मिळविण्यासारखे काहीच नसल्याने तो निरार्त आहे. साधकाने त्याच्या चित्ताला सतत त्याचे अनुसंधान लावले तर तोही तसाच निरार्त होतो. '**जैसी स्थिती आहे तैशापरि राहे। कौतुक तूं पाहे संचिताचे।**' (एक. ह.पा.२३) अशा मनोरचनेमुळे तो निरार्त असतो. संचित व प्रारब्ध ही श्रीहरीची व्यवस्था असल्याने व भक्ताने ती शरणभावातूनच स्वीकारलेली असल्याने हवे-नकोपासून भक्त मुक्त असतो. सुखाचे विषय असावे, भयाचे कारण नसावे, अशांतीची परिस्थिती निर्माणच होऊ नये इत्यादी आर्तींपासून त्याची सुटका होते.

जीवाला आत्मानुभव मिळण्यासाठी संसार सोडावा लागतो व आत्मानुभवाशिवाय उद्धार होत नाही. संसार सोडण्याठी संन्यास घ्यावा लागतो. त्यांतील पहिला संन्यास पारंपरिक विधीनुसार घेतलेला विविदिषा संन्यास हा आहे. आत्मज्ञानाच्या अपेक्षेने घेतलेल्या संन्यासाला हे नाव आहे. संसाराचा प्रत्यक्ष त्याग हे त्याचे स्वरूप असून त्याला वस्तुत्याग असेही म्हणतात. स्वामी स्वरूपानंदांनी स्वत: त्या प्रकारचा संन्यास घेतला नाही, तरी ते स्वत:च्या बाबतीत 'सांडिला संसार' असे म्हणतात. संन्यासाचा दुसरा प्रकार श्रीज्ञानदेवांनी सांगितला आहे.

**आणि मी माझें ऐसी आठवण। विसरलें जयाचें अंत:करण।**
**पार्था तो संन्यासी जाण। निरंतर।।** ज्ञा. ५-२०

'जो मी व माझे विसरला आहे, तो सतत संन्यस्तच आहे'. मी व माझेचा संग सोडणे हे ह्या संन्यासाचे स्वरूप आहे. ह्यात वस्तूंचा म्हणजे संसाराचा प्रत्यक्ष त्याग न करता त्यांच्या संगाचा त्याग करावा लागतो. श्रुतीचे असे निरीक्षण आहे की, '**आरामस्तस्य पश्यन्ति न तं पश्यन्ति कश्चन।**' (बृह.)- 'त्या ब्रह्मस्वरूपावर भासणारा हा विस्तार सर्वजण पाहतात, पण त्याला कोणीच पाहात नाही'. ह्यातील 'तो' हा श्रीहरी असून सार आहे व आराम म्हणजे त्याचा विस्तार हा असार आहे. आत्मा हा सार असून शरीर असार आहे. ह्या असार शरीराला मी म्हणणे व शरीराच्या संदर्भातील चेतन व अचेतन पदार्थांना माझे म्हणणे हेच



संसाराचे स्वरूप असून त्याचेच जीवावर बंधन आहे. जो असा 'मी व तत्सापेक्ष' सर्व विसरला आहे, तोच संन्यासी आहे.

'**त्रिगुण असार निर्गुण ते सार**' असे श्रीज्ञानदेव म्हणतात. शरीर व दृश्य जग त्रिगुणात्मक असून आत्मा निर्गुण आहे. म्हणून जीवाचे शरीर (पिंड) व ईश्वराचे शरीर (ब्रह्मांड) असार आहेत. कठश्रुती म्हणते - '**अशरीरं शरीरेषु अनवस्थेषु अवस्थितम्।**' (१-२-२२). म्हणजे विनाशशील असार शरीरामध्ये निरवयव, निराकार आत्मा अविचल भावाने राहतो. नाशिवंत शरीरालाच मी म्हणणे व शरीराशी संबंधित असार पसाऱ्याला माझे म्हणणे हाच खरा संसार आहे. असार विनाशशील असून सार अविनाशी आहे. असार शरीराला जन्म, जरा व मरण हे विकार असून सार आत्मा, अज, अजर व अमर असा निर्विकार आहे. असार शरीर असत्, अचेतन व दु:खरूप असून सार आत्मा सत्, चित् व आनंदरूप आहे. ह्या व अशा रीतीने जाणत्यांच्या संगतीत सार व असार ह्यांचा योग्य विचार केला असता मी व माझे ह्यांची चुकीची आठवण दूर होऊन 'मी आत्मा' व 'माझे काही नाही' ही योग्य आठवण स्थिर होते व संन्यास सिद्ध होऊन संसाराचा त्याग होतो.

स्वामी म्हणतात की, वरील प्रकारची जाणत्यांची संगत मला श्रीहरीच्या कृपेने मिळाली. श्रीहरीच्या निष्काम उपासनेचे ते सर्वश्रेष्ठ फळ आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, शुद्ध आत्मज्ञान असलेले संत ही माझीच रूपे आहेत. भगवंतांच्या अवताराला काळाचे व परिस्थितीचे बंधन असले तरी संतांचा प्रवाह ह्या जगात अखंड चालू असतो. म्हणून भगवंतांपेक्षाही संतसंगती ही अधिक फलदायी व शाश्वत असते. ही संगत हरिकृपेने लाभते व हरिकृपा अनंत जन्मांच्या पुण्याईने लाभते. '**अनेका जन्मांचे सुकृत पदरी। त्याचे मुखी हरि पैठा होय।।**' (ह.पा. ७-३) असे एकनाथ महाराज हरिपाठात म्हणतात आणि '**साधूचे संगती हरि जोडे**' (अभंग ५) असेही ते म्हणतात. श्रीहरीची उपासना ही ईश्वरतत्त्वाची उपासना असते. ती जर भाव, प्रेम, निष्ठापूर्वक व निष्काम असेल तर अशा उपासकाच्या शाश्वत हिताचा विचार श्रीहरी करतो. असाराच्या

अनुसंधानात न रमता साराच्या चिंतनात राहण्यात हरिभक्ताचे शाश्वत हित असते. हे लक्षात घेऊन श्रीहरी त्याच्या भक्ताला संतांच्या पदरात घालतो. सद्‌गुरूंची भेट घडवून देतो. त्याचा परिणाम म्हणून '**संतसंगतीने उमज ध्यानि आणुनि पुरता समज**' असे सोहिरोबानाथांच्या म्हणण्यानुसार घेऊन '**अनुभवावीण उगीच मान हालवू नको रे**' असे होत नाही! संत ज्ञानदेवांनी श्रीगुरुकृपेचे अद्‌भुत फळ सांगितले आहे.

**मावळवीत विश्वाभासु। नवल उदयला चंडांशु।**
**अद्वयाब्जिनीविकासु। वंदूं आतां।।** ज्ञाने. १६-१

'फार मोठे आश्चर्य घडले की, श्रीगुरुकृपारूप फार मोठा सूर्य उगवताच भासणारे विश्व दिसेनासे झाले. त्या सूर्योदयानंतर अद्वैतरूप कमळाचा विकास झाला'. अद्वैतच आनंदरूप असून अशा आनंदाचा मार्ग मला सापडला असे स्वामी म्हणतात. हा आनंद कोणावर (व्यक्ती) किंवा कशावर (वस्तू) अवलंबून नसून तो प्रत्येकाचे स्वरूपच आहे. ह्या आनंदसाधनेचा मार्ग मला श्रीगुरूंच्या कृपेने लाभला.

आनंदमार्गाची साधना हे एक मोठे गूढ (गुज) आहे. श्रीगुरूंशी गुजगोष्टी केल्याशिवाय साधकाला त्या कोणी सांगणे शक्य नाही. श्रीज्ञानदेव म्हणतात - '**तपेंविण दैवत दिधल्यावीण प्राप्त। गुजेंवीण हित कोण सांगे।।**' (हरिपाठ ५-३). ईश्वरप्रेम व त्याची कृपा आणि श्रीगुरुसेवा व त्यांची कृपा ह्यांचा कार्यकारणभाव, सामर्थ्य व वैभव ह्या सर्वच गोष्टी अनाकलनीय असल्याने श्रद्धेवर निर्भर आहेत. श्रद्धेचा मागोवा घेत आजपर्यंत कित्येक भाग्यवंत श्रीगुरुकृपेला पात्र होऊन धन्य झाले आहेत.

**मज हृदयीं सद्‌गुरु । जेणें तारिलो हा संसार पूरु ।**
**म्हणौनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ।।** ज्ञा. १-२२

माझ्या अन्त:करणात श्रीगुरू अखंड राहत असल्याने हा संसारसागर मी तरून गेलो. त्यांच्यापासून शिकलेल्या विवेकामुळेच हे झाल्याने सारासारविवेक, आत्मानात्मविवेक, क्षराक्षरविवेक, जड-चेतनविवेक, सतासत्‌विवेक, नित्या-नित्यविवेक इ. विवेकाच्या घटकांविषयी माझी अपार निष्ठा आहे. ह्या विवेकांचे



रहस्य स्वामींना उमगल्यामुळे त्याचा सहज परिणाम म्हणून जीवभावाचा बाध होऊन आत्मभाव स्थिर झाला. ह्यालाच स्वामी '**देखिले सहज आत्मरूप**' असे म्हणतात. परमार्थामध्ये आत्म्याच्या संदर्भात 'देखिले' असा शब्द वापरला जातो तेव्हा त्याचा अर्थ 'जीवआत्मैक्याचा प्रत्यक्ष अनुभव झाला' असा असतो हे सतत लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

***

## पारमार्थिक यशाची गुरुकिल्ली

**विश्वास तो देव। म्हणू धरियेला भाव ।।१ ।।**
**माझी वदवितो वाणी। जेणें धरिली धरणी ।।२ ।।**
**जोडिली अक्षरे। नव्हती बुद्धीच्या विचारें ।।३ ।।**
**केली नाही आटी। कांही मानदंभासांठी ।।४ ।।**
**कोणी भाग्यवन्त। तया कळे हे उचित ।।५ ।।**
**तुका म्हणें झरा। आहे मूळींचाच खरा ।।६ ।।** श्रीतुकाराम महाराज.

संत श्रीतुकाराम महाराजांना जगद्गुरू ही उपाधी अत्यंत यथार्थपणे शोभते. म्हणून त्यांनी त्यांच्या अनुभवाच्या व त्यावर आधारलेल्या उपदेशाच्या रूपाने दिलेल्या गुरुकिल्लीचे अपार महत्त्व आहे. ह्या अभंगामध्ये त्यांना लाभलेल्या पारमार्थिक यशाचे रहस्य त्यांनी स्पष्टपणे व मार्मिकपणे सांगितले आहे. कोणत्याही व्यावहारिक यशाच्या अपेक्षेने त्यांनी पारमार्थिक वाटचाल न केल्यानेच हे यश मिळाले हे ह्या अभंगाचे सूत्र आहे. चालू घडीला ह्या सूत्राचे फार महत्त्व आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

महाराजांच्या पारमार्थिक वाटचालीचा, श्रीविठ्ठलदेवावरील पराकोटीची श्रद्धा हा पाया आहे. '**श्रद्धावान् लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः।**' (गीता ४-३९) ह्या गीतेच्या श्लोकाचा त्यांनी समर्थपणे पाठपुरावा केला. विश्वास म्हणजे श्रद्धा हाच देव व देव म्हणजेच श्रद्धा असा त्यांचा सहजनिश्चय होता. श्री क्षेत्र पंढरपूर येथे विटेवर सुंदर ध्यानाच्या रूपाने उभा असलेला देव, देवांनी सांगितलेले वेद व वेदानुसारी उपदेश करणारे अनुभवी संत ह्या तिन्हींवर त्यांची प्रगाढ श्रद्धा आहे. '**वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा**' असे स्पष्टपणे सांगण्याएवढे त्यांनी वेदांचे वर्म जाणले. हे म्हणतांना त्यांना मानसन्मानाची जराही अपेक्षा नाही व दंभाचा स्पर्शही नाही. महाराजांच्या अभंगरचनेत जागोजागी संतांवरील श्रद्धा व्यक्त झाली असून संतांचा संदर्भ येताच ते अत्यंत नम्र होतात. श्रीविठ्ठलाचे वर्णन करतांना सगुण व निर्गुण देवाचे किती बेमालून व बहारदार दिग्दर्शन करतात ते पाहण्यासारखे आहे. '**राजस सुकुमार मदनाचा पुतळा। रविशशिकळा लोपलिया ।।**' ह्यातील पहिल्या चरणामध्ये सगुण विठ्ठलाच्या रूपाचे लोभसवाणे वर्णन केले आहे. चित्त वेधून घेणारे, नजर खिळवून ठेवणारे व मनबुद्धीचे व्यापार स्तंभित करणारे असे ते रूप आहे. त्याच रूपातील स्वरूपाचे वर्णन दुसऱ्या चरणांत केले आहे. रूप दृश्य असते व स्वरूप स्वसंवेद्य असते. त्या स्वरूपाचे परोक्षत्वाने वर्णन करतांना संत श्रीएकनाथ महाराज म्हणतात, **बारा सोळा जणी। हरिसी नेणती। म्हणोनि फिरती। रात्रंदिवस।।** (ए.ह.पा.२१)



सूर्यचंद्रांच्या तेजाला झाकाळून टाकणारे तेज श्रीविठ्ठलाच्या रूपाचे आहे. हे सांगतांनाच त्यांच्या प्रकाशात त्याचे स्वरूप दिसत नाही, हेही महाराजांनी लक्षात आणून दिले आहे. '**न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं**' ह्या काठक श्रुतीची येथे आठवण येते. अशा ह्या विठ्ठलाचे स्वरूप व कर्तृत्व त्यांनी - '**वि'चा केला ठोबा। येणें नांवे विठोबा**' ह्या शब्दात व्यक्त केले आहे. ह्या चरणाचे अर्थ दोन पद्धतींनी करतात. वि म्हणजे ज्ञान व ठोबा म्हणजे पुतळा. ज्ञानाचा पुतळा किंवा चित्घन हा एक अर्थ आहे. दुसऱ्या अर्थाप्रमाणे वि म्हणजे माया व ठोबा म्हणजे निरास. मायेचा निरास करणारा असाही अर्थ होतो. दोन्हींचे तात्पर्य एकच आहे. अशा ह्या देवाविषयी त्यांचा परिपूर्ण भाव आहे, म्हणजे प्रागाढ श्रद्धेचे रूपांतर परिपूर्ण भावात झाले. भावाचे यथार्थ लक्षण श्रीज्ञानोबांनी केले आहे.

**सटवीचिये रातीं। न विसंबिजे जेविं वाती।**
**तैसा ईश्वरनिर्णयो चित्तीं। वाहणें सदा।।** ज्ञा.१८-८३७

प्रसूतीच्या पाचव्या दिवशी रात्रभर दिवा तेवत ठेवण्याची जुनी रीत होती. तो दिवा जसा सतत तेवत राहतो त्याप्रमाणे देवाच्या अस्तित्वाचा निर्णय सतत जागा ठेवावा. त्याचा कधीच विसर पडू नये. असा भाव ठेवतांना महाराजांनी देवाचे वर्म अचूक जाणले होते. '**देव आहे ऐसी वदवावी वाणी। नाही ऐसा मनीं आठवावा।.**' जगात बोलतांना देवावरील श्रद्धा दृढ करण्यासाठी त्याचे अस्तित्व परोपरीने सांगावे, पण मनात मात्र तो स्वःहून भिन्न नाही हे ओळखून असावे. उपनिषदांची चारही महावाक्ये आत्मसात करूनही त्यांचे सगुणावरील प्रेम अबाधित राहिले.

'जो देव पृथ्वीमध्ये प्रवेश करून पृथ्वीचा सांभाळ करतो, पण पृथ्वी

ज्याला जाणीत नाही' असे वर्णन श्रुतीने केले आहे, तोच देव माझ्याकडून अभंगरचना करून घेत आहे असे महाराज म्हणतात. '**बोलविता धनी वेगळाचि**' हे त्यांचे निवेदन प्रसिद्ध आहे. श्रुतीने केलेले हे ब्रह्माचे तटस्थ लक्षण किंवा ईश्वराचे वर्णन आहे. '**जेणें धरिली धरणी**' ह्या चरणाचा एवढा अर्थ आहे. ईश्वरी कृपेमुळे त्यांची प्रतिभा जागी होऊन त्या ऋतंभरा प्रज्ञेतून ईश्वरेच्छेने अभंगरचना झाली. त्यातून श्रीसमर्थांनी वर्णन केलेले 'प्रासादिक काव्य' उदयाला आले. त्यामुळे त्या अभंगरचनेत स्वार्थाचा लवलेशही नाही. त्याचबरोबर त्यांत एकही चुकीचे विधान नाही, अपसिद्धांत नाही, दिशाभूल नाही. शुद्ध भक्ति, ज्ञान, वैराग्य व सदाचाराशिवाय वायफळ शब्द नाही. एखाद्या नव्या संप्रदायाचा चहाटळपणा नाही. सवलती व तडजोडीचा मागमूस नाही. जनसामान्यांच्या कैवाराचा स्थायीभाव आहे. त्यामुळे श्रीतुकोबारायांच्या अभंगांचा मागोवा घेत साधकाने निर्धास्तपणे परमार्थाची वाटचाल करावी.

श्रीमहाराजांनी केलेली अभंगरचना कष्टाने कमविलेल्या बुद्धीतून झालेली नाही हे आतापर्यंत पाहिले आहे. ते स्वत: स्पष्ट शब्दांत तसे सांगत आहेत. सामान्य मानवी बुद्धी स्खलनशील किंवा प्रमादशील असते. तिला आग्रह, स्वार्थ, अहंकार इत्यादींचा स्पर्श असतो. मानसन्मानांची प्राप्ती व स्वत:ला मिरविण्याच्या वा स्वत:चा मोठेपणा दाखविण्याच्या हौसेतून पारमार्थिक काव्यरचना होऊ शकतात. श्रीमहाराजांच्या काळातही असे उदंड कवी होते. काळाच्या ओघात त्यांच्या काव्यरचना लुप्त झाल्या. '**अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची**' तेवढी दिमाखात गाजत आहे. '**बुद्धियोगं ददामि येन मां उपयान्ति**' ह्या भ. श्रीकृष्णाच्या योजनेनुसार त्यांना हा बुद्धियोग प्राप्त झाला. त्यांनी जी 'आटी' केली ती उपासनेसाठी केली. देवाच्या सख्यत्वासाठी व त्याच्याशी ऐक्य साधण्यासाठी केली. '**घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हाती। मुक्ता आत्मस्थिती सांडवीन।**' अशी महान अवस्था त्यांना त्यातून प्राप्त झाली. अभंग छापण्याचे हक्क, ते म्हणण्याचे मानधन, कीर्तनाचा दर इत्यादी व्यवहाराचा त्यांना स्पर्शही झाला नाही. आश्रम, मठ, पाठशाळा इत्यादी उभारण्याचे त्यांच्या कधी मनातही आले नाही. शासकीय अनुदान आलेले त्यांनी परत पाठविले. छ. शिवाजी महाराजांसारखे शिष्य मिळत असतांना त्यांना अन्यत्र जाण्यास सांगितले.



आतापर्यंत सांगितलेले सर्व विचार कोणा भाग्यवंतालाच यथार्थ कळतात. त्यात तो सामाजिक, राजकीय, आर्थिक इत्यादी क्षेत्रांची भेसळ न करता ते जसे आहेत तसे स्वीकारतो. '**मोक्षापरते नाही भाग्य**' असे जाणणारा भाग्यवंत एका पारमार्थिक दिशेनेच वाटचाल करतो. तसे करणेच उचित आहे असे महाराज म्हणतात. जीव आणि ब्रह्म ह्यांच्या ऐक्याचा दृढ, अपरिवर्तनीय व प्रत्यक्ष अनुभव हे मोक्षाचे स्वरूप आहे. श्रीमहाराज म्हणतात ती हे ऐक्य मूळचेच आहे. हे ऐक्य सांगणारा वेदान्त तत्त्वज्ञानाचा झरा अखंड झुळझुळ वाहत आहे. तोच पारमार्थिक सत्यापर्यंत नेणारा शाश्वत प्रवाह आहे. आजपर्यंत अनेकांनी त्या प्रवाहात स्वत:ला झोकून देऊन विठ्ठलरूप सत्याचा अनुभव घेतला आहे. त्याच प्रवाहात राहिलेल्या संत तुकाराम महाराजांना स्वप्नात श्रीगुरुभेट होऊन कृतार्थता लाभली. श्रीविठ्ठलाने त्यांची तीही सोय पाहिली. वैकुंठवासी असून लोकोद्धारासाठी जन्म घेतलेले, अज्ञानात बुडणाऱ्या लोकांची कणव येऊन त्यांच्या शाश्वत हितासाठी झटणारे, स्वत:च्या लाभाशिवाय जनसामान्यांचा कळवळा असणारे, वारकरी संप्रदायाचे कळसरूप श्रीसंत तुकाराम महाराज हे महाराष्ट्राचे भूषण आहेत, जगाचे आदर्श आहेत. त्यांच्या मागे जाणे हीच पारमार्थिक यशाची गुरुकिल्ली आहे.

***

## कल्पना

शांकर अद्वैत वेदान्तमतामध्ये 'कल्पना' ह्या कल्पनेचे मोठे महत्त्व आहे. मायावादाची उभारणी ह्यावर झाली आहे. दोरीवर सर्पाची कल्पना व्हावी त्याप्रमाणे ब्रह्मावर दृश्य जगाची कल्पना होते. महाराष्ट्रातील सर्व संतांनी ही कल्पना उचलून धरली आहे.

**तैसा आद्यंतीं कीर नाही। आणि साचहि नोहे कहीं।**
**परि लटिकेपणाची नवाई। पडिभासे गा।।** ज्ञाने. १५-२३९

'हा संसारवृक्ष आरंभी व शेवटीही नाही आणि तिन्ही काळांत सत्यही नाही. परंतु ह्या खोटेपणाचे नवल असे की पारमार्थिक दृष्टीने तो नसूनहि त्याची कल्पना होते'.

**येऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळे। नावेक तिमिरेजति बुद्धीचे डोळे।**
**म्हणोनि अखंडितचि परि झांवळें। भूतभिन्न ऐसें देखे।।** ज्ञाने. ९-७२

'जीवाच्या आश्रयाने राहणाऱ्या कल्पनेची जेव्हा उत्पत्ती होते त्या वेळी विवेकी बुद्धीचे डोळे अंधाराने काहीसे झाकले जातात. म्हणून 'मी' अखंड एकरस असूनही कल्पनेमुळे निर्माण झालेल्या अर्धवट अवस्थेत मीच अनेक जीवांच्या रूपाने भिन्न भिन्न दिसतो'. पहिल्या ओवीत कल्पनेने दृश्य जगात भिन्नता दिसते असे सांगितले असून ह्या ओवीत कल्पनेमुळे 'मी'मध्ये भिन्नता दिसते असे म्हटले आहे. जेथे भेद दिसतो तेथे भय असल्यामुळे कल्पनेत वावरणारा माणूस भयग्रस्त असतो व म्हणून दु:खी असतो. संत एकनाथ महाराज त्यांच्या हरिपाठात म्हणतात, **'कल्पनेपासूनि कल्पिला जो ठेवा। तेणें पडे गोवा नेणें हरि।'** (१६-१) सर्वत्र श्रीहरिरूप आत्मा व्यापलेला असूनही अविद्येने निर्माण होणाऱ्या कल्पनेमुळे भ्रम निर्माण होऊन (गोवा) श्रीहरीचे ज्ञान होत नाही. कल्पनेचे सामर्थ्य अनाकलनीय असून ब्रह्म व मायेच्या कल्पनेबरोबर तिनेच त्यांच्या निरासाचीही कल्पना केली आहे.

**माया ब्रह्म ऐसा हेत। मनें कल्पिला संकेत।**
**ब्रह्म कल्पनेरहित। जाणती ज्ञानी।।** दासबोध ७-५-१५

'भेददृष्टीने पाहू लागल्यावर ब्रह्मानुभव निसटतो व ब्रह्मानुभव काळी द्वैत किंवा भेद



अनुभवाला येत नाही. म्हणून भेद व अभेद हे कल्पनेचे खेळ आहेत'.

कल्पनेमुळे माणसाच्या जीवनात काही भ्रम निर्माण होऊन त्याला सुखरूपतेचा अनुभव न येता सुखदु:खांची द्वंद्वे भोगावी लागतात. उदा. - विषयांमध्ये सुखाची कल्पना होऊन आत्मसुखाकडे दुर्लक्ष होते.

**तैसा हृदयामध्यें मी रामु। असतां सर्वसुखाचा आरामु।**
**कीं भ्रांतासी कामु। विषयावरी।।** ज्ञाने. ९-६०

'वास्तविक सर्वांच्या अन्त:करणात सुखरूप श्रीरामाच्या रूपाने मी कायमचा असतांना भ्रमिष्ट लोक सुखासाठी विषयांकडे धावतात, विषयांची इच्छा करतात'. विषयामध्ये सुखाची कल्पना जन्मोजन्मी स्थिर झाली असल्याने शाश्वत सुखाची दिशा शोधलीही जात नाही.

**तरी सुख तें गा किरीटी। दाविजेल तुज दिठी।**
**जें आत्मयाचिये भेटी। जीवासि होय।।** ज्ञाने. १८-७७३

'जीव आत्मरूप झाल्यावर जे काही होते त्याला सुख असे म्हणतात'. जीव आत्म्याहून अलग असतांना जे काही होते, त्याला दु:ख असे म्हणावे. विषय येणारे व जाणारे, वीट आणणारे व प्रारब्धाधीन असल्याने सुखासाठी त्यांवर अवलंबून राहणेच दु:खमय आहे.

मी आत्मा नसून जीव आहे अशी कल्पना केल्यामुळे मी कर्ता व भोक्ता आहे, अशी दुसरी कल्पना होते. तिच्या सत्यतेत अपार दु:खे साठविलेली आहेत.

**मी कर्ता ऐसें म्हणसी। तेणें तूं कष्टी होसी।**
**राम कर्ता म्हणतां पावसी। येश कीर्ती प्रताप।।** दासबोध ६-७-३६

'अंतर्यामी' असलेल्या श्रीरामामुळे देह व जगाचे व्यापार चालत असतांना 'ते मी करतो' असा भ्रम झाल्याने दु:खे भोगावी लागतात. माणसांचे जगातील जीवन श्रीरामाच्या आज्ञांनुसार असावे. तसेच देहातील जीवन त्याच्याच प्रारब्धव्यवस्थेनुसार चालले की 'मी कर्ता' हा भाव टिकत नाही. आज्ञेनुसार वागल्यास जे घडते ते श्रीरामाच्या व्यवस्थेनुसार व शरीरात वृद्धत्व, रोगादी जे घडते, ते ही त्यानुसार असा विचार केला असता, 'मी' हा घटक न राहिल्याने अभिमान किंवा अपयश ह्यांचे दु:ख होत नाही. मी भोक्ता आहे ही दुसरी कल्पना असून श्वेताश्वतरात त्याला पाश असे म्हटले आहे. **'अनीशश्चात्मा बध्यते**

**भोक्तृभावाज्ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः**' (१-८)

पराधीन जीव 'मी भोक्ता' ह्या कल्पनेने बांधला जातो, पण त्या परमेश्वराला ओळखून सर्व पाशांतून मुक्त होतो. 'मी भोक्ता' ह्या कल्पनेतच सुख व दुःखाचे भोग समाविष्ट आहेत. '**सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे**' (तुका.) अशी त्यांची वाटणी आहे. आत्मरूप मी सुखरूप असून तो भोगनिरपेक्ष आहे हे कळण्यासाठी आत्मानुभवच घ्यावा लागतो.

'मी जन्माला आलो आहे, मी म्हातारा झालो आहे व मी मरणार आहे' हा एक सलग कल्पनांचा दुःखदायक संच आहे. मूळचा अज असलेला पण नंतर कल्पनेने जीवभाव पत्करलेलाच ह्या चक्रात सापडतो. श्वेताश्वतर म्हणते -

**अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाः।**
**अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्यः** ।।४-५

'आपल्याप्रमाणेच (त्रिगुणात्मक) पुष्कळ भूतांना निर्माण करणाऱ्या लाल,काळ्या व पांढऱ्या रंगाच्या (अनुक्रमे रज, तम व सत्त्व गुणांचे) शेळीवर (अज प्रकृती) एक अजन्मा आसक्त होऊन तिला भोगतो. दुसरा ज्ञानी ह्या भोगलेल्या प्रकृतीला सोडून देतो'. ह्याचा सरलार्थ असा की, स्वरूपाने अजन्मा असलेला जीव कल्पनेमुळे त्रिगुणात्मक प्रकृतीच्या स्वाधीन होऊन जन्ममरणाच्या चक्रात सापडतो. दुसरा कोणी ह्या कल्पनेचा त्याग करून 'मी जन्माला आलो आहे' ह्या भ्रमातून सुटून सुखरूप होतो.

ही कल्पना घातक व तारक अशा दोन्ही पद्धतींनी काम करते.

**असो ऐसी हे कल्पना। साधनें दे समाधाना।**
**येरवीं हे पतना। मूळच कीं**।। दासबोध ७-५-२५

'कल्पना साधनेला जोडली तर मोक्षरूप समाधान देते व स्वैर सोडली तर पतनाला कारण होते'. कल्पनेला वेदान्तशास्त्र व श्रीगुरुवाक्य ह्यांची जोड दिल्यास ती कल्पना आकस्मिकपणे कल्पनातीत ब्रह्माशी ऐक्य साधून देऊन स्वतः निवृत्त होते. पण त्याच कल्पनेला वासनेशी जोडून दिले तर ती जन्ममरणाच्या फेऱ्यात गुंतवून जन्मभर द्वंद्वमय जीवन जगणे भाग पाडते. समर्थ सांगतात -

**श्रवण आणि मनन। निजध्यासें समाधान।**
**मिथ्या कल्पनेचें भान। उडोन जाये**।। दास. ७-५-२७



संप्रदाययुक्त यथार्थ श्रवण, शास्त्रानुसारी मनन व श्रीगुरुवाक्याचे निदिध्यासन केल्याने ह्याविरुद्ध असलेल्या कल्पनेचे खेळ थांबून शाश्वत समाधान मिळते. काट्याने काटा काढावा त्याप्रमाणे योग्य कल्पनेने चुकीची कल्पना नष्ट होते. जसे -

**कल्पनेनें कल्पना उडे। जैसा मृगें मृग सांपडे।**
**कां शरें शर आतुडे। आकाशमार्गीं**।। दास. ७-५-३१

मृग ह्या शब्दाचा सामान्य अर्थ पशू असा असून विशेष अर्थ हरीण असा आहे. 'मृगया' ह्या शब्दाने सर्व पशूंची शिकार सुचविली जाते. बकरी खांबाला बांधून ठेविली म्हणजे तिला खाण्यासाठी वाघ आल्यावर त्याची शिकार करता येते. त्याप्रमाणे शास्त्रीय कल्पनेने अशास्त्रीय कल्पना नष्ट करता येतात. पुढे शास्त्रीय कल्पनाही केवळ कल्पनाच असल्याने तीही सुटून जाते.

**कल्पनेसी मिथ्यत्व आलें। सहजचि तद्रूप जालें।**
**आत्मनिश्चयें नासिलें। कल्पनेसी**।। दास. ७-५-४०

शुद्ध कल्पनाही मिथ्या आहे असा निश्चय झाल्यावर आत्म्याशी तद्रूपता येते व 'मी आत्मा' असा निश्चय झाल्यावर तो निश्चय साधकावस्थेतील कल्पनेच्या स्वरूपाचा राहत नाही. ज्या क्षणी हा निश्चय मोडतो त्या क्षणी पुन्हा कल्पनांचा प्रवाह सुरू होतो. सर्व द्वैतमय दिसू लागते. '**जेचि क्षणीं निश्चये चळे। तेचि क्षणीं द्वैत उफाळे**।।' (दास. ७-५-४१)

कल्पना करीत राहणे माणसाचा सहज स्वभाव आहे. त्यांचे भगवंतानुसारी व वासनानुसारी असे दोनच प्रकार आहेत. पहिली सातत्याने वापरीत राहिले तर दुसरीचा बाध होऊन मोक्षस्थिती प्राप्त झाल्यावर पहिलीही निवृत्त होते. जीव जीवन्मुक्त होऊन एकाही कल्पनेने बांधलेला राहत नाही.

***

# फसवा

राधेची अशी समजूत होती की, तिने श्रीकृष्णाचे अन्त:करण जिंकले असून तो जणू तिचा दास झाला आहे. सर्वसाक्षी श्रीकृष्णाच्या ते सहजच लक्षात आल्याने त्याने राधेची गंमत करण्याचे ठरविले. एका रम्य सायंकाळी ते दोघे समोरासमोर बसले असता श्रीकृष्ण खुद्कन हसले व पुन्हा गंभीर झाले. राधेने श्रीकृष्णाला 'का हसलास?' असे विचारल्यावर ते म्हणाले, 'तसे खास काही नाही; पण माझ्या असे मनात सहज विचार आला की, हे सर्व जग त्यातील सर्व जीवसृष्टीसह माझ्या नियंत्रणाखाली असून मी किती मोठा आहे व ह्या विचाराने मला हसू आहे.' त्यानंतर काही क्षणांतच राधाही हसली व पुन्हा स्वस्थ झाली. आता श्रीकृष्णाने तिला हसण्याचे कारण विचारल्यावर ती म्हणाली, 'तसे खास काही नाही; पण माझ्या असे मनात आले की तुझे जगावर स्वामित्व असले तरी माझे तुझ्यावर स्वामित्व आहे. ह्या विचाराने मला हसू आले.' श्रीकृष्ण म्हणाले, 'तुझा दास व्हावयाला कोणाला आवडणार नाही? तुझ्या दैवी सौंदर्याने कोण मोहित होणार नाही? तुझ्या नेत्रकमलांकडे एकदा दृष्टी टाकली तरी त्रिभुवने तुझी दास होतील!' ह्या संभाषणानंतर थोड्याच वेळात श्रीकृष्ण तेथून निघून गेले.

काही दिवसांनंतर राधेने श्रीकृष्णांना यमुनेच्या काठी भेटण्यासाठी निरोप दिला. भेटीची वेळ सायंकाळची असल्याने राधेने सर्व दिवस साजश्रृंगार करण्यासाठी खर्च करून स्वत:ला अनेक प्रकारे सजविले. आरशासमोर उभी राहून स्वत:शी व श्रीकृष्णाशी काल्पनिक संवाद केले. सायंकाळ होत आल्यावर हातात वनमाला घेऊन यमुनेच्या काठी जाण्यासाठी ती निघाली. घर, घरकाम, शेजारी इ. सर्वांचा पूर्ण विसर पडून केवळ श्रीकृष्णचिंतनात मग्न राहून, त्याला मोहित करण्यासाठी ती सर्व प्रकारे सज्ज झाली. एका फारशी ये-जा नसलेल्या मार्गावरून ती नियोजित ठिकाणी पोहोचली. अजून श्रीकृष्ण आलेले नव्हते. वेळ काढण्यासाठी तिने आपले रूप यमुनेच्या पाण्यात डोळे भरून पाहिले. व्यवस्थित असलेली कर्णफुले, गजरा, वस्त्र, इ. उगीचच पुन्हा नीट केली. वेणीवरील जाळी पाहून ती खुद्कन हसून स्वत:शीच म्हणाली की, एवढा सुंदर श्रीकृष्ण



पकडावयाचा तर अशी जाळी हवीच! यमुनेच्या पाण्यानेही ते रूप स्वत:मध्ये प्रतिबिंबित झाल्याने स्वत:ला धन्य मानले. सायंकाळ होऊ लागली. आकाशात व क्षितिजावर रंगांचे मनोहर खेळ दिसू लागले. सर्व आसमंत अत्यंत सुंदर व रमणीय होता; पण ह्या सर्वांहून अनंतपटींनी सुंदर असणारे श्रीकृष्ण अजून दिसत नव्हते. श्रीकृष्ण माझे आहेत व माझी त्यांच्यावर सत्ता आहे ह्या कल्पनेने राधा झपाटलेली असल्याने, ते येण्याला जसजसा उशीर होऊ लागला, तसतशी ती अस्वस्थ होऊ लागली. त्या अस्वस्थतेमध्ये हळूच क्रोधानेही चंचुप्रवेश केला. कदाचित खोडकर श्रीकृष्ण कोठेतरी लपून बसून, मला मुद्दाम सतावीत असेल असे समजून तिने श्रीकृष्णांच्या अनेक नावांनी त्यांना हलकेच हाका मारल्या. नंतर त्या हाकांत आर्तता, आतुरता, अपमान व क्रोधाचाही समावेश झाला. हाकांचा आवाज हळूहळू मोठा व रडवाही झाला; पण ह्या सर्व प्रकारच्या सादांना कोणताच प्रतिसाद मिळत नव्हता.

हळूहळू पक्षी घरट्यांकडे वळू लागले. सूर्य क्षितिजाखाली गेला. हवेत किंचितसा गारवाही आला. आकाशात एखादा ताराही चमकू लागला. गाई व गुराखी घरी निघाले. शेतातील कामे थांबली. यमुनेच्या पाण्याचा प्रवाह दिसावयाचा थांबून पाण्याचा आभास तेवढा राहिला. 'श्रीकृष्ण खरेच येईल ना? तो आल्याशिवाय कसा राहील? तो माझ्या मुठीत आहे, अर्ध्या वचनात आहे. बहुतेक तो चंद्रोदयाबरोबर येईल.' तिचे पूर्वेकडे लक्ष गेले. चंद्रही मंदपणे आकाशात प्रगट झालाच होता. तरी श्रीकृष्ण आले नव्हते. राधा पुन्हा विचार करू लागली, 'मी हताशपणे वाट राहून येथे तडफडत आहे. श्रीकृष्ण कोठेतरी सुखाने रममाण झाला असेल. त्याला माझे स्मरण तरी आहे की नाही कुणास ठाऊक? मला तरी काही मानापमान आहे की नाही? तो येऊ दे तर खरे! मीही त्याच्यासारखीच बेफिकीर आहे हे त्याला दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही. त्याच्याकडे ढुंकूनही पाहणार नाही.' शेवटी राधेने घरी परतण्याचाही विचार केला; पण ती तेही करू शकत नव्हती. एक अनामिक ओढ तिला घरी जाऊ देत नव्हती. पण ती ओढ असल्याचे मान्य करण्याची तिची तयारी नव्हती. श्रीकृष्णाच्या प्रेमामुळे ती परत जात नव्हती हेही खरे नव्हते; कारण तिने त्याचे प्रेम सोडून दिले होते! मग ती का जात नव्हती? हळूहळू तिचा क्रोध कमी होऊन त्याची जागा

दु:खाच्या व्याकूळतेने घेतली. हातातील वनमाळा सुकून जाऊन तिच्या मनाचे जणू प्रतिनिधित्व करीत होत्या. ती पुन्हा विचार करू लागली. 'मी श्रीकृष्णाच्या प्रेमासाठी लायक नाही काय? तो प्रत्यक्ष परमेश्वर असतांना एका सामान्य स्त्रीवर त्याने का प्रेम करावे? तो माझ्या आज्ञेत कसा राहील? तसे त्याला प्रत्यक्ष सांगण्याचे माझे धाडस कसे झाले?' तिला तिचा फार मोठा अपमान झाल्यासारखे वाटून ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

इकडेतिकडे हिंडता हिंडता एका शिळेवर ती बसली. श्रीकृष्ण ज्या मार्गाने येतील त्या मार्गाकडे चोरट्या नजरा टाकीत तिने ते यावेत म्हणून देवदेवांचा धावा सुरू केला. तिचे मन नम्रता व पश्चात्तापाने भरून गेले. म्लान चेहऱ्यावर ओढ लागल्याची सर्व चिन्हे दिसू लागली. तेवढ्यात अचानक तिला तिच्या मागेच मुरलीचे मधुर स्वर ऐकू येत असल्याचा भास झाला. चमकून तिने मागे वळून पाहिले. पुन्हा पाठीमागेच ते स्वर ऐकू येऊ लागले. अशा प्रकारे सर्व दिशांना ती वळली तरी स्वर मागेच ऐकू येत होते. क्षणभर तिची वेणी ओढली गेल्याचा तिला भास झाला. ओढणारा हात पकडून त्याला शिक्षा करण्यासाठी हात वेणीवर गेला तर तेथे काहीच नव्हते. पुढच्या क्षणी श्रीकृष्णांचे दर्शन होऊन त्यांच्याभोवती कित्येक गोप-गोपी असल्याचे दृश्य तिला दिसले. नंतर पुन्हा कृष्ण एकटेच दिसू लागले. ती संपूर्ण गोंधळून गेली. नाना प्रकारे विनवणी करून तिने श्रीकृष्णांना हा सर्व खेळ आवरण्यास सांगितले. पुढच्या क्षणी श्रीकृष्ण निवांत झोपलेले दिसले. त्यांच्या चेहऱ्यावर निरागस निरपराधीपणाचे भाव खुलून दिसत होते. त्या भावांशी ती एकरूप होऊन समाधिस्थ झाली. त्याच भावावस्थेत रात्र निघून गेली.

सकाळी राधा भानावर आल्यावर झालेले सर्व काही तिला स्पष्टपणे आठवून पुन्हा तिला थोडासा खोटा राग आला! श्रीकृष्णांना जागे करून ती त्यांना म्हणाली, 'तू आता मला फसवू शकणार नाहीस, तू ढोंगी आहेस हे मान्य कर. प्रत्यक्ष जागा असतांना तू झोपेचे ढोंग केलेस. तू जागृती व सुषुप्तीच्या अतीत असतांना झोपण्याचे सोंग केलेस'.

श्रीकृष्ण – होय, मी ढोंगी आहे! पण जे माझे ढोंग ओळखतात, त्यांच्यासाठी मी ढोंगी नाही. त्यांच्यासाठी मी साधा, सोपा व सरळ आहे.

राधा – तू खोटारडा आहेस असे कबूल कर. कारण हे खोटे जग तू भासवतोस.



श्रीकृष्ण – होय, मी खोटारडा आहे! पण ज्यांना मी हवा आहे त्यांना जगाचा खोटेपणा मी लक्षात आणून देतो.

राधा – तू चोर आहेस हे मान्य कर. तू सर्वांचे आत्मसुख मायेच्या प्रभावाने चोरून नेतोस.

श्रीकृष्ण – मी चोरांचा सम्राट आहे, परंतु जे आत्मसुख नीट सांभाळीत नाहीत, त्यांचेच आत्मसुख मी चोरतो.

राधा – तू निर्दयी व दुष्ट आहेस हे कबूल कर. जगाच्या दु:खाने तुला सुख मिळते. तुझा खेळ होतो, पण जगाचा जीव जातो.

श्रीकृष्ण – मी नक्कीच निर्दयी व दुष्ट आहे. विषयसुखात रमणारे मला न ओळखून मला जणू मारतात. मग मी त्यांनाही सुख, दु:ख व मृत्यू देतो.

राधा – तू असे कबूल कर की, तू अनीतिमान व जारकर्म करणारा आहेस.

श्रीकृष्ण – मी खरोखर नीतिशून्य व जारकर्म करणारा आहे. जगातील प्रत्येक पदार्थ जणू माझे विवाहबाह्य अपत्य आहे. कारण माया ही माझ्या बाहेर असून सर्व अपत्ये तिची आहेत. प्रत्येक जीवाशी माझे गुप्त संबंध असून मी त्याच्याशी नाना प्रकारच्या क्रीडा करतो.

राधा – तू नक्कीच फसवा आहेस, ते तू मुकाट्याने मान्य कर.

श्रीकृष्ण – मी फसवा आहे ह्यात जराही शंका नाही. जे अज्ञानामुळे स्वत:ला माझ्याहून भिन्न आहे असे समजतात, त्यांनाच मी फसवतो. ज्ञानानंतर ते फसत नाहीत. पण ज्ञान होईपर्यंत मी त्यांना पुरेपूर फसवतो. मी फसवा आहेच आहे!

***

# जीवाची पाच घरे

जीवाला ब्रह्माशी ऐक्य साधण्याच्या प्रक्रियेच्या विकासामध्ये घरांच्या भाषेमध्ये पाच घरांची उपयुक्त कल्पना करता येते. श्रीसमर्थ रामदास स्वामींनी महंताला उपदेश करतांना '**पाहावीं घरांचीं घरें। भिक्षामिसें लहान थोरें। परिक्षून सोडावी।।**'(दास. १५-६-२४) असे म्हटले आहे. येथे जीव राहतो ते शरीर हे त्याचे पहिले घर असून ते शरीररूपी घर ज्या भिंतींनी बांधलेल्या घरात राहते ते त्याचे दुसरे घर म्हटले आहे. समाजातील माणसांची व कुटुंबाच्या परिस्थितीची माहिती करून घेऊन त्या नुसार महंतांनी कार्य करावे, अशी समर्थांची अपेक्षा आहे. हा विचार बाजूला ठेवून ह्या घरांचा परमार्थसाधनेच्या दृष्टीने विचार करता येईल.

माणूस हा जीव स्वत:च्या देहालाच 'मी' असे समजून घट्टपणे कवटाळून बसतो. इतर सर्व जीव तसेच असले तरी माणसाला हे लक्षात येण्यासारखी व म्हणून ते लक्षात आणून देण्यासारखी बुद्धी आहे. 'मी देह' ह्या भ्रमातून सुटण्यासाठी प्रथम 'माझा देह' व 'देह हे माझे राहण्याचे घर' ह्या कल्पना अतिशय उपयुक्त आहेत. त्या आधाराने 'माझे घर म्हणजे मी' हा भ्रम जसा कधीच नसतो त्याचप्रमाणे 'माझे शरीर हे माझे राहण्याचे पहिले घर आहे' हा विचार मनात ठसला तर 'ते मी' हा भ्रम सहजच दूर होतो. देहरूप पहिल्या घरात जीव मालकीने राहतो की मुदतीने? मालकीने राहत असता तर ते कधीच सोडावे लागले नसते. पण ते त्या जीवाच्या आयुष्याची मुदत संपताच सोडावेच लागते. कायदा, कोर्ट, खटला इत्यादींचा काहीच उपयोग होत नाही. त्याला वाचवू पाहणाऱ्या धन्वंतरीलासुद्धा त्याचे 'स्वत:चे' देहरूपी घर सोडावेच लागते. शिवाय देह जर माझा असेल तर तो मला मिळालेला की मी आणलेला ह्याचाही विचार करावा लागेल. मी तो आणला असता तर तो स्वत:च्या पसंतीनुसार आणला नसता का? साधी भाजी आणताना सुद्धा ती कोवळी, ताजी व आवडीची पाहून आणली जाते. मग एवढे आयुष्यभर साथ देणारे शरीर काळे, कुरुप, बेढब, रोगी, निर्बुद्ध असे का आणावे? अप्सरा व गंधर्वां सारखे सुंदर, आइन्स्टाइन सारखे बुद्धिमान, बलभीमा सारखे बलदंड व बिल गेटस् सारखे कर्तबगार का आणू नये? फेल्पस किंवा



बोल्टप्रमाणे शरीर क्रीडानिपुण का निवडू नये? (अमेरिकन जलतरणपटू व जमेकाचा धावपटू - दोन्ही ऑलिंपिक वीर.)

दुसरा विचार असा की, निर्णय घेणाऱ्या जीवाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम शरीर करीत असल्याने ते जीवाचे जीवन जगण्याचे साधन आहे. उदा. जीवाने परगावी जाण्याचा निर्णय घेतला तरी त्याला प्रत्यक्ष वाहनात नेऊन बसविण्याचे काम शरीरच करते. शरीर दुबळे असेल तर निर्णय होऊनही तो अमलात येत नाही. साधन हे वापरणाऱ्यापासून नेहमी वेगळे असते. एकूण माझे शरीर हे साधन म्हणून वापरण्यासाठी मला दिले गेले आहे. ते 'मी' तर नाहीच, पण ते माझेही नाही. त्यामुळे शरीर हे मला राहण्यासाठी काही मुदतीने मिळालेले घर आहे.

शरीर हे घर चंद्रमौळी झोपडीपासून भव्य राजवाड्यापर्यंतच्या कोणत्याही घरात राहू शकते. हे घरही कागदोपत्री त्यात राहणाऱ्याच्या मालकीचे असले तरी देहरूपी घरात ज्याप्रमाणे जंत, जंतू इ. इतर प्राणी राहतात, त्याच प्रमाणे ह्याही घरात पाली, कोळी, डास, झुरळे, वाळवी, भुंगे इ. राहतात. घर बांधण्यास शासनाची परवानगी लागते व त्याचा करही भरावा लागतो. घर वडिलार्जित असेल तर संबंधितांच्या संमतीशिवाय ते विकताही येत नाही. त्यात भाडेकरू ठेवला तर तो निघता निघत नाही. शेवटी मृत्यूनंतर घराच्या मालकाची त्याच्या देहरूपी घरासह चितेवर रवानगी होते! ह्यामुळे हे दुसरे घरही माझे असे निरपवादपणे म्हणता येत नाही.

वरील दोन्ही घरे राहण्याचे जग (पृथ्वी) हे तिसरे घर आहे. ह्या घरामध्ये महापूर, आग, धरणीकंप, दंगली, लढाया, इत्यादी कारणांनी प्रचंड उलथापालथी होऊन पहिली दोन घरे पूर्णपणे नष्ट होण्याचा संभव असतो. अमेरिकेतील न्यू ऑर्लिन्स, बिहारमधील कोसी नदीचा जलप्रलय, मोहेंजोदरो इ. उदारहणे प्रसिद्ध आहेत. रोम शहराच्या आसपास पडलेली घरे, श्रीलंकेतील अनुराधापूर इत्यादी ह्या वास्तवाची साक्ष देतात. पहिल्या दोन घरांच्या मानाने ह्या घराचे आयुष्य फारच मोठे असल्याने ते शाश्वत वाटते. पण 'प्रलय' ह्या कल्पनेत त्याचे भवितव्य सुनिश्चित झालेले आहे. अण्वस्त्रस्फोटांच्या अग्निप्रलयाची व्यवस्था अनेक राष्ट्रांनी चोखपणे करून ठेवली आहे. हा सर्व विचार केला तर पृथ्वीवर माणसाला 'पृथ्वी

हे माझे घर' म्हणणे शक्य नाही.

संत श्रीज्ञानदेवांनी ह्या तीन घरांच्या पलीकडील **'हें विश्वचि माझें घर। ऐसी मति जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।।'**(ज्ञाने. १२-२१३) ह्या भाषेत विश्वरूपी घराची निवड केली. ह्या घरात पृथ्वीसारखी अनेकानेक घरे सामावलेली आहेत. ह्या विश्वातील चर व अचर सृष्टीत श्रीज्ञानदेव व्यापून राहिल्याने **'विश्वाचे हे आर्त माझे मनीं प्रगटले'** अशी ग्वाही देऊ शकले. सर्व जीवसृष्टीशी ऐक्य साधले तरच असे होऊ शकते. माणसाच्या बुद्धीच्या आवाक्यात येण्यासारखे हे घर नसल्याने श्रीज्ञानदेव ह्या घरासंबंधी सांगून थांबले. **'यत् गत्वा न निवर्तन्ते तत् धाम परमं मम'** ह्या भगवान श्रीकृष्णदेवांनी सांगितलेल्या ब्रह्मरूप घराची त्यांची मिराशी असूनही ती माणसाला समजणार नाही म्हणून हे 'घर' त्यांनी सांगितले नाही. हे घर खरे तर घर नाही. पण पूर्वीच्या घरांच्या अपेक्षेने त्याला घर म्हटले एवढेच. **'तुका झालासे कळस'** ह्या उक्तीप्रमाणे संत श्रीतुकाराम महाराजांनी **'निरंजनीं आम्ही बांधियेले घर'** असे म्हणून पाचव्या घराची घोषणा केली. हे एकच 'घर' शाश्वत असून इतर सर्व घरे भ्रामक व अशाश्वत आहेत. म्हणून साधकाने त्या त्या घरात राहून त्यातील सर्व कर्तव्ये अनासक्तपणे पण प्रसन्नतेने पार पाडून, सुख-दुःखांच्या भोगांकडे तटस्थपणे बघत, निरपेक्षपणे जीवन जगावे. पाचव्या घराचे ब्रह्मसुख हेच सुख असून ते ब्रह्म अमर असल्याने अभयरूप व एकमेव असल्याने शांत आहे. त्या घरातील सुखरूप, निर्भय, निरपेक्ष व शांत जीवनात मानवी जीवनाचे साफल्य आहे.

***



# संतवाङ्मयाची फलश्रुती

वाणीमय असलेल्या वाङ्मयाचे साहित्य सरस्वतीप्रमाणे ज्ञानमय, कलापूर्ण व पवित्र असावे, हा विचार सारस्वताच्या वाङ्मयपुजाऱ्यांना त्या पूजेचे साहित्य तयार करतांना भावणारा आहे. **'साहित्यसोनियाच्या खाणी'** निर्माण करणारे संत ज्ञानदेव, **'वाचा बोलू वेद नीती'** हे वाङ्मयाचे स्वरूप सांगणारे तुकोबाराय व **'नाना विद्या कळा सिद्धी'** असणाऱ्या शारदास्वरूप सरस्वतीची उपासना सांगणारे समर्थ रामदास हे संतवाङ्मयाचे तीन थोर आधारस्तंभ आहेत. अलीकडील काळात संत गाडगे महाराज व तुकडोजी महाराज ह्यांनी बहुजनांना जागृत करणाऱ्या वाङ्मयाची रचना केली. वेळोवेळी व जागोजागी समाजाच्या लौकिक व अलौकिक हितासाठी झटणाऱ्या महाराष्ट्रीय संतांची परंपरा फार मोठी आहे. उत्तर भारतात भरारी घेणारे संत श्रीनामदेव, भागवत, रामायण व भारुडांसारखी रचना करून जनसामान्यांना अध्यात्मशास्त्र सांगणारे संत श्रीएकनाथ, ज्ञानदेव व नामदेवांची परीक्षा घेणारे संत श्रीगोरोबा, नामयाची जनी, चांगदेवांना अनुग्रह देणारी मुक्ताबाई इत्यादी फार मोठी संतपरंपरा आहे.

संतसाहित्याच्या फलश्रुतीचा विचार करतांना प्रत्यक्ष झालेली फलश्रुती व संतांच्या उपदेशाप्रमाणे वागल्याने होणारी संभाव्य फलश्रुती असा दोन्ही प्रकारे विचार करावा लागतो. त्याचबरोबर जीवनाच्या कोणत्या क्षेत्रात व किती प्रमाणात ती ती फलश्रुती होऊ शकते, त्याचाही विचार केला पाहिजे. संतवाङ्मय, त्या वाङ्मयाचे प्रत्यक्ष अनुष्ठान व त्याची फलश्रुती ह्यांत किती काळ जाणे शक्य आहे हेही पाहिले पाहिजे. व्यावहारिक व्यक्तिविकास, कौटुंबिक समाधान, सामाजिक सामंजस्य, न्याय व समता ही लौकिक जीवनाची अंगे असून वैराग्य, धर्म, तत्त्वचिंतन, सद्‌गुरुशरणागती, साधना व मोक्ष ही पारमार्थिक जीवनाची क्षेत्रे आहेत.

सामाजिक व राजकीय क्रांतीचे परिणाम त्यांतील अंगभूत दहशतीमुळे अल्पावधीत होतात. संतांच्या शिकवणीमध्ये सामंजस्य, मार्दव व उदारता असल्याने तिची फलश्रुती दीर्घकाळाने व जास्त करून व्यक्तिगत स्तरावर मिळते. मोगलांच्या आक्रमणाच्या ऐन धामधुमीमध्ये श्रीज्ञानदेव व एकनाथांच्या

वाङ्मयामुळे महाराष्ट्राची संस्कृती, धर्म व अस्मिता काही प्रमाणात टिकून राहिली. आक्रमणांच्या व्याप्तीच्या मानाने धर्मांतर ज्या अर्थी कमी झाले, त्या अर्थी त्यांच्या शिकवणीने लोकांना धीर येऊन पाय रोवून उभे राहण्याची प्रेरणा मिळाली असली पाहिजे. श्री समर्थ रामदास व जगद्गुरू तुकाराम महाराज ह्या संतांनी तेच कार्य पुढे चालविले व त्यांनी स्वातंत्र्याच्या पहाटेच्या मंद झुळका अनुभवल्या. श्रीशिवछत्रपतींचा त्याच काळात महान उदय झाल्याने संतांच्या शिकवणीला प्रत्यक्ष आकार आला. संत लोकशिक्षकाचे तर राज्यकर्ता लोकनेत्याचे काम करतो. श्रीशिवछत्रपतींच्या काळात महाराष्ट्राच्या भाग्याने महान व्यक्ती उदयाला आल्या. '**हडबडू गडबडू नका**' असा लोकांना धीर देणारे समर्थ, '**नाठाळाचे माथा काठी हाणणारे**' संत तुकाराम व '**श्रींचे राज्य व्हावे**' अशी भूमिका असणारे जाणते राजे, अशी त्रयी महाराष्ट्राच्या जीवनात तळपल्याने सर्वत्र प्रकाशाचे साम्राज्य पसरले. अन्यायाला जरब बसली. अन्य धर्मीयांचे छळ न होता हिंदू धर्म दिमाखाने उभा राहिला. संतांच्या व्यापक कार्याला मोकळी हवा मिळाली. देव, देश व धर्म ह्यांच्यासाठी लढणारे शूर वीर पुढे आले. पुढे छ. संभाजीराजांचा विश्वासघात, वीर धनाजी व संताजी ह्यांच्यातील वैर व पेशवाईच्या उत्तरार्धातील बेदिली ह्या राजकीय कारणांनी संतांची शिकवण तीच असून तिला राजकीय साथ न मिळाल्याने ब्रिटिश साम्राज्याचे पाय रोवले गेले. संतांच्या सहभागाने लाभलेली राजकीय फलश्रुती नष्ट झाली.

गेल्या सुमारे शंभर वर्षांपासून भारतातील दारिद्र्य, अज्ञान, लाचारी, विकृत श्रद्धा व प्रचंड भ्रष्टाचारामुळे भारताच्या सामाजिक जीवनाची दैना होत चालल्याचे स्पष्ट दिसते. ह्यांतील भ्रष्टाचाराच्या अक्राळविक्राळ राक्षसाचा समाजातील सर्वच अंगांत पुरेपूर प्रवेश झाल्याने अमानुष लोभ व उघड्यानागड्या स्वार्थाने समाजपुरुष व राष्ट्र पोखरून निघत आहे. ह्या परिस्थितीत संतवाङ्मयाचा प्रभाव फक्त ह्या परिस्थितीने होरपळणाऱ्यांवरच झालेला जाणवतो. ही परिस्थिती निर्माण करणारे सोईप्रमाणे देव, धर्म, संतवाङ्मय, उत्सव इत्यादिकांचा राजकीय वापर करतात. मतपेटीचा काटा जिकडे झुकेल तिकडे, भारताचा व समाजाचा विचार न करता धाव घेतात. 'श्रींच्या इच्छेचे' राज्य व चालू राज्य ह्यांत दोन ध्रुवांएवढे अंतर पडले. लोकशिक्षकापेक्षा लोकनेत्याचा जनमानसावरील प्रभाव



कितीतरी वाढला. कुटुंबाच्या चौकटीत संतवाङ्मय व घराबाहेर राजकीय प्रचारवाङ्मय अशी वाङ्मयाची वाटणी झाली. संतांनाही टीकेचे लक्ष्य केले जाऊ लागले.

दारिद्र्य, विषमता, अन्याय, भ्रष्टाचार व अज्ञान ह्यांचे निर्मूलन ही आज समाजाची तातडीची गरज बनली आहे. ह्या दृष्टीने संतवाङ्मयाकडे मदतीसाठी पाहिले तर राजकीय इच्छाशक्तीची पुरेपूर साथ असल्याशिवाय त्याला यश येणे अशक्य आहे हे उघड आहे. ही इच्छाशक्ती असणारे राज्यकर्ते घडविण्याचे कामही लोकशिक्षक संत व लोकनेते राज्यकर्ते ह्यांच्या सहकार्यातूनच होऊ शकते. भ्रष्टाचाराला बळी न पडणारे व तो कठोरपणे निपटून काढणारे राजकीय कार्यकर्ते ही आजच्या समाजाची खरी गरज आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या स्वस्थ, निर्भय, आश्वस्त, प्रगतिशील व उत्साही समाजाला संतवाङ्मयाच्या आधाराने सर्वांगीण प्रगती साधता येईल.

व्यक्ती, कुटुंब, समाज, धर्म, न्याय, नीती व मोक्ष ही पारमार्थिक वाङ्मयाची लक्ष्ये आहेत. केवळ मोक्षाचा विचार करून व ब्रह्म-मायादी वेदान्त अभ्यासून त्यासाठी आवश्यक त्या पूर्वतयारीचा विचार न केल्यास परमार्थ प्रांतात केवळ पंडितांचे साम्राज्य निर्माण होते. कलापूर्ण कीर्तने, विद्वत्तापूर्ण प्रवचने, श्रीमंतांच्या आश्रयाने चालणारे आश्रम, अखंड ग्रंथनिर्मिती, सकाम तीर्थयात्रा व व्रते, अभ्यासवर्ग, संतवाङ्मयावरील परीक्षा, सप्ताह, पाठपाठांतर, तीर्थक्षेत्रांचा विकास इत्यादी अनेक आयामांनी समृद्ध असलेल्या संतवाङ्मयाच्या फलश्रुतीचा गंभीर विचार करण्याची वेळ आली आहे. 'अंधश्रद्धा' निर्मूलन, राजकीय विघटन, सामाजिक चळवळी, जागतिकीकरणाचा भूलभुलैय्या, धार्मिक आक्रमकता, वाढती असुरक्षिततेची भावना व त्यामुळे तयार झालेली स्वार्थी संचयाची वृत्ती, इत्यादी संतवाङ्मयविरोधी आघाड्या तयार झाल्या आहेत. ह्यासाठी त्या वाङ्मयाची खरी फलश्रुती सतत समोर ठेवणे आता अनिवार्य आहे.

अस्सल संतवाङ्मयातून समाजाला स्थिर व तर्कशुद्ध श्रद्धेची प्राप्ती होणे अपेक्षित आहे. भाबडा विश्वास व विकृत श्रद्धेची जागा ह्या श्रद्धेने घेतली पाहिजे. पारमार्थिक साधक जेव्हा गीता, उपनिषदे, संतवाङ्मय व ह्या सर्वांवरील टीकाग्रंथांवर प्रथम श्रद्धा ठेवतो, तेव्हा ती 'अंध'च असते. ह्या सर्वांची

विश्वासार्हता वादातीत असल्याने ह्या 'अंध'श्रद्धेला पुढे पुढे पूर्ण डोळसपणाचे स्वरूप येऊन अनुभवानंतर तिचेही काम संपते. ज्या चातुर्वर्ण्यादी सिद्धान्तामुळे वाद निर्माण होतो ते समाजपुरुषाने नाकारले असून अस्पृश्यादी विकृत कल्पना तर छाटल्या गेल्या आहेत. ज्या संतांवर समाज श्रद्धा ठेवतो ते स्वत: पूर्ण आत्मानुभवी, विरक्त व त्यामुळे निरीच्छ होते. ज्ञानदेवादी भावंडे किमान साधनांवर जगत होती. श्रीसंत तुकाराम महाराजांनी श्रीशिवछत्रपतींकडून आलेले सर्व वैभव नम्रतापूर्वक नाकारले. श्रीसमर्थांचा उदरनिर्वाह भिक्षेवर होता. चोखामेळा, सावंता माळी, गोरा कुंभार हे महान संत सामान्य चरितार्थावर जीवन जगत होते. इमारत फंड, आश्रमाला मदत, भूखंडाची मागणी, अनुदान, पावती पुस्तके, इत्यादींचा वाराही त्यांना कधी लागला नाही. ह्या संतांच्या वाङ्मयाला फलश्रुतीची अपेक्षा असते. इतरत्र देखाव्याचे प्रमाण अधिक असते. भानामती, करणी, बळी, पिशाचे, देवदासी, इत्यादी विकृत श्रद्धांचा संतांनी कधीच पुरस्कार केला नाही. उलट त्यांच्यावर आसूडच ओढले. ह्या ज्ञानदेव तुकारामादी संतांनी त्यांना आलेल्या आत्मानुभवाच्या साधनापद्धतीचे व प्रत्यक्ष अनुभवाचे जे स्वरूपवर्णन केले आहे, त्यावर श्रद्धा ठेवून अधिकारी साधक वाटचाल करतो व तो अनुभव स्वत: घेतो. ही संतवाङ्मयाची व्यक्तिगत फलश्रुती आहे.

भारतातील दारिद्र्य, विषमता. अन्याय, विकृत श्रद्धा, इत्यादींचा विचार भारतीय समाजमानसात स्वाभाविकपणे घर करून आहे. ह्यासाठी संतवाङ्मय काय करते हा प्रश्नही मनात येतो. संतवाङ्मय हा संपन्न लोकांच्या घटकाभर करमणुकीचा विषय असल्यापासून ते संतवाङ्मय हे अपयशी, दरिद्री, निराश व जीवनापासून पळून जाणाऱ्यांचे आश्रयस्थान आहे, असे टोकाचे विरोधी विचार मांडले जातात. असे होत असले तरी त्यातूनही काही चांगले निर्माण होणे शक्य आहे. हे वास्तव बाजूला ठेवले तरी संतवाङ्मयाच्या खऱ्या फलश्रुतीचा व ती लाभण्यासाठी आवश्यक असलेल्या पूर्वतयारीचा जराही विचार न करता संतवाङ्मयासंबंधी उलटसुलट बोलले व लिहिले जाते. संतवाङ्मयाची पारमार्थिक व सामाजिक अशी ढोबळ वाटणी करणारे फार मोठी चूक करतात, कारण त्यांच्या मनात सामाजिक विचारांचे जबर प्राबल्य व परमार्थाचे तेवढेच अज्ञान असते. परमार्थाच्या मोक्ष कल्पनेत साधकाच्या चित्ताच्या शुद्धीला व



शान्तीला अपार महत्त्व आहे. ह्या दोन्हींचा समाजाशी थेट संबंध आहे. त्यामुळेच सर्व संत समाजात सातत्याने मिसळून राहिले. निगूढ अरण्यातील दुर्गम भागामध्ये त्यांनी स्वत:ला कोंडून घेतले नाही.

सामाजिक समता प्रस्थापित करणे, न्याय मिळवून देणे, दारिद्र्य निर्मूलन, व्यावहारिक शिक्षण, इत्यादी संतवाङ्मयाची उद्दिष्टेच नाहीत हे प्रथमच स्पष्ट करणे आवश्यक आहे. ह्या सर्व बाबींना कमी-जास्त स्पर्श केला गेला असला तरी ती प्रधान उद्दिष्टे नाहीत, हे संकोच न करता स्पष्टपणे सांगण्यास काय अडचण आहे? पारमार्थिक तत्त्वज्ञानानुसार प्रत्यक्ष साधना करतांना साधकांतील होणाऱ्या मानसिक व बौद्धिक परिवर्तनामुळे साधनेचा अवांतर परिणाम (Side Effect) म्हणून 'सामाजिक' ह्या सदरात मोडणारे बरेच सुपरिणाम सहजच होतात समाजाच्या प्रत्येक घटकाने आपापले कर्तव्य उत्कृष्ट रीतीने पार पाडावे, असा संतांचा आदेशच आहे.

**तैसें आपुलिया विहिता। उपायो असे न विसंबितां।**
**ऐसा कीजे कीं जगन्नाथा। आभारु पडे।।** ज्ञाने. १८-९१०

आपल्यासाठी नेमून दिलेले वा स्वीकारलेले कर्म इतके उत्कृष्टपणे व चुकारपणा न करता करावे की त्याचा देवाच्या मस्तकावर भार व्हावा. येथे लोभ व मिळकत हे कामाकडील प्रवृत्तीचे (Motivation) कारण नसून देवाची प्रसन्नता हे कारण आहे. पैसे मिळविल्याशिवाय चरितार्थ चालत नाही हे उघड आहे. त्यासाठी श्रीतुकोबाराय सांगतात, '**जोडोनिया धन उत्तम व्यवहारें। उदास विचारें वेच करी।।**'. संपत्ती चांगल्या व्यवहाराने मिळवावी व उदार मनाने योग्य कामासाठी खर्च करावी. श्रीसमर्थ ह्या संपत्तीविषयी सांगतात, '**मेळविती तितुकें भक्षिती। ते कठिण काळीं मरोन जाती।।**'(दास. १८-७-७). संपत्तीतील काही भाग शिल्लक ठेवावा. तो अडचणीच्या वेळी उपयोगी पडतो. असा कठीण काळ शक्य तर येऊ नये ह्यासाठी कुटुंब मर्यादित ठेवावे असाही सल्ला ते देतात - '**लेकुरें उदंड जालीं। तो ते लक्ष्मी निघोन गेली।।**'(दास. ३-४-१).

न्यायनीतीच्या आचरणाची शिकवण हा संतांच्या उपदेशाचा स्थायिभाव आहे.

**'पराविया नारी माऊली समान'** - संत तुकाराम

**'न्यायाची नीतीशी शेज भरी'** - संत ज्ञानेश्वर

**'बरे सत्य बोला येथातथ्य चाला'** - संत रामदास

**'असत्याचे बळ बैसले ये वाचे। ते न फिटे साचे तीर्थो-के'** - संत नामदेव

हल्लीचा श्रेयवादाने झपाटलेला काळ 'मी केले म्हणून झाले', 'माझ्यामुळे झाले', 'मी नसतो तर झाले नसते', 'माझ्यामागे कसे होणार' व विकृतीचा कळस म्हणजे 'एखाद्या कार्यात मी नसेन तर ते होऊ देणार नाही' हा आहे. ही संघर्षाची सर्व कारणे टाळून **'निमित्ताचा धनी केला असे प्राणी। मी मी म्हणोनी व्यर्थ गेला'** हा तुकोबारायांचा विचार सर्व संबंधितांना शांत करणारा आहे. साधकाच्या दृष्टीने हा सर्व भाग कर्मयोगाच्या अंतर्गत असला तरी त्याचे कौटुंबिक व सामाजिक सुपरिणाम सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट दिसतात. एवढे करूनही ह्या परिणामांना उद्दिष्टे म्हणून मान्यता नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.

संतवाङ्मयातील उपासनेलाही व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक आयाम स्पष्टपणे असल्याचे लक्षात येते. केवळ पूजापाठ, तीर्थयात्रा, नामजप, व्रत हे उपासनेचे पूर्ण स्वरूप नाही. श्रीतुकोबाराय म्हणतात, **'कोण्याही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे।'**. मत्सर, द्वेष, घृणा, तिरस्कार, सूड, हेवेदावे, तुलना, इत्यादी कारणांनी कुटुंब व समाजात भयानक परिणाम दिसतात. देवाचे भक्त म्हणविणाऱ्यांचेही 'त्यांच्या त्यांच्या' देवाशी मोठे सख्य असले तरी त्याच भक्तांचे आपापसांत मुळीच पटत नाही! प्रत्येकाने प्रामाणिकपणे उपासना केली तर स्वाभाविकपणे होणाऱ्या व्यावहारिक मतभेदांचे रूपांतर विकृत प्रकारे होणार नाही. श्रीसमर्थ म्हणतात -

**नारायेण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी।**
**याकारणें तोषवावी। कोणीतरी काया।।** दास. १५-९-२५

देव जर सर्व विश्वात भरून आहे तर तो प्रत्येक शरीरातही आहे. कोणी शरीरधारी जीव जर भुकेलेला व अडचणीत असेल तर त्याला आपल्या क्षमतेनुसार मदत करून संतुष्ट केले तर देवच संतुष्ट होतो. ह्याच उद्देशाने अन्नछत्रे, धर्मशाळा, रुग्णालये, आधारकेंद्रे इत्यादी चालविली जातात (पूर्त कर्मे). अशी उपासना करणे



हेही संतवाङ्मयाचे मुख्य उद्दिष्ट नाही. अशा उपासनेमुळे कुटुंब व समाज ह्या दोन्हींना मदत होत असली तरी त्याच उपासनेत रमणे व रंगणे अपेक्षित नाही. संतवाङ्मयाची ही मुख्य फलश्रुती नाही. संत श्रीज्ञानदेव उपासनायुक्त कर्माचे वर्म सांगतात -

**तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा।**
**पूजा केली होय अपारा। तोषालागीं।।** ज्ञाने. १८-८१७

सर्व जीवसृष्टीत व्यापून राहिलेल्या ईश्वराला स्वतःच्या कर्मांची फुले वाहून त्याची पूजा केली तर तो अत्यंत संतुष्ट होतो. बाप-मुलगा, सासू-सून, भाऊ-भाऊ, शेजारी, गावकरी, देशवासी, पशुपक्षी, इत्यादी सर्वात ईश्वर व्यापून राहतो. नित्याच्या पूजेत देवाला वाहावयाची फुले जशी सुंदर व सुगंधी असतात, त्याप्रमाणे स्वतःची कर्मरूप फुलेसुद्धा सुंदर व सुगंधी असावीत, म्हणजे वरील सर्व संबंधितांच्या बाबतीतील आपली कर्मे तशी असावीत. ह्यामुळे जीवन तणावरहित होऊन दैनंदिन व्यवहार, वेगवेगल्या क्षेत्रांतील व्यासंग व पारमार्थिक साधनेला मदत होते. संतांना अपेक्षित मोक्षाची पूर्वतयारी होते.

संतवाङ्मयाची मोक्ष ही मुख्य फलश्रुती आहे. समर्थ म्हणतात -

**आधीं तें करावें कर्म। कर्ममार्गें उपासना।**
**उपासकां सांपडे ज्ञान। ज्ञानें मोक्षचि पावणें।।** मानपंचक ३-१

कर्म, उपासना व ज्ञान ह्यांचा परस्पर संबंध सांगणारी ही ओवी आहे. शास्त्राला मान्य असलेल्या निष्काम कर्माने चित्तशुद्धी, तशाच उपासनेने चित्ताची शांती, शुद्ध व शांत चित्तात वैराग्य, गुरुकृपा आणि महावाक्य व आत्मानात्मादी विचाराने ज्ञानाचा उदय ही सर्वमान्य प्रक्रिया आहे. 'मी जीव नसून ब्रह्म आहे' असे स्थिर ज्ञान हेच मोक्षाचे स्वरूप आहे. संत ज्ञानोबा सांगतात -

**बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावी आपणां आपण।**
**ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण। तत्परायण अहर्निशीं।।** ज्ञाने. ५-८७

देहादी मी आहे हा भ्रम सोडून 'मी ब्रह्म आहे' असा बुद्धीचा सहज निश्चय झाला असता ब्रह्मनिष्ठा प्राप्त होऊन ती स्थायिभाव बनते. बंधनाचे कारण संत तुकोबा सांगतात - **'मुक्त होता परी बळें जाला बद्ध। घेऊनिया छंद माझे माझे।।'**. प्रत्येक जीव स्वरूपाने मुक्तच असून 'मी व माझे' ह्या अविद्यामूलक

नादाने तो जणूं बळजबरीने बद्ध झाला. ह्यातून सुटका होताच '**आनंदाचे डोहीं आनंद तरंग**' आणि '**अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिन्ही लोक।**' असा त्यांना आलेला अनुभव सर्वांना येणे शक्य आहे. संतवाङ्मयाची हीच मुख्य फलश्रुती असून त्यातच त्या वाङ्मयाचे सार्थक आहे.

* * *



# श्री मनाचे श्लोक

श्रीसमर्थांनी मनाच्या श्लोकातून मनाला उपदेश केला असे मानले जाते परंतु सत्ताविसाव्या श्लोकापर्यंत 'मना' हे संबोधन बरेचसे सांभाळल्यानंतर पुढे अडतिसाव्या श्लोकापर्यंत हे संबोधन नाही. अडतीसपासून पुढील आठ श्लोकांमध्ये ते आहे. पुढे हे संबोधन तुरळक झाल्यावर पंचाहत्तराव्या श्लोकात मनाऐवजी 'जिवा' हे संबोधन वापरले असून प्रत्येक 'मना'च्या ठिकाणी साधकाने 'जिवा' असे वाचणे शास्त्रशुद्ध आहे. पंचीकरण शास्त्राप्रमाणे मन हे वायुतत्त्वाचे व 'रजोगुणाच्या खांदीं तरळणारे' (ज्ञाने. अ.१३) असल्याने ते अचेतन व चंचल आहे. जिवंत शरीरात अन्त:करण चिदाभासावाचून गाढ झोपेशिवाय कधीच नसते. गाढ झोपेतही सुखाचा संस्कार घेणारी सूक्ष्म, अज्ञात अन्त:करणवृत्ती चिदाभासासह असली पाहिजे. त्यामुळेच त्या सुखाच्या संस्काराचे जागृतीत जीवाला स्मरण होते. 'मी सुखाने झोपलो होतो' हे त्या स्मरणाचे स्वरूप आहे. एकूण 'मना' हे संबोधन चिदाभासयुक्त मनालाच शक्य असल्याने ते प्रत्यक्षात जीववाचक आहे. अचेतनाला उपदेश शक्य नाही व तो व्यर्थ आहे. '**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे**' – मनातील चिदाभासालाच राघवरूप आत्म्यामध्ये वस्ती करता येईल, म्हणजे त्यात विलीन होता येईल. अचेतन मनाला चेतन राघवात तसे करता येत नाही. शुद्ध पाण्यात शुद्ध पाणीच, दोन्हींची शुद्धता कायम ठेवून एकरूप होऊ शकते. सगुण राघवामध्येसुद्धा चिदाभासयुक्त मनालाच वस्ती करता येते. कारण अचेतन मन स्वत:च्या प्रेरणेने तसे करू शकत नाही. त्रेचाळिसाव्या श्लोकात मनाला उपदेश करतांना '**सदा मानसीं तो निजध्यास राहो**' असे म्हटले आहे. 'मनाच्याच मनात' निजध्यास कसा राहील? म्हणून जीवाने संकल्प-विकल्प हा धर्म असलेल्या मनाने श्रीरामाचाच सतत संकल्प करावा, असा अर्थ होतो. (पाहा – ८८)

मन, बुद्धी, चित्त व अहंकार हे अन्त:करणाचे कार्यानुसार मानलेले चार घटक आहेत. सर्व संतांनी त्या चारींचा वापर नेमकेपणाने केला आहे. त्या त्या घटकात त्याला त्याच्या कार्याकडे प्रवृत्त करणारा बदल झाला की त्याला 'वृत्ती'

म्हणतात. उदा. मनोवृत्ती, चित्तवृत्ती, बुद्धिवृत्ती व अहंवृत्ती. समर्थ जेव्हा '**बुद्धी दे रघुनायका**'(करुणाष्टक) असे म्हणतात तेव्हा मन, चित्त हे शब्द न वापरता 'रघुनायकासंबंधी निश्चय करणारी बुद्धी दे व त्या बुद्धिवृत्तीने तोच निश्चय सतत ठेवू दे' असे मागणे मागतात. '**अहंतागुणें यातना ते फुकाची**' (९७) येथे अहं अहं म्हणून नाचणारी अहंवृत्ती व्यर्थ यातना देते असे ते सांगतात. '**मना सत्य संकल्प चित्तीं वसावा**' (१३०) ह्या मनाला (जीव) दिलेल्या आदेशामध्ये चित्तवृत्तीने सतत सत्य संकल्पच घट्ट धरून बसावा असे म्हटले आहे. '**तूं मन हें मीचि करीं**' (ज्ञाने.९-५१७), '**तुझे रूप चित्तीं राहो मुखीं तुझे नाम।**' (तुका), '**बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावी आपणां आपण।।**' (ज्ञाने), '**तैसा विचारूनि अहंकारू सांडिजे। मग असतीचि वस्तू होईजे**' (ज्ञाने) ह्या अन्य संतश्रेष्ठांच्या शिकवणीमध्येसुद्धा अंत:करणाचे हे घटक निश्चित अर्थाने वापरले आहेत.

सर्वच संतांनी कमी-जास्त प्रमाणात मनाशी संवाद करून त्याचे साधकांसाठी असलेले महत्त्व लक्षात आणून दिले आहे. तुकाराम महाराज '**मन तेचि गजानन गणपति**' असे म्हणतात. '**मन ओढी मना। बुद्धिबुद्धि क्षणक्षणां।**' (तु. ३४४) अशी प्रामाणिक साधकाची होणारी उलघाल ते स्वानुभवाने लक्षात आणून देतात. '**मन बळिया माजी बळी। करी राखरांगोळी धैर्याची।**' हे मनाचे अचाट सामर्थ्य नाथमहाराज सांगतात. '**चंचलंहि मन: कृष्ण प्रमाथि बलवत् दृढम्।**' अशी अर्जुन तक्रार करतो व भगवान श्रीकृष्ण ते तत्काळ मान्य करतात. भगवान शंकराचार्यांनी त्यांच्या उपदेशसाहस्रीमध्ये आत्मा व मन ह्यांचा मार्मिक संवाद रंगविला आहे. वास्तविक चेतन आत्म्याचा अचेतन मनाशी संवाद होऊच शकत नाही. तरी साधकाला बोध होण्यासाठी तो फार उपयुक्त आहे. आत्मा मनाला म्हणतो, 'हे मना, तू बाहेर जाऊन अनेक विषय घेऊन येतोस पण ते सर्व व्यर्थ आहे. कारण तू अचेतन असल्याने तुला विषयसुखाचा भोग घेता येत नाही व मी सुखरूप असल्याने मला त्यांची गरज नाही. तेव्हा ह्या उलाढालीचे अकारण श्रम तू घेऊ नकोस' (हे संभाषणाचे तात्पर्य आहे.) ह्या संवादाने साधकाच्या बुद्धीत लख्ख प्रकाश पडला पाहिजे.



मोक्षसाधनेच्या संदर्भात मनाची नेमकी भूमिका (Role) समजावून घेतली तर मनाचा नेमकेपणाने वापर करता येतो. साधनेच्या प्रक्रियांची जाण तयार होऊन काय घडावे, ते कसे घडते, घडण्यात अडचणी काय येतात, त्या कशा दूर कराव्यात, ह्यासंबंधी परिपूर्ण मार्गदर्शन मिळते. ह्यासंबंधी काही मूलभूत विचार संत सांगतात. '**अती आदरें शुद्ध क्रीया धरावी**' (१०५) ही समर्थांची आज्ञा पाळावयाची असेल तर '**मना वासना दुष्ट कामा नये रे**' (४) हे त्यांचे सांगणे नीट समजावून घ्यावे लागेल. वासना व शुद्ध क्रिया ह्यांचा परस्परसंबंध लक्षात घ्यावा लागेल. पुनर्जन्माचे मूळच वासना हे आहे हे '**जन्म घेणें लागे वासनेचे संगें**' (ए.ह. १-३) ह्यावरून लक्षात येते. म्हणून पुन्हा जन्म नको असेल तर वासना समूळ नष्ट झाली पाहिजे. '**इंद्रियांचा जय व वासनेचा क्षय**' झाला तरच '**अंतरीं ह्या थारा आनंदाचा**' (तुका.) असा 'आनंदघन रामाला न सांडता' अनुभव येतो. ही वासना चांगली किंवा वाईट असली तरी तिचा पुनर्जन्माच्या दृष्टीने तोच परिणाम होतो.

'त्याची वासना चांगली नाही' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा 'वासना' ह्या शब्दाचा 'प्रवृत्ती' असा अर्थ असतो. 'वासनेने बरबटलेला' हा शब्दप्रयोग लैंगिक आसक्तीच्या संदर्भात वापरतात. हे दोन्ही मूळ वासनेचे परिणाम असून वासना ही संकल्पना चांगली समजावून घेणे आवश्यक आहे. वासना सूक्ष्म असली '**तरी ते आहे**' असा समर्थ निर्वाळा देतात (दासबोध). शास्त्र व संत ह्यांनी वासना हे पुनर्जन्माचे मूळ आहे असे सातत्याने सांगितले आहे. देहवासना, लोकवासना, विषयवासना व शास्त्रवासना असे वासनेचे चार प्रकार आहेत व ह्या वासना पुनर्जन्माचे मूळ आहेत. केवळ भजी खाणे (रसनेचा एक विषय), संपत्तीचा हव्यास (विषयसुखाचे साधन), 'घरात वासना अडकून पडणे' (सुखासाठी ममत्वपूर्वक घराची अपेक्षा) एवढीच वासनेची लक्षणे नाहीत. देहवासना म्हणजे 'देह म्हणजे मी, देह मेला तर मी मरणार, देह आहे तर मी आहे, देहाचे कोडकौतुक करून तो मिरवावा' इत्यादी. 'लोकप्रिय असावे, चारचौघांत मिरवून उठून दिसावे, मानसन्मान, पुरस्कारादी मिळावेत' इत्यादी अपेक्षांना लोकवासना म्हणतात. 'शब्दस्पर्शादी पाच विषय व सत्ता-संपत्ती इत्यादी पाच विषय ह्यांत सुख आहे, ते अधिकाधिक मिळावे, ते असतील तर मी सुखी, त्या विषयांची

साधने असणारा सुखी असतो' इत्यादी विचारांना विषयवासना म्हणतात. 'अनेक शास्त्रांचे व विद्यांचे भरपूर ज्ञान असावे, शास्त्राभ्यासात आपण वरचढ असावे, ज्ञानाच्या कोणत्याही शाखांमध्ये गती असावी, शास्त्रचर्चेच्या प्रसंगी तोडीचा कोणी नसावा, शास्त्राची सर्वोत्कृष्ट मांडणी करता यावी' इत्यादी महत्त्वाकांक्षांना शास्त्रवासना म्हणतात. ह्या चारही वासनांचे मूळ स्वरूपसुखाच्या विस्मरणात व 'बाहेरून' सुखाच्या अनिवार अपेक्षेत आहे. देह नीट सांभाळून, स्वकर्म मन:पूर्वक व सौजन्याने केल्याने विद्याभ्यासामुळे लोकप्रियता मिळणे, प्रारब्धाने सहज येणारे विषय त्यांचे स्वरूप ओळखून भोगणे व मोक्ष आणि दैनंदिन व्यवहारांसाठी पुरेपूर ज्ञान असणे ह्या सर्व बाबी सहजपणे असणे व त्यांचा जबर हव्यास ह्यांतील फरक लक्षात घ्यावा. ह्या हव्यासाचे रूपांतर वासनेत होते. सहज असणाऱ्या सर्व बाबी थोड्या शास्त्रविचाराने झटकून टाकून म्हणजे त्यांच्यावर सुखासाठी अवलंबून न राहून वासनेतून सुटता येते. पण खरा वासनाक्षय '**रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते**' (गीता २-५९) ह्याच रीतीने होतो. म्हणजे आत्मज्ञान झाल्यावर वासनेच्या सर्व विषयांतील रस म्हणजे आवड, ओढ, आकांक्षा, इत्यादी दूर होतात.

पारमार्थिक शिकवणीमध्ये साधना हा विषय सर्वांच्याच जिव्हाळ्याचा आहे. त्या तत्त्वज्ञानात व त्याच्या साधनांत मनाची भूमिका कोणती आहे ते काठक श्रुतीतील मंत्रामुळे लक्षात येते.

**आत्मान९ रथिनं विद्धि शरीर९ रथमेव तु।**
**बुद्धिं तु सारथिं विद्धि मन: प्रग्रहमेव च।।**
**इन्द्रियाणि हयानाहुर्विषया९ तेषु गोचरान्।**
**आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिण: ।।४।।** ३-३

जीवात्मा = रथी म्हणजे रथात बसणारा. देह = रथ, बुद्धी = सारथी, मन = लगाम, इंद्रिये = घोडे , विषय = घोडे धावण्याचे मार्ग. जीव = रथी = भोक्ता. येथे मनाच्या श्लोकांच्या संदर्भात लगामाचे महत्त्व आहे. सारथी लगामांच्या साह्याने घोड्यांचे नियंत्रण करतो व लगामामुळे सारथ्याला घोड्यांच्या हालचाली कळतात असे लगामाचे दुहेरी कार्य असते. टेलिफोनवर जसे ऐकतो व बोलता येते, तसे हे समजावे. सामान्य माणसाने म्हणजे रथातील जीवाने मनाचे लगाम बुद्धिरूप



सारथ्याच्या हातात दिलेले आहेत. ही बुद्धी वासनेच्या आज्ञेनुसार निर्णय घेते, घेतलेले निर्णय मनामार्फत इंद्रियांपर्यंत पोहोचविले जातात. ज्याप्रमाणे घोड्यांच्या हालचालीप्रमाणे लगामामार्फत घोड्यांची दिशा, थकवा, प्रवृत्ती, चुकारपणा, अडेलपणा, इत्यादी सारथ्याला कळतात त्याचप्रमाणे ज्ञानेंद्रियांना मिळालेली माहिती मनामार्फत बुद्धीपर्यंत पोहोचते, त्या माहितीनुसार निर्णय घेणारी बुद्धी ते निर्णय वासनेच्या आज्ञेनुसार घेते. येथेच मनाची टेलिफोनप्रमाणे दुहेरी भूमिका लक्षात घ्यावी. उदा. डोळा ह्या इंद्रियाने मनामार्फत जीवाला कोणतेही रूप वा दृश्य दिसते. त्याचबरोबर जीव मनामार्फत जीवाला हवे असलेले रूप वा दृश्य डोळ्यांना पाहावयास सांगतो. डोळे काम करीत असले की, त्यांनी पाहिलेली रूपे व दृश्ये जीवाला अनावरपणे जाणावीच लागतात व जीवाने आज्ञा केल्यावर डोळ्याला जीवाला असे ते दृश्य दाखवावेच लागते. ही दोन्ही कामे मनामार्फत होतात. ही मनाची दुहेरी भूमिका साधनात फार महत्त्वाची आहे. ही भूमिका श्रीज्ञानदेवांच्या ओवीच्या आधाराने समजावून घेता येते.

**अर्जुना समत्व चित्ताचें। तें चि सार जाण योगाचें।**
**जेथे मन आणि बुद्धीचें। ऐक्य आथी।।** ज्ञाने. २-२७३

मन व बुद्धीचे ऐक्य झाल्याने होणारी चित्ताची समता हे योगाचे सार आहे. येथे 'योग' ह्या शब्दाचा 'जीव-आत्मा ह्यांचे ऐक्य' असा अर्थ घ्यावा व आत्म्याला जोडली जाण्याची प्रक्रिया हेच योगाचे मुख्य स्वरूप व त्याचा हेतू आहे. योगी अरविंद योगसाधनांना 'कृत्रिम योग' (Artificial) म्हणतात व नित्यसिद्ध योगाला अकृत्रिम वा सहज म्हणतात. जीव व आत्मा ह्यांचा योग नित्यसिद्ध असून अज्ञानामुळे वियोग झाल्यासारखा वाटतो. तो साधनांनी 'घडवून आणला' असे वाटले की त्याला अकारण 'योग' हा शब्द वापरला जातो. ह्या ओवीत मन, बुद्धी व चित्त ह्या तिन्हींच्या योगाच्या संदर्भात भूमिका सांगितल्या आहेत. योगाचे सार जी मुक्ती त्यात ह्यांना मोठ्या भूमिका आहेत. किंबहुना जीवन्मुक्त स्थितीत मोक्षापेक्षाही चित्ताच्या समत्वाला अधिक महत्त्व आहे.

वासनेने तिच्या पूर्तीसाठी फार मोक्याचे (Stratigic) ठिकाण निवडले आहे. ती बुद्धीच्या ठिकाणी राहते. '**संचित तैसी बुद्धी उपजे मनामधीं**' असे संत तुकाराम महाराज सांगतात. जीवाला नवा देह मिळाल्यावर संचित हे

प्रारब्धरूपाने त्याला मिळते. ह्या प्रारब्धानुसार जीवाने जगावे अशी व्यवस्था आहे. प्रारब्धानुसार जीवन जगण्यासाठी ज्या इच्छा निर्माण होतात, त्यांच्या पूर्तीसाठी **'पराञ्चिखाणि व्यतृणत् स्वयंभू'** ही व्यवस्था ब्रह्मदेवाने केली आहे. म्हणजे त्याने माणसाची ज्ञानेंद्रिये व मन बहिर्मुख केली आहेत. त्यामुळेच त्याला प्रारब्धानुसार सुखदु:खांच्या साधनांची इच्छा होते. बुद्धी वासनेनुसार निर्णय घेऊन मनामार्फत ते निर्णय इंद्रियांपर्यंत पोहोचविते. ती इंद्रिये सहजच बहिर्मुख असल्याने ताबडतोब निर्णयाच्या दिशेने हालचाली करतात. उदा. चहा पिण्याचा निर्णय झाल्यास तो वरीलप्रमाणे कार्यान्वित होतो. असा कडक चहा सतत पिणाऱ्याचे जठर सुजून त्यांत फोड आल्यास (Gastritis, Gastric Ulcer) त्याचे डॉक्टर त्याला चहा पिणे बंद करण्यास सांगतात. ही डॉक्टरांची आज्ञा कानाकडून मनामार्फत जीवाच्या बुद्धीला कळविली जाते. ही आज्ञा वासनेच्या आज्ञेच्या विरोधी असल्याने बुद्धीमध्ये दोन्ही आज्ञांचा संघर्ष सुरू होतो. अनेक औषधे घेऊनही चहा सोडण्यास पर्याय न राहिल्यास जीव वासनेच्या आज्ञेकडे हळूहळू दुर्लक्ष करून डॉक्टरांची आज्ञा पाळू लागतो. एक दिवस मनाकडून बुद्धीला जाणारी डॉक्टरांची आज्ञा प्रभावी ठरून बुद्धी वासनेचा निर्णय धुडकावून मनामार्फतच इंद्रियांना चहा न पिण्याची आज्ञा देते. ह्या वेळी मन व बुद्धी ह्यांचे ऐक्य होऊन चित्त चहा ह्या विषयाकडे धाव घेत नाही, त्याचे चिंतन करीत नाही. वासनेनुसार बुद्धीकडून होणाऱ्या आज्ञा नको अशा विषम रीतीने फिरणारे चित्त चहाविषयी 'नको' ह्या समबुद्धीने राहते. ह्याप्रमाणे 'मी देह', 'जग सत्य', 'मी कर्ता' इत्यादी निर्णय वासनानुसारी असतात. गीता उपनिषदादी शास्त्रांचे 'मी ब्रह्म, 'जग मिथ्या', 'आत्मरूप मी अकर्ता' असे निर्णय असतात. श्रवणाने हे निर्णय बुद्धीपर्यंत सातत्याने पोहोचविले तर ते हळूहळू जुन्या निर्णयांना पुसून टाकतात. जुन्या नव्यात हेलकावे खाणारे चित्त 'मी ब्रह्म' ह्या नव्या निर्णयाला धरून बसते. त्याचे हेलकावे थांबतात. ते समत्वाने आत्मस्वरूपात स्थिर होते. हेच योगाचे सार आहे.

***



# तन्निष्ठस्य मोक्षोपदेशात्

ब्रह्मसूत्रातील पहिल्या अध्यायातील पहिल्या पादातील हे सातवे सूत्र आहे. सांख्य दर्शनाच्या खंडणाचा त्यातील भाग सोडून देऊन 'आत्मनिष्ठाला मोक्ष मिळतो' एवढाच भाग स्वीकारून त्याचा विचार करण्याचे योजिले आहे. मोक्ष कल्पनेचा भारतीय दर्शनांत गंभीर विचार केला असून उत्तरमीमांसा शास्त्रातील मोक्षविचार येथे सांगावयाचा आहे. स्वामी विवेकानंद, बहुतेक भारतीय संत, योगी अरविंद, रमण महर्षी, स्वामी शिवानंद, स्वामी चिन्मयानंद इत्यादी प्राचीन व अर्वाचीन महात्म्यांनी त्याचाच स्वीकार केला आहे.

मोक्ष म्हणजे मुक्ती किंवा सुटका. ही बंधनसापेक्ष कल्पना आहे. ह्या बंधनाचा व त्याच्या परिणामांचा पुरेसा विचार केल्याशिवाय मोक्ष हा शब्दच अस्पष्ट राहतो. परमार्थाला गूढता, यांत्रिकता व अति भावनिकता ह्या गोष्टी चिकटलेल्या आहेत. गूढतेमुळे पंडितांचा बडेजाव वाढतो, यांत्रिकतेमुळे बहिरंग शोभिवंत होतात व अति भावनिकतेमुळे भावनेच्या भरधाव घोड्यावर बसणाऱ्याला बसण्यासाठी खोगीर, तोल सांभाळण्यासाठी रिकिबी व हातात लगाम नसल्याने घोडा नेईल तिकडे भरधाव पळावे लागते. ब्रह्मसूत्रांची गूढ रचना, श्रीहाट, गोल्हाट इ. चक्रांची गूढ नावे व भावनारूढ भव्य उत्सव ह्यामध्ये मोक्षाची इच्छा असणाऱ्याला मार्ग काढणे अवघड वाटते. विशेषत: अधिकारी श्रीगुरूंचे मार्गदर्शन नसेल तर मोठीच कुचंबणा होते. वेदान्तशास्त्र असे सांगते की बंधन हे कल्पित असून तत्सापेक्ष मोक्षही अर्थात काल्पनिकच आहे. अविद्या किंवा मायेच्या आश्चर्यकारक सामर्थ्यामुळे हे घडते. शतश्लोकीमध्ये भगवान शंकराचार्य मायेचे चार प्रकारचे सामर्थ्य सांगतात –

**चत्वारोऽस्या: कपर्दा युवतिरथ भवेन्नूतना नित्यमेषा।**
**माया वा पेशला स्यादघठनघठनापाटवं याति यस्मात्।**
**स्यादारंभे घृतास्या श्रुतिभववयुनान्येवमाच्छादयन्ती।**
**तस्यामेतौ सुवर्णाविव परपुरूषौ तिष्ठतोऽर्थप्रतीत्या।।२६।।**

सामर्थ्य पहिले – अनिर्वचनीय माया नित्यनूतन म्हणजे चिरतरूण आहे. शरीराच्या

व जगाच्या जीर्णतेबरोबर ती जराही जीर्ण होत नाही. सामर्थ्य दुसरे – माया फारच कार्यकुशल आहे. सर्वथा असंभवनीय वस्तूंची विविध प्रकारे रचना करून सर्व जीवांना मोहित करते. अघटित घटना घडविण्यात ती पटाईत आहे. सामर्थ्य तिसरे – सुरुवातीला गोड वाटणारी ही माया परिणामत: विषासारखी फळे देते. सामर्थ्य चौथे – श्रुतीच्या महावाक्याने होणाऱ्या ब्रह्मज्ञानावर ती आवरण घालते. ह्यामुळेच बंधन निर्माण झाले आहे असे वाटते. हे बंधन एवढे सहज आहे की, 'मी बंधनात आहे' असे सुद्धा बंधनाचे परिणाम भोगणाऱ्याच्या लक्षात येत नाहीत. विवेकसिंधूकार म्हणतात –

**जरि अविद्याबंधन साच होते। तरि ज्ञानाचेनि बापेंहि न लोटते।**
**देवासि थोर सायास पडते। बंध मोक्षाचे।।** पूर्वार्ध ५-३४

जर अविद्येचे बंध सत्य असते तर ज्ञानाच्या बापालाही ते सोडविता आले नसते. कारण '**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सत:।**'(२-१२) असा गीतेचा सिद्धान्त आहे. ईश्वराला जे शुद्ध सत्त्वगुणाचे बंधन आहे त्यातून सुटण्यासाठी त्यालाही खूपच कष्ट घ्यावे लागले असते. कारण सृष्टीच्या नाशाबरोबर ईश्वर सहजच मुक्त होतो असे शास्त्र सांगते.

अविद्येच्या ह्या बंधनातून निर्माण होणारी दु:खे ज्याला खरोखरीच मुळापासून नाहीशी करावयाची आहेत तोच त्या दिशेने विचार करू लागतो. जीवनात सुखे व दु:खे असणारच, सुखाने सुखी व्हावे व दु:खाने दु:खी व्हावे हे जीवनाचे स्वरूपच आहे. हे ज्याने स्वीकारले आहे, त्याला अविद्येच्या बंधनाचा विचारही करावासा वाटत नाही. पूर्वजन्मींची मोठी पुण्याई असेल तर हा विचार प्रकर्षाने होतो. '**बहुत सुकृताची जोडी। म्हणून विठ्ठली आवडी**' असे संत तुकोबा म्हणतात. त्याचबरोबर विचारी बुद्धिमंतही त्या दिशेने विचार करू शकतो. '**परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायात्**' (मुंडक १-२-१२) 'कर्माने मिळणाऱ्या फळांची चिकित्सा करून शहाण्याने वैराग्य सांभाळावे'. संतसंगतीचा लाभ करून घेतल्यास वा झाल्यासही शाश्वत हिताचा विचार मनात डोकावू लागतो. '**संताचे संगती मनोमार्गे गती। आकळावा श्रीपति येणें पंथें।।**' (ज्ञा. हरिपाठ ८-१). अनेक प्रलोभने दाखविली जाऊनही यमदेवावर परिपूर्ण श्रद्धा असलेला निचिकेत त्यांना म्हणतो – '**वक्ता चास्य त्वादृगन्यो न लभ्यो**' (कठ १-१-२२) शाश्वत तत्त्वाचे बाबतीत आपल्यासारखा जाणता वक्ताही मिळणे शक्य नाही. घरामध्ये जर ह्या दिशेने संस्कार होत असतील तरीसुद्धा सुखदु:खातीत सुखरूपासंबंधीच्या विचाराचे बीजारोपण होते. गुरुकुलात अभ्यास करतांना '**अथ अत: ब्रह्मजिज्ञासा**' (ब्र.सू. १-१-१) ह्यासारख्या विचारात वरील विचार करण्याची व्यवस्था होती. आता ती जवळ जवळ अस्तित्वात नाहीच म्हटले तरी चालेल. परंतु प्रवचन कीर्तनांच्या माध्यमातून आजही ती उपलब्ध आहे.



मानवी दु:खांची मूळ कारणे स्वत:चे शरीर व सभोवतीचे जग अशी दोनच आहेत. खरे तर शरीराचा जगातच समावेश होत असला तरी माणसाला 'स्व' सापेक्ष विचाराची एवढी सवय लागलेली आहे की ती गृहीत धरूनच दु:खमीमांसा करणे चांगले. 'आप मेला जग बुडाला' ही व्यवहारातील म्हण हेच सुचविते. '**आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति**' हा बृहदारण्यक श्रुतीचा सिद्धान्त 'आत्मा' व 'सर्व' अशी वाटणी करतो. जगाला लुटू पाहणारा व जगासाठी सर्वस्वाचा त्याग करणारा ह्या अत्यंत विरुद्ध ध्येय असणाऱ्यांनाही अशीच वाटणी केलेली असते. अहंता व इदंता म्हणजे मीपणा व हेपणा हा वेदान्त विचार, हे व्यावहारिक वास्तव गृहीत धरूनच बोलतो. देहाला जन्म, जरा व मरण ह्या अवस्था अनिवारपणे असतातच. ह्याच अवस्था सहा विकारांच्या भाषेतही सांगितल्या जातात. प्रथम वासनारूपाने असणे, जन्माला येणे, वाढणे, बदल होत जाणे, क्षीण होणे व मरणे हे सहा निसर्गदत्त विकार आहेत. त्यात रोग, अपघात, लढाया, खून, नैसर्गिक आपत्ती इत्यादी शरीराशी संबंध असलेल्या दु:खांची भर पडते. अपयश, अपमान, वैर, मत्सर, द्वेष, भय, अन्याय, असुरक्षितता, इत्यादी मानसिक दु:खे आहेत. ती दीर्घकाळ टिकतात. ह्या सर्व दु:खातून सुखाची वाट शोधण्याचा माणूस अनेक प्रकारांनी प्रयत्न करतो. पण त्यात निर्भेळ यश कोणालाच आजपर्यंत मिळालेले नाही. दु:खावरील उपाय करीत करीत ते सोसणे एवढेच माणसाला शक्य आहे. ह्या 'सोसण्यात' तळमळ, तडफड, रडारड, विव्हळणे, कोणाला तरी दोष देणे, उसासे सोडणे, आत्महत्या इत्यादींचा समावेश होतो. हा दु:खांचा सर्व कोलाहल थांबवून दु:खसंबंधरहित सुखरूपता अनुभवणे ही वेदान्तशास्त्राची जबर महत्त्वाकांक्षा आहे.

दु:खातून मुक्ती हे मोक्षाचे फार महत्त्वाचे अंग आहे. जन्ममरणाच्या चक्रातून सुटका हे महत्त्वाचे अंग असले तरी तो वरील मोक्षाचा अवांतर परिणाम आहे. देह व जगत् ह्यांची मीमांसा करून त्यांच्यातील शाश्वत व अशाश्वताचा (प्रत्येकातील) निवाडा शास्त्रबुद्धीने केल्याशिवाय मोक्ष सिद्ध होत नाही. वेदान्तशास्त्र व ते स्पष्ट करणारे संत ह्यांचेवरील अविचल श्रद्धेशिवाय हा निवाडा होणे अशक्य आहे. देहामध्ये व्यापून राहणारा जीव व ब्रह्मांडामध्ये व्यापून राहणारा ईश्वर ही चेतन तत्त्वे प्रथम श्रद्धेने व तर्काने समजावून घ्यावी लागतात. 'जीव जगात जीवन जगतो' हे वाक्य असे सांगते की कमी किंवा जास्त ज्ञान असलेले जिवंत शरीर जगात त्याचे त्याचे जीवन जगते. ज्ञान असलेले ते चेतन व नसलेले ते अचेतन अशी जगात विभागणी आहे. जगण्यासाठी जी ऊर्जा लागते तिला प्राण म्हणतात. चेतन जीव त्याच्या देहातील प्राणशक्ती वापरून जगात जीवन जगतो. शास्त्रानुसार आत्मा (कूटस्थचैतन्य), बुद्धी व आत्म्याचा त्या स्वच्छ बुद्धीत व्यापून राहणारा ज्ञानरूप प्रकाश ह्या तिन्हींना मिळून जीव म्हणतात (आभासवाद). त्यांतील आत्मा हाच सद्रूप, चिद्रूप व आनंदरूप आहे. तोच सत् असल्याने शाश्वत आहे. चित् असल्याने ज्ञानरूप असून तोच आनंदरूप आहे. अविद्येचा परिणाम म्हणून हा आत्मा चिदाभासरूपाने बुद्धी व शरीराशी 'बुद्धी व शरीर मी' ह्या भ्रमात राहतो. ही दोन्ही नाशिवंत व प्रारब्धाधीन असून ह्या भ्रमामुळे तो त्यांची सुखे व दु:खे भोगतो. ईश्वर हे चेतन तत्त्व जगात अलिप्तपणे राहून त्याचे नियंत्रण करते. जगही नाशिवंतच असले तरी जीवाला ते शाश्वत वाटते. म्हणजे 'मी देह' व 'जग सत्य' ह्या दोन भ्रमांचे जीवाला बंधन पडते. त्यातून सुटका हाच मोक्ष होय. 'शरीर म्हणजे मी' ह्या भ्रमामुळे शरीर व अन्त:करणाची सर्व दु:खे मला होतात असे वाटते. शरीराच्या मरणाबरोबर मी मरणार असे वाटते व शरीराच्या संदर्भाने जगात कमाविलेले व संबंध आलेले सर्व सोडून 'जावे' लागण्याचे भयंकर दु:ख होते. वेदान्तशास्त्रानुसार आत्म्याला येणे व जाणे नाही. 'तो मी आहे' असा दृढ अनुभव आल्याशिवाय सुखरूपता येत नाही. तोपर्यंत मी जन्माला आलो, मी जगतो व मी मरणार ही भ्रमरूप बंधने दु:ख देतच राहतात.

आत्मनिष्ठा सांभाळल्याशिवाय मोक्ष लाभत नसल्याने ती सांभाळणे हे साधन आहे. इतर सर्व सहकारी साधने आहेत. प्रथम आत्म्याचे अस्तित्व श्रद्धा



व तर्काने बुद्धीला पूर्णपणे पटले पाहिजे. नंतर त्या आत्म्याशी निष्ठा ठेवण्याचे आड येणाऱ्या बाबीचा विचार करून त्या दूर सारण्याचा अभ्यास करावा लागतो. श्रीयमदेव वैराग्यमूर्ती असलेल्या नचिकेतला म्हणतात –

**अस्तीत्येवोपलब्धव्यस्तत्त्वभावेन चोभयो:।**
**अस्तीत्येवोपलब्धस्य तत्त्वभाव: प्रसीदति।।** कठ २-३-१३

''आत्मा निश्चितपणे आहेच' म्हणून त्याचा दृढ भावाने स्वीकार करावा. असा स्वीकार करणाऱ्याला 'मी आत्मा आहे' असा अनुभव येतोच येतो'. ह्या तत्त्वाचा परोपरीने उपदेश करणाऱ्या श्रीगुरूंना यथाविधी शरण जावे. मुंडक उप. म्हणते – **'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणि: श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्।'** (१-२-१२) 'आत्मज्ञानाची इच्छा असणाऱ्याने श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ श्रीगुरूंना यथाविधी शरण जावे'. श्रद्धेच्या जोडीला तर्क वापरण्यास प्रवृत्त करितांना काठक श्रुती सांगते –

**स्वप्नान्तं जागरितान्तं चोभौ येनानुपश्यति।**
**महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति।।** २-१-४

'ज्या ज्ञानरूप आत्म्याच्या सत्तेवर जागृती व स्वप्न ह्यातील अनुभव सतत घेत असतो त्या व्यापक व श्रेष्ठतम तत्त्वाला जाणणारा बुद्धिमान माणूस कधीच शोक करीत नाही'. त्याला शोकाचे दु:ख होत नाही.

आत्मा आहे असे श्रद्धेने स्वीकारल्यावर करावयाचा तर्क – जागृतीमध्ये हजारो पदार्थांचे ज्ञान होते. ते याच ज्ञानेंद्रियांमार्फत अन्त:करणाच्या साह्याने जीवाला होते. प्रत्येक पदार्थज्ञानाचे वेळी त्या पदार्थाबरोबर त्याचे ज्ञान स्वतंत्रपणे आत येत नाही. ज्ञान होण्याची व्यवस्था 'आंतच' असली पाहिजे. जीव म्हणजे चिदाभासाला ते होते. चिदाभास गाढ झोपेत आत्मरूपात विलीन होतो. गाढ झोपेतच स्वप्न दिसते. गाढ झोपेत मन-बुद्ध्यादी शांत झाल्याने चिदाभास आत्मरूप होतो. प्राण फक्त जागे असतात. ज्याअर्थी गाढ झोपेत स्वप्नाचे ज्ञान होते त्याअर्थी ते ज्ञान होण्याची व्यवस्था त्याही अवस्थेत ज्ञानरूप आत्म्याच्या स्वरूपात आहेच. कारण स्वप्नात न पाहता 'दिसते', न ऐकता 'ऐकू येते'! गाढ झोपेत डोळे बंद असल्याने व अनुभवाला येणारे दूरचे पदार्थ नजरेच्या कक्षेत नसल्याने ते 'दिसणे' शक्य नाही. स्वप्नात होणारे आवाज प्रत्यक्षात झालेले

नसतात. म्हणून ते 'ऐकू येणे' शक्य नाही. म्हणून जागृती, स्वप्न व सुषुप्ती ह्या तीनही अवस्थात ज्ञानरूप आत्मा ज्ञानरूपाने सतत आहेच असा अनुभवाशी सुसंगत तर्क करता येतो. केन श्रुतीही प्रत्येक होणाऱ्या ज्ञानामागे ज्ञानरूप आत्मा असतो असे सांगते. '**प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विन्दते**' (२-२-४). '**जागृति स्वप्नीं पांडुरंग**' असा संत तुकोबांचाही अनुभव आहे.

'मी म्हणजे शरीर' व 'जग सत्य आहे' ही दोन मुख्य बंधने असून तीच दुःखाची कारणेही आहेत. या बंधनांना देहतादात्म्य भ्रांती व जगत्सत्यत्व भ्रांती असे म्हणतात. म्हणजे बंधने भ्रमात्मक आहेत. पंचमहाभूतांचे व त्रिगुणांचे शरीर व जग ही अचेतन व विनाशी आणि म्हणून असार आहेत. त्यांत व्यापून असणारे ब्रह्म सत्य आहे. हा अनुभव येण्यासाठी भगवान शंकराचार्य साधन सांगतात -

**लोकानुवर्तनं त्यक्त्वा त्यक्त्वा देहानुवर्तनम्।**
**शास्त्रानुवर्तनं त्यक्त्वा स्वाध्यासापनयं कुरु।।** वि.चू. २७१

जगातील जीवांचे (माणसे) चिंतन, देहाचा विचार व शास्त्रांचा हव्यास सोडून स्वाध्याय सातत्याने करावा. दृश्य जग मायिक आहे हे लक्षात घेऊन त्यासंबंधी जरूर ती कर्तव्ये मनापासून व सांख्यबुद्धीने करावीत (गीता अ. २ व ३). जग व माणसे ह्यांचा एवढाच संबंध ठेवून त्यांचे वायफळ चिंतन करू नये. देहाचे आरोग्य सांभाळून व्यवहारात वाईट दिसणार नाही एवढीच देहाची व्यवस्था करावी. कर्मकांडात्मक शास्त्रे पाळण्यामागे लागू नये. हा वाचणारा सर्व वेळ आत्मानात्म, सारासार, आदि-अनादि, सान्त-अनन्त इत्यादी चिंतनासाठी वापरावा. नामस्मरण व ध्यानाची त्याला जोड द्यावी. ही जोड अधिकारानुसार द्यावी लागते. अशा रीतीने आत्मनिष्ठा सांभाळल्याने अनात्म्याचा बडिवार हळूहळू कमी होऊन आत्मनिष्ठा सांभाळणारा जीव आत्मस्वरूपात अवगाहन करतो. अनात्म्यासंबंधी होणाऱ्या कल्पनांच्या लाटा ओसरून वृत्ती आत्मस्वरूपी स्थिर होते.

**जेवीं डोळ्यांचें पडळ फिटे। तेथ प्रकाशेंसीं सविता भेटे।**
**तेवीं कल्पनालोपें प्रगटे। नेटेपाटें परब्रह्म।।** ए.भा. ३-७५०

'मोतिबिंदू काढताच उजेडासह सूर्य दिसतो. त्याप्रमाणे कल्पना नाहीशा होताच



ज्ञानासह आत्मदर्शन होते'. कल्पनेमुळे काम व कामामुळे कल्पना ही चक्राकार गती रोखण्यासाठी कल्पनालोप व कामशांती ह्या दोन्हींची गरज आहे. '**यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदिश्रिता:**' (कठ २-३-१४) ह्या सांगण्यानुसार कामना आवरत्या घ्याव्या. कल्पना करणाऱ्या मनाला '**युञ्जान: प्रथमं मनस्तत्त्वाय**' (श्वेता. १-२-१) - आत्मतत्त्वाशी खिळवून ठेवावे.

आत्मनिष्ठा सांभाळल्यामुळे मोक्षाचे अनेक पदर उलगडू लागतात. उदा. '**भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्व संशया:। क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे।।**' (मुंडक २-२-८). देहतादात्म्य निर्माण करणाऱ्या अविद्याग्रंथी तुटतात. स्वरूपासंबंधी सर्व संशय नष्ट होतात. शुभाशुभ कर्मांचा नाश होतो. '**ब्रह्मैवेदं विश्वमिदं वरिष्ठम्**' (मुंडक २-२-११) हे सर्व विश्व ब्रह्मरूप आहे असा अनुभव येतो. '**तत्र को मोह: को शोक: एकत्वमनुपश्यत:**' (ईश ७) मोह व शोक यांचा नाश होऊन सुखरूपता येते. '**आनंदाचे डोही अनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे।।**' (तुका.) ही मोक्षाची परमोच्च अवस्था प्राप्त होते.

***

# श्रवण

**'निर्गुण ब्रह्म तें निश्चळ। अंतरीं बिंबलें'** हे समर्थांच्या सर्व शिकवणीचे सार आहे. स्थल, काल व प्रसंगानुसार जीवनाच्या सर्व अंगांना त्यांनी कमी-जास्त स्पर्श केला असला तरी त्यामध्ये या साराचा स्पर्श कधीच सुटलेला नाही. वाचक सावध नसेल तर तो स्पर्श होऊनही निसटून जातो. नित्य-अनित्य, सत्य-असत्य इ. विवेकांपेक्षा त्यांचा सार-असार विवेक अधिक लाडका आहे हे सहज लक्षात येते. 'अध्यात्मसार' (१७-३-१०) हा प्रचितीचा विचार आहे असे समर्थ म्हणतात. आत्मा किंवा ब्रह्म हेच अध्यात्माचे सार आहे. हे सार स्पष्ट होण्यासाठी ऐकीव, भावनिक, भाबड्या अशा पारंपरिक बाबींना थारा न देता शास्त्रशुद्ध, तर्कसंगत व अनुभवसिद्ध बाबींचाच विचार करावा असा त्यांचा आग्रह आहे. श्रवणाचे चार समास दासबोधात असले तरी त्यांतही दशक ७ समास ९ व दशक १७ समास ३ चे महत्त्व अधिक आहे.

दासबोध ७/९ मध्ये श्रवणासाठी वक्ता व ग्रंथ कसा असावा त्याचे मार्गदर्शन केले असून ते मार्मिक व प्रामाणिक साधकाला विचार करावयास लावणारे आहे. प्रथम वक्त्याचा विचार केला आहे.

**येक वग्तृत्व श्रवणीं पडे। तेणें जाले समाधान मोडे।**
**केला निश्चय विघडे। अकस्मात।।** ७-९-२
**तें वग्तृत्व त्यागावें। जें माईक स्वभावें।**
**जेथे निश्चयाच्या नांवें। सुन्याकार।।** ७-९-३

वक्ता, त्याचे व्यक्तिमत्व, वक्तृत्व व वक्तव्य असे श्रवणाचे चार घटक आहेत. परमार्थाच्या दृष्टीने त्यांतील वक्तव्य हे सर्वांत महत्त्वाचे आहे. बाकीचे तीन घटक पूरक आहेत. वक्ता या घटकात लिंग, रूप, वर्ण (त्वचेचा), वस्त्रे इत्यादी बहिरंगाचा समावेश होतो. व्यक्तिमत्वामध्ये बुद्धीचा विकास, प्रसन्नता, आवाजावरील नियंत्रण, हावभाव, सभ्यता, मर्यादशीलता इत्यादींचा विचार करावा लागतो. वक्तृत्वामध्ये नाट्य, पाठपाठांतर, सहजता, शब्दांच्या फेकी, वचनांची उधळण, परिणामकारक वाक्यांच्या योजना, वाङ्मयीन मूल्ये,



प्रसंगावधान, वाणीचे उढउतार, चालू परिस्थिती व घटनांचे भान इत्यादी अनेक आयामांचा समावेश असतो. या सर्वांहून वक्तव्य म्हणजे जे सांगावयाचे ते अधिक महत्त्वाचे असते. श्रोत्याने श्रवण संपल्यावर वक्तव्य घरी नेणे आवश्यक आहे. पहिले तीन घटक श्रवणाच्या ठिकाणीच त्यांचा आनंद घेऊन सोडून द्यावेत. 'माईक' वक्तृत्व तर तिथल्या तिथेच झटकून टाकणे महत्त्वाचे असते. माईक वक्तृत्वाची तीन लक्षणे समर्थ सांगतात - १) वक्तव्यासंबंधी स्वतः वक्त्याचाच निर्णय झालेला नसणे २) त्याचे व्याख्यान ऐकेपर्यंत श्रोत्याचे आधी झालेले यथार्थ समाधान मोडणे ३) श्रोत्याला संशयात पाडणे. वक्त्याचेच संशय गेलेले नसल्याने वरीलप्रमाणे वक्तृत्वाच्या झपाट्यात तो श्रोत्याला गुंग करतो, वेळ मारून नेतो. श्रोता व वक्ता या दोघांचे संशय न जाण्याचे कारण समर्थ सांगतात -

**मायादेवीच्या धांदली। सूक्ष्मीं कोण मन घाली।**
**समजला त्याची तुटली। संदेह वृत्ती।।** दास.१७-३-१९

सालाबादप्रमाणे श्रवणाचे कार्यक्रम उरकणारे संयोजक, जास्तीत जास्त कार्यक्रमात प्रबोधन करणारे पट्टीचे वक्ते व उत्सवाच्या वातावरणात श्रवण करणारे श्रोते अशी युती एकत्र झाल्यावर **'निजध्यासें साक्षात्कार'** (१७-३-३) हा भाग गौण झाला नाही तरच नवल. अर्थात या मायादेवीच्या धांदलीतूनच ती पार करू पाहणारे साधकही उदयाला येतात, हेही अगदी खरे आहे. त्यांच्यासाठीच समर्थ त्यांना जाग आणणाऱ्या सूचना देतात. मायेच्या सतत अमलाखाली राहणारी माणसे स्थूलाचा नाद सोडून सूक्ष्माचा वेध घेण्याचा प्रयत्नच करीत नाहीत. अशा माणसांना त्या प्रयत्नाकडे हळुवारपणे नेणारा वक्ता कसा असावा व कसा नसावा याचे मार्गदर्शन करण्यासाठी १७-४ हा पूर्ण समास खर्ची पडला आहे. वक्ता कसा नसावा हे समर्थ दृष्टांतासह सांगतात -

**पोहणारचि गुचक्या खातो। जनास कैसा काढूं पाहातो।**
**आशय लोकांचा राहातो। ठाइं ठाइं।।** १७-४-४

वक्ताच जर प्रबोधन करताना गटांगळ्या खाऊन गुदमरत असेल, तर जागोजागी लोकांचे समाधान होणे अशक्य होऊन बसते.

परमार्थशास्त्राचे एकही क्रमविकासाचे क्रमिक पुस्तक नसल्याने प्रत्येक पारंपरिक ग्रंथामध्ये अत्यंत विरोधी वाटणारी विधाने केलेली असतात. या

विधानांतील विसंवाद दूर करून श्रोत्याचे समाधान करणारा वक्ता असावा. उदा.

**आपणचि बोलिला संव्हार। आपणचि बोलिजे सर्वसार।**
**दुस्तर मायेचा पार। टाकिला पाहिजे।।** १७-४-५

'दृश्य सृष्टीचा नाश होतो' व 'सर्व दृश्य सृष्टी ब्रह्मरूपच (सार) आहे' अशी अत्यंत विरुद्ध वाक्ये प्रबोधनात वापरली व त्यांचे यथाशास्त्र स्पष्टीकरण केले नाही, तर श्रोत्याचा गोंधळ होतो. पिंड ब्रह्मांडातील सर्व तत्त्वांचा निरास करून 'साररूप ब्रह्म मी आहे' ही अभ्यासाची व्यतिरेकी पद्धत आहे. म्हणजे 'हे मी नाही, हेही मी नाही' इत्यादी प्रकारे सर्व तत्त्वे मागे टाकत उरलेले अधिष्ठानरूप ब्रह्म मी आहे, असा वारंवार विचार करावा. ब्रह्मानुभव आल्यानंतर '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' या श्रुतिनुसार 'हे मी' 'हेही मीच' असा अन्वयी अनुभव येतो. यालाच '**रिता ठाव ह्या राघवेवीण नाही**' असा अनुभव म्हणतात. व्यतिरेकी साधनात माया गृहीत धरली असून अन्वयी अनुभवात मायेचा निरास झालेला असतो. व्यतिरेक ही साधना असून अन्वय हा अनुभव आहे. असे होण्यासाठी तरून जाण्यास अत्यंत कठीण असलेली माया कशी तरून जावी हे सांगितले पाहिजे. कोट्यवधी साधकांना व्यतिरेकाची साधना करून मुक्त होणेच आवश्यक असतांना भेदशून्य आत्मस्वरूपाचे नगारे वाजवून प्रत्यक्ष भेदाला म्हणजेच मायेला प्रतिष्ठा देणारा वक्ता 'बाष्कळ' समजावा. हे विधान विरुद्ध वाटले तरी हे एक पारमार्थिक वास्तव आहे. भेदाचा निरास होईपर्यंत साधकावस्थेत भेद मानूनच वाटचाल केली पाहिजे. कारण,

**तैसें सार आणि असार। अवघा झाला येकंकार।**
**तेथें बळावला अविचार। विचार कैंचा।।** १७-४-२३

भेदशून्य ब्रह्मामध्ये सार व असार हा भेद असणे शक्य नाही. त्यामुळे सार व असार एकच ठरतात. असार मागे टाकून, साराचा अनुभव येऊन, सारच सत्य आहे व असार मायिक आहे असा प्रत्यक्ष अनुभव आल्यानंतरच 'असार अधिष्ठानरूप असल्याने साररूप आहे' या बोलण्याला अर्थ आहे. पढिक शास्त्राभ्यासाने येणाऱ्या बाष्कळ तोंडाळपणाचे हे काम नाही. सामाजिक, राजकीय व धार्मिक सामंजस्यासाठी सर्व माणसांत अभेद आहे हे म्हणणे तत्त्वदृष्ट्या ठीक आहे, पण चोर व न्यायाधीश, स्त्री व पुरुष, हिरा व काच, पाणी व मृगजळ, राष्ट्राध्यक्ष व भिकारी, विद्वान व मतिमंद, बलवान व दुर्बल इत्यादींत भेद नाही, असे कोणीच म्हणत नाही. म्हणजेच व्यवहारात भेद असतो, पण ब्रह्मदृष्टीने तो नसतो हेच वास्तव आहे. म्हणून बद्ध व सिद्ध यांतील भेद लक्षात घेऊन व तो स्वीकारून बद्धाने सिद्ध होण्यासाठी साधना करावी. सत्संगती व कुसंगती, सत्व्यवहार व फसवणूक, सत्त्वगुणी आहार व रजोगुणी आहार यांतील भेद लक्षात घेऊन वाटचाल करावी. अन्वय व्यतिरेकाच्या बाबतीत समर्थ म्हणतात, -



**मायेकरितां कोणीयेक। अन्वय आणि वीतरेक।**
**ते माया नस्तां, विवेक-। कैसा करावा।।** १८-५-३२

प्रत्येक जीव तत्त्वदृष्टीने नित्यमुक्त असला व माया ही कल्पित असली तरी हे तत्त्वज्ञान अपरोक्ष होईपर्यंत तो जीव मायेने बद्ध होऊन सुखदुःखमय जीवन जगतो. मायेचा हा प्रभाव असेपर्यंत व्यतिरेकी साधना व अन्वयाचा अनुभव ही भाषा बोलावी लागते. मायेचा प्रभाव संपल्यानंतर व्यतिरेक व अन्वयाची भाषा बोलता येत नाही, कारण त्यातील फरकच नष्ट होतो. शेवटी समर्थ वक्त्याला एक मार्मिक सूचना देतात -

**मायेमधें बोलणें चालणें साचें। माया नस्तां बोलणें कैंचे।**
**याकारणें निशब्दाचें। मूळ शोधावें।।** १८-५-२७

मायेच्या शक्तीमुळे व मायेच्या अविद्येमुळे बोलणे शक्य होते. म्हणजे वाणी मायिक प्राणांच्या उर्जेमुळे बोलते व मायिक अविद्येमुळे निर्माण होणाऱ्या देहतादात्म्य, जगत्सत्यत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व, कालकल्पना, शब्द व त्यांचे नियत अर्थ, वक्ता, श्रोता, अन्तःकरण व जीव यांच्यामुळे बोलले जाते. म्हणजे प्रत्येक बोलण्यात वरील बाबींचा समावेश असतो. हे सर्व नसेल, तर बोलणे शक्यच होणार नाही. हा सर्व मायिक पसारा अध्यस्त असून अधिष्ठान आत्मा निःशब्द आहे. कारण तो अमन, अप्राण, अजिव्ह, कालातीत, अकर्ता व अभोक्ता आहे. (मुंडक उपनिषद १-१-६ व २-१-२). '**यतो वाचो निवर्तन्ते**', '**यन्मनसा न मनुते**' इत्यादी श्रुती व '**न मे बुध्यहंकार चित्तानि नाहं**' इ. आचार्य वाक्ये हेच सांगतात. हा निःशब्द आत्माच सर्व वाणींच्या सर्व व्यवहारांचे मूळ असून त्याचा शोध घ्यावा. त्याच्या सत्तेवर वाणीसह सर्वच व्यवहार चालत असले तरी तो स्वतः बोलत नाही व केवळ बोलून, ऐकून अनुभवालाही येत नाही.

**'नायमात्मा प्रवचनेन लभ्यो'** असे उपनिषद्‌ही सांगते, म्हणून वक्त्यानेसुद्धा वक्तव्याचा जो मुख्य विषय ब्रह्म, त्याच्या प्रत्यक्ष अनुभवासाठी सतत प्रयत्नशील राहावे. असे झाले तरच श्रोत्याचा बुद्धिभेद होऊन साधनेत गोंधळ होणे टळते. हल्ली अनेक संप्रदायांचे उदंड पीक आले असून, प्रत्येक संप्रदाय 'आमच्याशिवाय मोक्ष मिळणार नाही' असे ठासून सांगतो. राष्ट्रपतिपदाचे उमेदवारही त्यात अडकतात. उपनिषदे, गीता, आचार्य शंकर व ज्ञानदेव-तुकाराम-समर्थादी संतांच्या भव्यदिव्य परंपरेमध्ये जराही उणीव नसतांना व त्यांत कोणत्याही स्तरावरच्या किंवा अधिकाराच्या साधकाला तरून जाण्याची चोख व्यवस्था असतांना इतरत्र भरकटण्याचे काहीच कारण नाही. हल्लीचे काही संप्रदाय शरीराचे आरोग्य व मनाचे स्वास्थ्य, सकारात्मक विचार, आत्मविश्वास इत्यादींसाठी मार्गदर्शन करतात. त्यांचा मोक्ष कल्पनेशी संबंध फार बेताचा असतो. या सर्व बाबी व्यावहारिक जीवनासाठी महत्त्वाच्या असल्याने त्यांची अवश्य मदत घ्यावी, पण त्यांची परमार्थाशी गल्लत करू नये. भव्य आश्रम, थंड हवेचे ठिकाण, अत्याधुनिक स्वयंपाकघर, प्रचंड वाङ्मय, आंतरराष्ट्रीय प्रचार व शिष्य, प्रचारक्षमता (Marketing) इत्यादी बहिरंगाने प्रभावित होऊन 'जुने ठेवणे' दूर सारणे योग्य नाही. श्रीमंतांची वर्दळ, ख्यातनाम व्यक्तींचा आश्रय, शासकीय मान्यता, प्रसारमाध्यमांची मदत या सर्व बाबी दूर सारून अस्सल परमार्थाकडेच लक्ष द्यावे.

वक्त्यानंतर समर्थ ग्रंथाची निवड काय आधाराने किंवा कोणत्या निकषावर करावी ते सांगतात.

**जेथें संशय तुटती। होये आशंकानिवृत्ती।**
**अद्वैत ग्रंथ परमार्थी। श्रवण करावे।।** ७-९-५
**जो मोक्षाचा अधिकारी। तो परमार्थपंथ धरी।**
**प्रीति लागली अंतरीं। अद्वैतग्रंथाची।।** ७-९-६
**जेणें सांडिला इहलोक। जो परलोकींचा साधक।**
**तेणें पाहावा विवेक। अद्वैतशास्त्रीं।।** ७-९-७

अद्वैत वेदान्तशास्त्र ज्यात सांगितले आहे, अशाच ग्रंथांची निवड करावी. मायावादासह केवळ अद्वैत हे शांकर अद्वैतमताचे स्वरूप असून तेच अद्वैत समर्थांना अभिप्रेत आहे. सर्व मराठी संतांनी हेच मत स्वीकारून त्याची प्रभावी मांडणी केली आहे. **'द्वितीयाद्वै भयं भवति'** असे श्रुती सांगते. म्हणजे जेथे द्वैत असते तेथे भय असते. भयमुक्त जीवनासाठी अद्वैताचा अनुभव आवश्यक आहे हे उघड आहे. शुद्धाद्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत, इत्यादी अद्वैत तत्त्वज्ञानातील पोटभेद समर्थांसह कोणत्याच मराठी संतांनी स्वीकारलेले नाहीत. भ. शंकराचार्यांनी या तत्त्वज्ञानाची मांडणी केल्यावर त्यांच्या सुरेश्वराचार्यादी शिष्यांनी त्यासंबंधी संशय व आशंका राहणार नाहीत अशा ग्रंथरचना केल्या. पंचदशी, अद्वैतसिद्धी, विवरणप्रमेयसंग्रह इत्यादी ग्रंथांनी किरकोळ मतभेदांसह याच अद्वैताचे प्रतिपादन केले. विचारसागर रहस्य, विवेकसिंधू अशा ग्रंथांनी अद्वैताला सुव्यवस्थित आधार दिला. जो त्रिविध तापांनी पोळून अनुतापयुक्त झालेला आहे, ज्याचे पूर्वार्जित शुद्ध पुण्य उदयाला आले आहे किंवा यथार्थ श्रवणाने ज्याचा विवेक जागा झाला आहे, असा माणूस परमार्थाचा अधिकारी होतो. म्हणजे त्याला मोक्षाची तीव्र इच्छा निर्माण होते. याच वेळी त्याला अत्यंत योग्य मार्गदर्शनाची नितांत गरज असते. मोक्ष व अद्वैत हे समानार्थी शब्द आहेत, हे त्याला यथार्थ श्रवणाने समजल्यावर त्याला त्यासंबंधी उत्सुकता निर्माण होऊन मोक्षासंबंधी विचारांची ओढ लागते. अशा वेळी कोणत्याही बाह्य भपक्याला न भुलता सरळ गीता, उपनिषदे, त्यांवरील भ. शंकराचार्यांचे भाष्य व विपुल संतवाङ्मय यांचा अभ्यास करावा. स्वत:च्या बुद्धीने या वाङ्मयाचे नीट आकलन न झाल्यास या क्षेत्रातील कोणी जोडीदार शोधून, जेथे या सर्व वाङ्मयाचे पाठ, प्रवचने, कीर्तने चालू असतील त्यांचा, त्याच्याबरोबर लाभ घ्यावा. मात्र अद्वैत सोडून अन्य तत्त्वज्ञान सांगितले जात असेल, तर तेथून शांतपणे दूर व्हावे. कोणाची भीड धरू नये. समर्थ म्हणतात -

**आतां असो हें बोलणें। जयासि स्वहित करणें।**
**तेणें सदा विचरणें। अद्वैतग्रंथीं।।** ७-९-२६

ज्याला स्वत:चे हित म्हणजे परमार्थ साधावयाचा असेल त्याने सातत्याने अद्वैत ग्रंथांचा अभ्यास करावा. सुखाचा अखंड शोध घेणाऱ्याला द्वैत निवृत्त होताच येणाऱ्या सुखाविषयी समर्थ अनुभवाचे बोल सांगतात -

**सद्गुरुकृपा तेचि किली। जेणें बुद्धि प्रकाशली।**
**द्वैतकपाटें उघडलीं। एकसरीं।।** ७-२-१५

**तेथें सुख असे वाड। नाहीं मनास पवाड।**
**मनेंविण कैवाड। साधनाचा।।** ७-२-१६

सद्गुरुकृपेच्या किल्लीने द्वैताने बंद झालेली सुखाची कपाटे एकामागून एक उघडल्यामुळे बुद्धीत ज्ञानाचा प्रकाश पडला. या चिद्रूप प्रकाशात सहजच आनंद भरून राहिलेला असतो. या ठिकाणी मनाची वळवळ थांबून त्याला काहीच काम उरत नाही. हे साध्य होण्यासाठी –

**आत्मज्ञानी येकचित्त। तेणें पाहाणें अद्वैत।**
**येकांत स्थळी निवांत। समाधान।।** ७-९-२७
**बहुत प्रकारें पाहातां। ग्रंथ नाहीं अद्वैतापरता।**
**परमार्थास तत्त्वतां। तारूंच कीं।।** ७-९-२८

ज्याला एकाग्रचित्ताने आत्मानुसंधान साधावयाचे आहे, त्याने अद्वैत वेदान्ताचाच अभ्यास करावा. एकांत साधून देणाऱ्या ठिकाणी शांतपणे असा अभ्यास केला असता अद्वैतानुभवाचे समाधान मिळते. अनेक ग्रंथांचा अभ्यास करून खूप विचार केल्यावर असे लक्षात येते की, अद्वैत तत्त्वज्ञान सांगणाऱ्या ग्रंथासारखा दुसरा ग्रंथच नाही. मोक्षापर्यंत नेणारी ती एक न गळणारी होडी आहे.

ग्रंथ कसा नसावा तेही समर्थ सांगतात –

**ग्रंथ बहुत असती। नाना विधाने फळश्रुती।**
**जेथें नुपजे विरक्ती भक्ती। तो ग्रंथचि नव्हे।।** ७-९-३५
**श्रवणीं लोभ उपजेल जेथें। विवेक कैंचा असेल तेथें।**
**बैसलीं दुराशेचीं भूतें। तया अधोगती।।** ७-९-३७

उपासना व अध्यात्म या विषयांचे अगणित ग्रंथ आहेत. त्यातील कित्येक ग्रंथांमध्ये पूजादी अनेक विधाने सांगून त्याने मिळणारी अद्भुत फळे भरघोसपणे सांगितलेली असतात. अनेक समस्या, अडचणी व संकटांनी गांजलेल्यांची संख्या फार मोठी असून त्यांनी अशा ग्रंथांचा आधार घेणे स्वाभाविक आहे. अनेक महात्म्यांचे चरित्रग्रंथ या प्रकारचे असून त्यांत सांगितलेल्या फळांचे अनुभव आलेल्यांची संख्या बरीच मोठी आहे. त्यांच्याही पारायणांचे विशिष्ट विधान (नियम) असून शेवटी दान – भोजनादी सांगितलेले असतात. माणूस हा जीव असून तो प्रारब्धाने बांधलेला असल्याने सतत अपूर्णच असतो. ही अपूर्णता व



समस्यादी कधीच संपणाऱ्या नसल्याने अशा प्रकारची सकाम उपासना न संपणारी असते. त्यामुळे वैराग्य व खरी भक्ती कधीच निर्माण होत नाही. या दोन्ही ज्यात नसतील त्या ग्रंथाला पारमार्थिक मूल्यच नसते. असे ग्रंथ वाचल्यावर व त्यांची पारायणे केल्यावर लोभच अधिकाधिक वाढत जातो. आत्माच सत्य असून देहजगतादी मिथ्या आहेत, हा विवेक होण्याला तेथे अवसरच मिळत नाही. कारण सकामतेचे हेच दोन प्रमुख विषय असतात. हे सकामतेचे विषय अधिकाधिक वाढत जाऊन ते न मिळाल्याने जणू त्या विषयांची पिशाचे तयार होऊन ती मानेवर बसतात. अशा आशाळभूताला सुखदुःखांच्या द्वंद्वमय जीवनाची व मरणानंतर जन्ममरणांच्या चक्राची अधोगती प्राप्त होते.

समर्थ आणखी एका प्रकारच्या ग्रंथाचे दोष सांगतात –

**काहिण्या कथा गोष्टी पवाड। नाना अवतारचरित्रें वाड।**
**त्या समस्तांमध्यें जाड। अध्यात्मविद्या।।** १७-३-८
**गत गोष्टीस ऐकिलें। तेणें काये हातास आलें।**
**म्हणती पुण्य प्राप्त जालें। परी तें दिसे ना कीं।।** १७-३-९
**तैसे नव्हे अध्यात्मसार। हा प्रचितीचा विचार।**
**कळतां अनुमानाचा संव्हार। होत जातो।।** १७-३-१०

साठा उत्तराच्या कहाण्या, भक्तांच्या कथा, न्याय नीतीचे महत्त्व सांगणाऱ्या गोष्टी इत्यादींचे कौतुक व श्रीराम, श्रीकृष्ण अशा मोठ्या अवतारांच्या कथा यांहून अध्यात्मविद्या श्रेष्ठ व गहन आहे. या प्रकारच्या होऊन गेलेल्या घटना व गोष्टी ऐकून काय लाभ होणार? त्यामुळे पुण्य मिळते असे म्हणतात, पण ते कोणालाच दिसत नाही! अध्यात्मरूप सार असे नाही. त्यात प्रत्यक्ष अनुभवाचा विचार केला आहे. तो येताच केवळ सांगोवांगीच्या गोष्टी निरर्थक ठरतात. येथे समर्थ फार स्पष्ट व वास्तववादी भूमिका घेतात. '**अर्थे लोपली पुराणें**' हे संत तुकाराम महाराजांचे म्हणणे याहून वेगळे नाही. '**मंथुनी नवनीता। तैसें घे अनंता। वाया व्यर्थ कथा सांडी मार्गु।।**' असे हरिपाठ सांगतो. त्याचाही हाच आशय आहे. समर्थांनी सांगितलेले हे सर्व ग्रंथ भाबड्या व केवळ भावनाप्रधान लोकांना आवडतात. त्यामध्ये त्यांच्यावर कोणतीच जबाबदारी येत नाही. अस्सल अध्यात्मविद्येसंबंधी गीता सांगते – '**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं**

**कर्तुमव्ययम्।**' (अ.९-२)

आत्मानुभव प्रत्यक्ष असून त्याचे प्रमाणही प्रत्यक्षच आहे. जीव ब्रह्मैक्याचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे साक्षात्कार हे अध्यात्मशास्त्राचे सार आहे.

शास्त्रदृष्ट्या वेदान्तशास्त्राच्या तात्पर्याच्या निर्णयाला श्रवण म्हणतात. ब्रह्म सत्य असून देहादिजगत् मिथ्या आहे हे ते तात्पर्य आहे. हे तात्पर्य कळून, अन्त:करणात स्थिर होऊन, दैनंदिन जीवनात ते वापरता येऊ लागले की श्रवण पूर्ण होते. असे तात्पर्य सहजतेने स्थिर असूनही भगवान श्रीकृष्ण कृतिशील (Dynamic) जीवन जगले. परिपूर्ण जीवन जगल्यानेच त्यांना पूर्णावतार म्हणतात. छ. शिवरायांनी 'श्रींची इच्छा' म्हणून अलौकिक पराक्रम करून विभूतिमत्त्व संपादन केले. यथार्थ श्रवणाच्या साधनाने अनुभव साध्य होताच श्रवणाचाही 'ठाव' राहत नाही.

***



# श्रीदासबोधातील भक्तिमार्ग

कर्म, उपासना, ध्यान व ज्ञान असे क्रमविकासाचे मार्ग मोक्षाच्या संदर्भाने भगवद्गीतेने सांगितले आहेत. उपासनामार्गालाच भक्तिमार्ग म्हणण्याची पद्धत आहे. वास्तविक देवाहून 'वेगळा' म्हणजे 'विभक्त' नाही त्यालाच समर्थ भक्त म्हणतात. म्हणून उपासनेला साधन व भक्तीला साध्य म्हणता येईल. सैद्धान्तिक दृष्टीने आत्मानुभवाचे बाबतीत साध्यसाधक संबंध नसला तरी जीवाचे अज्ञान गृहीत धरून तो मानला जातो. श्रीसमर्थ हे अज्ञान गृहीत धरून '**सगुणाचेनि आधारें। निर्गुण पाविजे निर्धारें।**' असे सांगतात. ह्यातील सगुणाचा संबंध उपासनेशी असून निर्गुणाचा आत्मज्ञानाशी आहे. परमार्थ किंवा मोक्षाच्या क्षेत्राशी संबंध असणाऱ्या लोकांमधील ऐंशी टक्के लोक कर्माचे, चौदा टक्के लोक उपासनेचे व सहा टक्के लोक ब्रह्मविद्येचे अधिकारी असतात. ह्या सर्वसाधारण अंदाजामुळे श्रीदासबोध ग्रंथाची रचनाही त्यानुसारच केली आहे. श्रीनारद किंवा शांडिल्य भक्तिशास्त्राच्या मूळ हेतूंना जराही न धक्का लावता समर्थांनी समाजाभिमुख भक्तीचा पाठपुरावा केला आहे. ह्या संबंधी दोनच सूत्ररूप ओव्या ते सांगतात –

**नारायेण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी।**
**याकारणें तोषवावी। कोणीतरी काया।।** १५-९-२५

'नारायणरूप ब्रह्म जगातील सर्व चेतन व अचेतन पदार्थामध्ये व्यापून आहे. प्रत्येकाला त्या सर्वांची पूजा करणे शक्य नाही. म्हणून एखाद्या तरी शरीरातील जीवाला रोज संतुष्ट करावे'. ह्या रीतीने विश्वातील व्यापक चैतन्याची उपासना करता येते. भारतासारख्या देशात कामचुकारांचा विचार बाजूला ठेवूनही असंख्य दीन व दरिद्री लोक आहेत. आपल्या क्षमतेनुसार त्यांना थोडे तरी संतुष्ट करण्याचा यत्न करणे ही देवाची उपासनाच आहे. केवळ मुंग्यांना साखरेचे थोडे कण टाकून ही उपासना आटोपणे अपेक्षित नाही. अपंग भिकाऱ्याला रुपया दोन रुपये देतांना तो त्यांचा कसा उपयोग करील ह्याचा विचार अनावश्यक व कदाचित एवढेही कोणाला न देण्याच्या प्रवृत्तीमुळेच असू शकतो. त्याच्या त्या असहाय्य जीवनात त्याने एखाद्या व्यसनाची कास धरली तर नैतिकतेच्या तोऱ्यात त्याला मदत न

करणे ठीक नाही. मूर्तीच्या मुखावरील प्रसन्नतेएवढेच महत्त्व त्याच्या चेहऱ्यावरील क्षणिक संतोषाला दिले पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य इत्यादी अनेक क्षेत्रातील 'कार्यांना' संतुष्ट करण्यासारखी परिस्थिती भारतात आहे. वनवासी कल्याण केंद्रांसारखी अनेक केंद्रे हे कार्य करतात. व्यक्तिश: हे कार्य करणे शक्य नसले तरी त्या केंद्रांना सहजपणे मदत करता येते. चालू परिस्थितीमध्ये (कलियुग) पारंपरिक कर्ममार्गाचा अवलंब करणे फार कठीण आहे हे समर्थ चारशे वर्षापूर्वीच स्वीकारतात. म्हणून ते त्याऐवजी हरिस्मरणाचा पर्याय देतात. म्हणजेच कर्माला उपासनेचा पर्याय सांगतात.

**अपार कर्म मार्ग हा। घडेचिनाचि सांग हा।**
**कचाट कर्म सूचना। पुढे असे उपासना।।** स.ग्रं.भां. पृ. ४४८

वर्णाश्रम व्यवस्था, यश, सोळा संस्कार, सोवळे-ओवळे, इत्यादींचा समावेश असलेला कर्ममार्ग सर्व दिनक्रम व्यापणारा असल्याने तो त्याच्या अंग व उपांगांसह घडणे शक्य नाही. ह्या कर्मकचाटातून सोडविणारी उपासना अवश्य करावी. '**नामें स्नानसंध्या केले क्रियाकर्म। त्याचा भवश्रम निवारिला।**' असे संत श्रीतुकाराम महाराजही सांगतात. नामसाधना हे भक्तिमार्गाचे फार महत्त्वाचे साधन आहे असे सर्व संत आवर्जून सांगतात. कर्म व उपासना ही दोन साधने न मानता भगवंतनामाच्या अनुसंधानात सदाचार व कर्तव्यकर्मे पार पाडणे सर्व हिंदूंना सहज शक्य आहे. सांस्कृतिक कार्यक्रम व उत्सवादी, नामानुसंधान सांभाळून आनंदाने व उत्साहाने पार पाडावेत.

मूर्तिपूजा हा भारतीय संस्कृतीचा मोठा ठेवा आहे. त्यातील विकृती बाजूला सारून तो अवश्य सांभाळला पाहिजे. व्यापक देवाला मूर्तीमध्ये बंदिस्त करणे 'संकुचितपणाचे' आहे हे भक्तिशास्त्रालाही मान्य आहे, पण असा संकोच केल्याशिवाय उपासनेमध्ये अनेक रंग भरून तिला आधार (आलंबन) मिळत नाही हे सुद्धा तेच शास्त्र आवर्जून सांगते. अभक्त, सुधारक व टवाळखोर ह्यांच्याकडे जराही लक्ष देण्याचे कारण नाही. उलट त्यांचा योग्य प्रकारे बंदोबस्तच केला पाहिजे.

**गणेशशारदाविठलमूर्ती। रंगनाथजगंनाथतांडवमूर्ती।**
**श्रीरंगहनुमंतगरुडमूर्ती। देवतार्चनी पूजाव्या।।** ४-५-८



ह्या ओवीमध्ये मूर्तींची विविधता सांगितली आहे. एका श्रीरामाच्याच उपासनेचा सर्व समासात आग्रह नाही. उलट समाजाच्या अडाणी स्तरावील उपासनासुद्धा सांभाळाव्या असे समर्थ सांगतात -

**जाखमाता मायराणी। बाळा बगुळा मानविणी।**
**पूजा मांगिणी जोगिणी। कुळधर्मे करावीं।।** ४-५-१६

हिंदूधर्मांतर्गत सर्वांनाच बरोबर घेण्याचा हा विचार धर्माच्या संघटनेसाठी महत्त्वाचा आहे. अशा उपासनांना नाके मुरडण्याऐवजी त्यांच्यात सामील होऊन त्यांना उपासनेचे तत्त्व व वर्म त्यांच्या भाषेत समजावून सांगावे.

उपासनेमध्ये पर्यावरणाचाही विचार समर्थ सांगतात -

**वापी कूप सरोवरें। नाना देवाळयें सिखरें।**
**राजांगणें मनोहरें। वृंदावनें भुयरीं।।** ४-५-२२

मंदिरांच्या निमित्ताने सर्वांसाठीच विहिरी, तलाव व बारवे तयार करून पाण्याची सोय करावी. विस्तीर्ण पटांगणे तयार करावीत. देवळे बांधून रोजगाराच्या संधीही सहजच मिळतात.

**मठ मंढ्या धर्मशाळा। देवद्वारीं पडशाळा।**
**नाना उपकर्णें नक्षत्रमाळा। नाना वस्त्रसामग्री।।** ४-५-२३

मंदिराच्या परिसरात नवे मठ बांधून पारमार्थिक उपक्रमांची सोय करावी. मंदिरासमोर सभामंडप बांधल्याने कीर्तन-भजनाची व्यवस्था होण्याबरोबरच विवाहादी सामाजिक कार्यक्रमांनाही पवित्र जागा मिळते. धर्मशाळा बांधल्याने यात्रेकरू, प्रवासी व बेघरांचीही सोय होते. ओवऱ्यांचाही असाच उपयोग होतो.

वंदनभक्ती ह्या उपासनेच्या सहाव्या प्रकारात देवाला वंदन करण्याबरोबरच अनेक संबंधितांनाही नमस्कार करावा असे समर्थ सांगतात.

**नमस्कारें लीनता घडे। नमस्कारें विकल्प मोडे।**
**नमस्कारें सख्य घडे। नाना सत्पात्रासीं।।** ४-६-१४

नम्रता हा उपासकाचा अलंकार आहे. '**नम्र झाला भूता। तेणें कोंडिलें अनन्ता।**' असे संत तुकोबा म्हणतात. अहंकार हळूहळू नाहीसा करण्याचा तो

उपाय आहे. सर्व संबंधितांना स्वत: होऊन नमस्कार केल्याने उपरेपणा कमी होऊन जुने समज-गैरसमज सौम्य होतात. संघर्षाला कमी वाव मिळून साधना चांगली होते. संबंध चांगले राहतात. बिघडलेले संबंध सुधारण्यास मदत होते. संत सज्जन प्रसन्न होऊन ते हिताच्या चार गोष्टी आपुलकीने सांगतात.

चालू काळ हा सामाजिक अभिसरणाचा आहे. पूर्णपणे बिघडलेल्या सामाजिक सामंजस्यातून हिंदूंना मार्ग काढावयाचा आहे. विघटनाची नवी नवी कारणे पुढे येत असतांना संघटन टिकवावयाचे आहे. हे साधण्यासाठी समर्थ भगवंताच्या भजनाला एक नवा आयाम देतात. त्यांच्या काळाचा विचार केला असता हा विचार क्रांतिकारकच म्हणावा लागतो.

**हो कां कोणी एक नर। धेड महार चांभार।**
**त्याचे राखावे अंतर। ह्या नांव भजन।।**

अंतर राखावे म्हणजे त्यांचे अंत:करण सांभाळावे. '**राखावी बहुतांची अंतरें। भाग्य येते तदनंतरें।**' असे सांगणारे समर्थ त्याच अर्थाने येथे अंतर राखण्यास सांगत आहेत. 'त्यांचेपासून दूर राहावे' ह्या अर्थाने ते तसे सांगत नाहीत. बहुसंख्य समाजाने असे न केल्याने त्यांची मने दुखावली न जाण्यासाठी कायदे करावे लागले. ह्या कायद्यांमुळे व आरक्षणासारख्या आर्थिक लाभांमुळे, विघटन वाढत जात आहे. हिंदूंनी आता तरी जागे होणे धर्मरक्षणासाठी निकडीचे आहे. '**मुलुख बडवावा की बुडवावा। धर्मरक्षणाकारणें।।**' असे म्हणणाऱ्या समर्थांना काय काय अभिप्रेत आहे ह्याचा विचार करणे आता गरजेचे बनले आहे. ज्या देवाची आपण उपासना करतो त्याला सर्वात अधिक धर्म आवडतो. त्याची आवड पूर्ण करावयाची जबाबदारी भक्ताने मोठ्या प्रेमाने व उत्साहाने उचलली पाहिजे.

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।** गीता ४-८

सज्जनांचे रक्षण, दुर्जनांचा नाश व मोडकळीला आलेल्या धर्माचे व्युत्थापन अशी त्रिसूत्री अवताराच्या हेतूविषयी भगवान सांगतात. प्रत्येक हिंदूने स्वत:च्या सामर्थ्याच्या मर्यादेत ह्या तिन्हींना हातभार लावला पाहिजे. '**सत् रक्षणाय खल निग्रहणाय**' हे ब्रीदवाक्य मिरविणारे काय करतात हे पाहिल्यावर



तर ही जबाबदारी अधिकच वाढते. देवाच्या अवताराची वाट पाहण्याचा आत्मघातकी नाकर्तेपणा असावा काय?

भक्तीच्या नावाने होणारा भोंगळपणा, भाबडेपणा, लूटमार व ऐतखाऊपणाचे बांडगुळी जीवन समर्थांना मुळीच मान्य नाही.

**तस्मात् विचार करावा। देव कोण तो वोळखावा।**
**आपला आपण शोध घ्यावा। अंतर्यामीं।।** ४-९-७

देवाचे स्वरूप जसे शास्त्रात सांगितले आहे तसेच जाणत्याकडून समजावून घ्यावे. त्यावर सतत त्यानुसार विचार करावा. सगुण व निर्गुण ह्या उभयरूप देवाचा स्वत:शी असलेला मूळचा संबंध निश्चित करावा. तो बिघडला कशाने, दुरुस्त कसा करावा, दुरुस्त झाला नाही तर काय नुकसान होते, झाल्याने कोणते दिव्य लाभ होतात, इत्यादींचा शास्त्रसंमत अभ्यास करावा. दृश्य जगाचे स्वरूप, त्यातील स्वत:ला पार पाडावयाची भूमिका, देवाचे व जगाचे नाते ह्यांचाही साक्षेपाने विचार करावा. जगाचे नियंत्रण करणारा ईश्वर, जीव व ईश्वराचा संबंध, सगुण अवतारांच्या उपासनेची अनिवार्यता, सर्वांचे अधिष्ठान ब्रह्म, ह्या सर्वांच्या चिंतनाचा समावेश समर्थ 'आत्मनिवेदन भक्ती'मध्ये करतात. ही भक्ती सिद्धीला जाण्यासाठी श्रीगुरूंची कृपा किती महत्त्वाची आहे ते समर्थ अनेक वेळा सांगतात. '**तस्मात् गुरू करावा। त्याचा अनुग्रह घ्यावा।**' हा समर्थांचा आदेश आहे.

दासबोधासारखा ग्रंथ मराठी माणसाला लाभला हे त्याचे परमभाग्य आहे. जातीयवादाचे करंटपण सोडून प्रत्येक मराठी माणसाने '**मराठा तितुका मेळवावा**' हा आदेश मानून देवाची परिपूर्ण उपासना करावी. जीवन कृतार्थ करावे.

* * *

## चंचळ-निश्चळाची संधी

**चंचळनिश्चळाची संधी। तेथें भांबावते बुद्धि।**
**कर्ममार्गाचे जे विधी। ते मग ऐलिकडे**।। दा. बो. ११-४-७

चंचळ बुद्धिवृत्ती व निश्चळ आत्मा यांच्या संधीचा ध्यानाच्या प्रक्रियेत शून्यरूपाने अनुभव येऊन तेथे बुद्धी भांबावून जाते. ती गोंधळते. कर्ममार्गातील यज्ञादी सर्व विधी चंचळातील म्हणजे मायिक असतात. त्यात बुद्धी अडकून पडली तर ती अलीकडे म्हणजे मायिकातच घुटमळते. ह्या आधीच्या ओवीमध्ये समर्थ म्हणतात -

**चंचळेविण निश्चय कळेना। चंचळ तरी स्थिरावेना।**
**ऐसे हे विचार नाना। बरे पाहा**।। ११-४-६

मायिकातील बुद्ध्यादिकांच्या मदतीशिवाय आत्मस्वरूपाचे यथार्थ आकलन होत नाही. पण ही मायिक साधने अस्थिर असतात. हे असे विरोधाभासात्मक विचार नीट समजावून घ्यावे लागतात.

दिसणाऱ्या व कळणाऱ्या दृश्य जगाचे अस्तित्व गृहीत धरले तरी, ते मायिक आहे असे शास्त्र सांगते. येथे मायिक म्हणजे चंचळ. ह्या शब्दांचा अर्थ त्या जगाला उत्पत्ती, स्थिती व लय आहेत असा होतो. 'दोरीवर भासणाऱ्या सर्पाप्रमाणे मायिक' असा अर्थ येथे करू नये. विचाराधीन ओवीच्या संदर्भात मायेच्या सत्त्वगुणापासून व अग्नितत्त्वापासून बुद्धी हे तत्त्व तयार होते हे लक्षात घ्यावे. विवेक निरूपणाच्या ह्या समासात निश्चळ ब्रह्म व चंचळ माया (ईश्वरासह) ह्यांतील निश्चळ ब्रह्म किंवा आत्म्याच्या 'तो मी' ह्या अनुभवासाठी कसा विवेक करावा ते समर्थ सांगतात. विवेक करणे हा बुद्धीचा धर्म असून वेदान्तशास्त्राच्या अभ्यासाने बौद्धिक विवेक होतो. मायेच्या झपाट्यात तो फारच अल्पायुषी असतो. ह्या केवळ बौद्धिक (परोक्ष) विवेकाचे रूपांतर अनुभवात (अपरोक्ष) होण्यासाठी समर्थ ध्यान करावयास सुचवितात व त्यांत येणाऱ्या मुख्य अडचणीचा विचार सांगतात. येथे ध्यानाची स्पष्ट सूचना नसली तरी चंचळ व निश्चळाची 'संधी' हा शब्द ध्यानसूचक आहे. **'इकडे दृश्य तिकडे देव। मध्यें शुन्यत्वाचा ठाव।'** (दा.बो. ८-१०-६६) ह्या समर्थांच्या ओवीतील 'मध्यें' हा शब्द संधिसूचक आहे. ह्या प्रकारे सर्व धागे जुळवीत गेले असता बुद्धीच्या भांबावण्याचे स्वरूप समजावून घेता येईल.



समर्थांचा बुद्धीवर विलक्षण भर असून त्या तत्त्वावर त्यांचे अपार प्रेम आहे.

**बुधीविण प्राणी सकळ। ते ते अवघेचि बाष्कळ।**
**तया मूर्खासी खळखळ। कोणें करावी**।। दा.बो.१४-८-४६

ह्या प्रकारे बुद्धी नसणाऱ्यांविषयी त्यांच्या नादी न लागण्याची समर्थ भूमिका घेतात. 'मी आत्मा' ह्या अनुभवासाठी ध्यान करितांना बुद्धीच्या निश्चयासह चित्तवृत्तीने ते करावयाचे असते. चंचळ व निश्चळाची संधी अनुभविण्यासाठी एखादी ध्यानप्रक्रिया समजावून घेऊन एकाग्रतेने ती वापरली पाहिजे. उदा. 'अन्नमयादी पाच कोश 'मी' नसून आत्मरूप मी त्यांचा प्रकाशक म्हणजे ज्ञाता आहे' ही प्रक्रिया पंचदशीसारख्या ग्रंथातून समजावून घ्यावी. प्रत्येक कोश त्यांच्या तपशीलासह मी नाही असा विचार करीत गेले असता आनंदमयापर्यन्तचे सर्व कोश बाजूला सारले जाऊन एक जागा अशी येते की त्या ध्यानाभ्यास करणाऱ्या चित्तवृत्तीला बाजूला सारण्यासाठी काहीच उरत नाही. त्या वेळी 'कांही नाही' ह्या प्रकारे 'शून्य आहे' असा अनुभव येतो. हा अनुभव घेणारी चित्तवृत्ती 'इकडे' (जाणीवरूप दृश्य) व 'तिकडे' (शून्यरूप नेणीव) ह्यांचे मध्ये भिरभिरत राहते. दृश्य व शून्य ह्यांचे प्रकाशन म्हणजे ज्ञान, आत्मरूप ज्ञानप्रकाशातच होते. हे रहस्य श्रीगुरुकृपेने नीट उलगडले नसेल तर त्या शून्याच्या अनुभवालाच आत्मानुभव समजण्याचा गोंधळ होतो. ह्या गोंधळामुळे जाणीव-नेणीवरूप दृश्य व शुद्ध जाणीवरूप देव ह्यांचा निर्णय न झाल्याने साधकाची बुद्धी भांबावून जाते. **'जाणीव नेणीव भगवंतीं नाही'** ह्या प्रकारे देवाच्या स्वरूपात ही दोन्ही नाहीत असे संत ज्ञानदेव हरिपाठात सांगतात. तसेच आत्मदेव **'बुद्धिग्राह्यं अतीन्द्रियम्'** आहे असे भगवद्गीता सांगते. म्हणजे आत्मस्वरूपाचा निर्णय बुद्धीने होतो पण त्याचा अनुभव मात्र बुद्धी हा घटक असलेल्या 'आंतील इंद्रियाला' (अन्त:करण) येत नाही. बुद्धी कार्य करीत असेल तर आत्मानुभव येत नाही. अशी ही असणारी व लीन होणारी बुद्धी (चंचळ) आणि सत्यस्वरूप आत्मा (निश्चळ) ह्यांच्या संधीत साधकाच्या बुद्धीला काही कळेनासे होते. **'यो बुद्धेः परतस्तु सः'** असे आत्मस्वरूपाच्या बाबतीत सांगणारे कठ उपनिषद व **'अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम्।'** ह्या

गूढ भाषेत त्या विषयी सांगणारे केन उपनिषद ह्यांच्या मदतीशिवाय बुद्धीचे भांबावणे थांबत नाही. राजकारण, समाजकारण, प्रयत्नांचे महत्त्व, संघटन, न्याय, नीती, धर्म, इत्यादी सांगणारा दासबोध सोपा आहे. पण मोक्षविषयक तत्त्वज्ञान सांगणारा दासबोध मुळीच सोपा नाही. सोपा करण्याच्या नादात तो 'पाणीदार' होऊ शकतो.

वरील सर्व तत्त्वचिंतनाच्या तुलनेत विचार केला असतां ह्याच समासाच्या पाचव्या ओवीत सांगितलेला कर्ममार्ग फारच अलीकडचा ठरतो. तोही देवानेच चालविला असला तरी '**उंच नीच ओळखावे। या नांव ज्ञान**' (११-४-२४) ह्या प्रमाणे कर्म नीच असून ज्ञान उंच आहे हे लक्षात घ्यावे. त्यांना सारखेच समजू नये. यज्ञयाग, कुळधर्म-कुळाचार, व्रते-वैकल्ये इत्यादी कर्ममार्गाचा एक भाग असून वर्णाश्रमानुसार कर्तव्यपालन हा दुसरा भाग आहे. अर्जुनाची ह्याच बाबतीत गल्लत झाली होती. क्षत्रिय योद्धा म्हणून वाट्याला आलेल्या कर्तव्यापेक्षा व न्यायापेक्षा त्याला कुलक्षय, कुलधर्म, वर्णसंकर, कुलस्त्रियांची भ्रष्टता, पिंडदान, इत्यादींचेच महत्त्व अधिक वाटत होते. एकूण ह्या दोन्ही प्रकारच्या कर्मांना समर्थ 'ऐलीकडे' असे म्हणून त्यांचे गौणत्व स्पष्ट करतात. कर्माचे नगारे वाजवितांना मोक्षरूप ज्ञानाचा स्वर क्षीण होऊ नये ह्याची सर्वच संबंधितांनी खबरदारी घेतली पाहिजे. कारण संसाराची सफलता सांगतांना समर्थ म्हणतात -'**निर्गुण ब्रह्म ते निश्चळ। अंतरीं बिंबलें।।**' (२०-१०-२६). पहिल्या दशकाच्या पहिल्या समासाकडे पूर्ण लक्ष दिले तर समर्थांची खरी ओढ कोठे आहे ते चांगले लक्षात येते. व्यक्ती व समाज ह्यांच्या परिपूर्ण व्युत्थानाबरोबरीने त्यांनी धरिलेला परमार्थाचा आग्रह स्पष्ट दिसतो. संप्रदायाचे धुरीण ह्या बाबतीत श्रीरामकृपेने जागरूक आहेत हे सर्वांनाच समाधान देणारे आहे.

* * *



# गती

'गती' ह्या शब्दाची व्याप्ती फार मोठी आहे. प्रगती व अधोगती ह्या दोन शब्दांत 'गती' सामान्य आहे. कर्माची गती, ग्रहांची गती इत्यादी गतींचा नेहमी उल्लेख केला जातो. वाहनाची गती व कलेतील गती ह्यांतील गतींची चाल खूपच वेगळी आहे. जीवाला मोक्षरूपाने मिळणारी गती व अपराध्याला शिक्षेच्या रूपाने मिळणारी गतीच होय. राजकारणातील चालींची गती, कोहिनूरसारख्या हिऱ्याची गती कितीतरी भिन्न आहेत. '**काय त्यांची गति होईल नेणो**' ह्या शब्दांत संत तुकोबा संप्रदायाचे नियम न पाळणाऱ्यांच्या बाबतीत कानावर हात ठेवतात. '**गतिसामान्यात्**' (ब्र. १-१-१०) ह्या व्याससूत्रात एकाच तत्त्वाची पुनरावृत्ती सांगितली आहे.

वरील सर्व गतींचा येथे विचार करावयाचा नसून जे गतिमान असते ते स्वतंत्रपणे गतिमान असते की सापेक्षतेने गतिमान असते हा विचार करावयाचा आहे. गतिमानता स्थिरतेच्या अपेक्षेने आहे की स्वतंत्रपणे आहे ह्याचा विचार करावा लागतो. ज्या स्थिराच्या अपेक्षेने गतिमानता येते ते स्थिर स्वत:सापेक्ष की निरपेक्ष असाही विचार सहजच येतो.

दृश्य जग व त्यात जीवन जगणारा जीव हे घटक गतिमान आहेत. जगाला म्हणजे पृथ्वीला स्वत:भोवती व सूर्याभोवती फिरण्याची गती आहे. त्यालाच उत्पत्ती, स्थिती व लय ही सुद्धा गती आहे. जीव हा जन्म, जरा व मरणरूपाने गतिशील आहे. जीवसृष्टीचे जीवन प्रारब्धाच्या गतीने बांधलेले आहे. शिवाय ते जन्ममरणांच्या सतत चालणाऱ्या चक्रानेही गतिमान आहे. पारमार्थिक दृष्टीने ह्या तीन गती महत्त्वाच्या आहेत. ह्या क शाच्या किंवा कोणाच्या अपेक्षेने गतिमान आहेत? 'कशाच्या' ह्या शब्दाने अचेतन व 'कोणाच्या' ह्या शब्दाने 'चेतन' सुचविले जाते. पाच महाभूतांनी घडलेली सृष्टी अचेतन असून त्यात मन, बुद्धी व अहंकार मिळून चेतन सृष्टी तयार झाली आहे. वेदान्त मताप्रमाणे ह्या आठही घटकांमध्ये व्यापून राहून त्यांचे नियमन करणारा ईश्वर आहे. ईश्वर व त्याच्या अनेक ब्रह्मांडांना व्यापून असंग, निर्विकार, निर्गुण, निराकार, सच्चिदानंदरूप व निष्क्रियपणे राहणारे ब्रह्म आहे. ह्या पलीकडे, त्याहून व्यापक व सूक्ष्म असे काही व कोणी नाही. '**सा काष्ठा सा परागति:**' असे त्यासंबंधी काठक श्रुती सांगते. ह्याच्या पुढे बुद्धी चालत नाही, किंवा कोणाच्या अनुभवाच्या कक्षेत 'पुढे' काही

'येत' नाही म्हणून असे सांगतात की खरेच तसे आहे? पुढे पुढे म्हणत शेवटचा पुढे असेल की नाही? सर्वच विचारवंत येथे हात टेकतात. वैज्ञानिकांची बुद्धी व हात चालूच राहतात. 'अवैज्ञानिक' विचारवंत श्रुतींना शरण जाऊन अंतिम तत्त्वाचा, मूल व नित्यसिद्ध तत्त्वाचा 'ब्रह्म' ह्या नावाने स्वीकार करतात. कोणी श्रुतींना नाकारून 'शून्या'चा पुरस्कार करतात तर कोणी 'क्षणिक विज्ञान' हेच ते तत्त्व मानतात. पण ह्या सर्वांच्या मते 'त्यांच्या' अंतिमापुढे काही नाही. हे मतभेद कोठे मावळतात ते श्रीज्ञानोबा सांगतात –

**जेथ नाना मतां बुझावणी जाहाली।**
**एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली।**
**चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं। जें पवित्र म्हणिजे।।** ज्ञाने. ९-२७४

अंतिम सत्य हे एकच असले पाहिजे. त्याहून वेगळे किंवा पुढे काही असेल तर ते दुसरे असेल. म्हणून त्या अंतिमापाशी सर्व मतांचा उपशम होऊन सर्व शास्त्रे परस्परांशी सुसंगत होतात. मात्र ते तत्त्व संकल्पनारूप नसून अनुभवरूप असते. 'मला त्याचा अनुभव आला' असे सांगता येत नाही. तो सांगता येतो तोपर्यंत मतभेद संभवतात. त्यामुळे वेगळी शास्त्रे तयार होतात. '**प्रत्यक्षावगमम्**' ह्या शब्दाने (अ.९-२) गीता हेच सांगते. '**ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति**' ही मुंडक श्रुती 'त्याला ब्रह्मज्ञान होते' असे न म्हणता 'तो ब्रह्मच होतो' असे म्हणते.

भरधाव पळणारी रेल्वे गाडी गतिमान असते पण तिचे रूळ स्थिर असतात. पाण्यावर पाणी कापत बोट चालते, पण पाणी स्थिर असते. विमान गतिमान असते पण आकाश स्थिर असते. ह्याप्रमाणे गतिमान ब्रह्मांडाला एखादे स्थिर तत्त्व आहे का? गती जर स्थिरतासापेक्ष असेल तर अनंतकोटी गतिमान ब्रह्मांडांमागे स्थिरतत्त्व असले पाहिजे. त्याला गतिसापेक्ष स्थिरता असते असेही म्हणता येईल. स्थिरता आधी की गती आधी? की दोन्ही एकदम? गतीला प्रेरक काय किंवा कोण? 'काय'चे उत्तर अचेतन प्रेरक असल्याचे सुचविते. 'कोण'चे उत्तर चेतनाने सुचविले जाते. लोहचुंबक हा अचेतन प्रेरक असून त्यात चुंबकत्व ही ऊर्जा आहे. ऊर्जेचे नियमन नसेल तर ती संहारक ठरू शकते. उदा. ढगांच्या घर्षणातून निर्माण झालेली वीज भूमीवर धडकली तर मोठे नुकसान करते. सुनियंत्रित वीज मोठी विधायक कार्ये करू शकते. अनंतकोटी ब्रह्मांडांची गती व त्यातील ताऱ्यांची भ्रमणे



सुनियंत्रित आहेत हे विज्ञानच सांगते. नियंत्रण करणे ज्ञानी चेतनालाच शक्य आहे. चुंबकीय ऊर्जा स्वत: प्रेरक असली तरी ती स्वत: लोखंडाजवळ जाऊन प्रेरणा देत नाही. लोखंड त्याच्या जवळ नेले तरच ती ऊर्जा प्रेरणेचे कार्य करते. माणसाने तिचे नियंत्रण करून रोगनिदानासाठी उपकरणे (MRI) तयार केली आहेत. म्हणून अचेतन प्रेरकापेक्षा चेतन प्रेरक श्रेष्ठ ठरतो.

माणसाला जेवढ्या शंका येतात किंवा प्रश्न निर्माण होतात त्या सर्वांचीच उत्तरे त्याच्या बुद्धीला सापडतातच असे नाही व ती कोणी दिली तरी कळतीलच असेही नाही. वरील परिच्छेदात अशाच काही शंका किंवा प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या प्रश्नांची वैज्ञानिकांनी दिलेली उत्तरे अचेतन कारणवादाकडे झुकलेली असली तरी त्यांचेही त्यांच्याच उत्तराने पूर्ण समाधान झालेले नाही. म्हणूनच त्यांचे संशोधन अव्याहत चालू आहे. तर्काने स्पष्टपणे सिद्ध होणारा चेतनकारणवाद त्यांनीच स्वत:वर घालून घेतलेल्या काटेकोर निकषांमुळे त्यांना नाकारावा लागतो. एकपेशी किंवा अतिसूक्ष्म (Virus) जीवाणूंपासून मानवापर्यंत जीवसृष्टीच्या गतीचा विचार माणसाला अत्यंत अश्चर्य वाटण्यासारखा आहे. मानवी शरीर व बुद्धी हा त्या आश्चर्याचा कळसच आहे. हे सर्व आपोआप घडते व निसर्गाच्या स्वभावाने घडते असे मानणे 'अवैज्ञानिक' बुद्धीला तरी पटत नाही. 'वैज्ञानिक' बुद्धीचाही हा हट्टच आहे. जन्माला आलेल्या व येणाऱ्या माणसाच्या व्यक्तिगत जीवनाची गती हे महान आश्चर्य व गूढ आहे. वातावरण, प्रदेश, परस्पर संबंध, राज्यशासन, रोगराई, स्वार्थ, परंपरा इत्यादिकांची अनिश्चितता वगैरे अनेक कारणांनी ही गती मिळते. माणसाच्या अत्यल्प जीवनात कोणाला काय, किती व का वाट्याला येते याचे 'जे येते ते सामाजिक व राजकीय परिस्थितीमुळे येते' हे उत्तर फारच उथळ आहे. इतर जीवसृष्टीच्या (बोकड, कोंबडी, मासे, बैल, म्हशी, बेडुक, डास, चिमणी, विषाणू, इ. इ.) गतीच्या कारणांचा विचार करणे सुद्धा अशक्य आहे. ह्या गतिशीलतेच्या अपेक्षेने स्थिर असणाऱ्या तत्त्वाचा शोध कसा घ्यावयाचा?

हल्ली लहान मुले अनेक विषयांविषयी प्रश्नांमागून प्रश्न विचारतात. आई-वडिलांना त्यांचे कौतुकही वाटते. पण त्या प्रश्नांची उत्तरे दिली तरी ती समजण्याएवढा त्यांच्या बुद्धीचा विकास झालेला नसतो. पालकांना ती देता न

आल्याने मुले शेफारतात. उदा. – 'माझा जन्म का व कसा झाला?' ह्या प्रश्नाचे उत्तर आहेच. पण पाच वर्षांच्या मुलाला ते समजणे शक्य नाही आणि ह्याचे सुद्धा समजणारे उत्तर देता येणार नाही. कित्येक प्रश्न व त्यांची उत्तरे ह्यांची वयनिरपेक्षतेने सुद्धा हीच परिस्थिती आहे. दिसणारे जग, त्यातील अमोज विविधता, जीवसृष्टी व तिची गती, ह्या गतीची सुख व दु:खदायी विविधता ह्यासंबंधी कित्येक प्रश्न निर्माण होतात. जाणत्यांना त्यांची उत्तरे ठाऊक असतात. त्यांनी त्या उत्तरांच्या विविध प्रणाली तयार केल्या आहेत. पण त्या समजून घेण्यासाठी व अंतिम तत्त्वाच्या अनुभवासाठी जी आगळीवेगळी क्षमता लागते तिचा विकास फार कमी लोक विकसित करतात. त्या तत्त्वाचे 'देव' हे प्रचलित नाव गृहीत धरून 'देव असेल तर तो सिद्ध करून दाखवा' अशी डरकाळी मधून मधून फोडण्याचे काम हीच मंडळी करतात. वेदकालापासूनच ही परिस्थिती चालत आली आहे.

ह्या प्रश्नाची उकल झालेल्यांना जाणते का म्हणावयाचे? ते जाणतेपण कशावरून ठरवावयाचे? ही उत्तरे शोधणारे 'बुद्धीच्या क्षमतेपलीकडील साहस करतात असे योगी अरविंद म्हणतात (Extra intellectual adventure). जशी लहान मुलांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली तरी ती कळण्याची क्षमता नसते त्याचप्रमाणे मोठ्या व महाबुद्धिमान वैज्ञानिकांनाही न समजणारी उत्तरे असू शकतात. ह्यासंबंधी सर्व प्रश्न सूक्ष्मातिसूक्ष्म व अरूप तत्त्वासंबंधी (Hight of abstraction) असल्याने त्यांची उत्तरेही तशीच असतात. ती उत्तरे ज्यांना मिळाली त्यांची स्फुरणे ही बुद्धीशी निगडित असली तरी त्यांचा बौद्धिक अभ्यास, तर्क, प्रयोग, गृहीतकृत्ये, इत्यादींशी संबध नसतो. $E=mc^2$ हे एक वैज्ञानिक स्फुरण आहे. कोट्यवधी लोकांना त्याचे यथार्थ आकलन होत नाही व ते शक्यही नसते. म्हणून ते स्फुरण खोटे आहे काय? फरक एवढाच की ती स्फुरणे वैज्ञानिक शिक्षण, निरीक्षण, प्रयोग, चिंतन व स्फूर्ती ह्यांवर आधारलेली असून ती गणिती भाषेत मांडता येतात. त्यांचा प्रत्यक्षात दृश्य पडताळा पाहता येतो. उपनिषदांची '**अहं ब्रह्मास्मि**' सारखी स्फुरणे शुद्ध व शांत अन्त:करण, वैराग्य, ध्यान, तप:पूत जीवन व तीव्र जिज्ञासा ह्यांवर अवलंबून असतात. त्यांचा पडताळा दृश्य नसून अनुभवरूप आहे.



अन्य उपनिषदांप्रमाणेच कठ उपनिषदात ह्या स्फुरणांमागील पूर्वतयारी सुचविणारे अनेक मंत्र सांगितले असून त्या स्फुरणात दृश्य सृष्टीमागे दडलेल्या एकमेव व अंतिम तत्त्वाच्या अनुभवरूप ज्ञानासाठी ते अमूल्य मदत करतात. '**श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ सम्परीत्य विविनक्ति धीर:।**' (कठ १-२-१) – 'श्रेय म्हणजे मोक्षरूप कल्याण व प्रेय म्हणजे ऐहिक वैभवाने होणारे कल्याण. हे दोन्ही प्रकार माणसाला सतत खुणावतात. बुद्धिमान लोक त्यांचा योग्य विचार करून एकाची निवड करतात'. प्रेयाचा संबंध विज्ञानाशी असून श्रेयाचा परमार्थाशी आहे. पारमार्थिकांना झालेली स्फुरणे कशी असतात ते उपनिषद् सांगते –'**आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धा। आश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्ट:।।**' (कठ १-२-७) – 'ते तत्त्व सांगणारा तो ते सांगू शकतो हे मोठेच नवल आहे. त्याचा कोणी अनुभव घेतो हे एक आश्चर्यच आहे.' ते तत्त्व जाणणाऱ्या कोणाकडून ते ज्ञान प्राप्त करून घेणाराही आश्चर्यच आहे. म्हणून हे तत्त्व विज्ञानाच्या कक्षेपलीकडे आहे. शरीराच्या संदर्भातील विज्ञानाच्या कक्षा सांगून ते आत्मरूप तत्त्व त्यापलीकडे आहे असे सांगतात –

**इन्द्रियेभ्य: परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मन:।**
**मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान् पर:।।** कठ १-३-१०

'डोळे, नाक इत्यादी इंद्रियांहून त्यांचे रूप, गंध इत्यादी विषय सूक्ष्म आहेत. त्यांहून मन सूक्ष्म असून मनाहून बुद्धी सूक्ष्म व बुद्धीहून आत्मा हा सूक्ष्मत्वाची परमावधी आहे'. ह्या सूक्ष्मतम तत्त्वाचा अनुभव न येण्याचे कारण –

**नाविरतो दुश्चरितान्नाशान्तो नासमाहित:।**
**नाशान्तमानसो वापि प्रज्ञानेनैनमाप्नुयात्।।** (कठ १-२-२४)

'जो दुराचरण सोडून सदाचारी होत नाही, ज्याचे मन सतत अशांत आहे, ज्याचे मनावर व इंद्रियांवर नियंत्रण नाही, त्याची बुद्धी कितीही मर्मग्राही असली तरी त्याला तत्त्वानुभव येत नाही'. ह्या सर्व अटी पूर्ण करण्यापेक्षा सरळ आत्म्याचे अस्तित्वच नाकारणे सोपे नव्हे काय?

ह्या लेखात गतीचा विचार चालू आहे. उपनिषदांनी आत्म्याची गती फार वैशिष्ट्यपूर्ण रीतीने सांगितली आहे. त्या गतीच्या स्वरूपाचे आकलनही कठीण आहे.

**आसीनो दूरं व्रजति शयानो याति सर्वत:।**
**कस्तं मदामदं देवं मदन्यो ज्ञातुमर्हति।।** कठ १-२-२१

'आत्मा जागच्या जागी असूनही जणू दूरवर जाऊन पहुडलेला असतो. अशा आपल्या ऐश्वर्याची स्वत:ची स्वत:ला खबरही नसलेल्या देवाला माझ्याशिवाय कोण जाणू शकेल'? किंवा 'सुखस्वरूप असून हर्ष न होणाऱ्या देवाला माझ्याशिवाय कोण जाणील'? निरपेक्ष व्यापक असलेल्या ब्रह्माचे येथे फार मार्मिक वर्णन केले आहे. येथे जाणे, झोपणे, इत्यादी वर्णन केवळ आलंकारिक असून अक्रीड, अशरीर, अप्राण ब्रह्म (मुंडक उप.) चालणे शक्य नाही. ईशोपनिषदात अधिकच बहारदार वर्णन आहे -

**तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके।**
**तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यत:।।** ईश-५

'ते चालते व चालतही नाही. ते अत्यंत दूर असून अतिशय जवळ आहे. ते सर्वांच्या आत व बाहेर पूर्णपणे व्यापून आहे'. गतिमान पदार्थात ते व्यापून असल्याने त्याच्या रूपाने ते चालते. सर्व स्थिर पदार्थातही व पदार्थनिरपेक्षपणे ते व्यापून असल्याने जणू ते चालत नाही. 'आत' व 'बाहेर' ह्या माणसाने बसविलेल्या व्यावहारिक सोयीच्या घड्या आहेत. देहात-देहाबाहेर, जगात-जगाबाहेर इत्यादी सर्व आत व बाहेरील पदार्थ अनन्तकोटी ब्रह्मांडात समाविष्ट असतात, त्या सर्वांत ब्रह्म व्यापून असल्याने ते फार 'दूर' आहे. आणि सर्व चेतन-अचेतन पदार्थांत ते व्यापून असल्याने ते फार 'जवळ' आहे. ईशश्रुती म्हणते, '**अनेजदेकं मनसो जवीयो**' (४) - 'अचल, ओतप्रोत व एकमेव ब्रह्म मनाहून गतिमान आहे'. येथे मन व ब्रह्म ह्यांची शर्यत सांगावयाची नाही. मन क्षणार्धात हजारो किलोमीटर अंतर कापून परतही येते. एका जागी राहून जगभर फिरते. पण जेथे मन जाते तेथे ब्रह्म सतत असते. ब्रह्म जात-येत नाही. येथे केवळ काव्यमय भाषेत हे रहस्य सांगितले आहे. हे कळणारा महाभाग्यवान होय,

'आत्मा, ब्रह्म, वस्तू, चिती, साक्षी, सच्चिदानंद, देव' इत्यादी शब्दांनी सांगितले जाणारे अनादी, नित्य, सत्य, आद्य इत्यादी प्रकारे वर्णिले गेलेले अंतिम तत्त्व जाणून अनुभविण्याचा उपाय कठोपनिषद् सांगते - '**नैषा तर्केण मति-रापनेया प्रोक्तान्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठ।।**' (कठ १-२-९) - 'हे ज्ञान तर्काने



प्राप्त होत नाही. ते जाणत्याने सांगितल्यानंतरच ज्ञानानुभवात परिणत होते'. तर्क हे बुद्धीचे काम आहे. बुद्धीच्या आवाक्यात आत्मानुभव येत नसल्याने ते तर्काने कळत नाही. श्रीगुरूंनी समजाविल्यानंतरच '**तत्त्वमसि**' सारख्या उपदेशाने त्याचा अधिकारी साधकाला अनुभव येतो. विज्ञानाला ही श्रीगुरूंकडून शिष्याकडे जाण्याची ज्ञानाची गती कळत नाही. ती कळावी अशी विज्ञानाची रचनाच नाही. कोणत्याही प्रकारे व्यक्त न होणारे, निर्विकार व अविनाशी असे एक सार्वकालिक व कालातीत, पदार्थ व बुद्धि-निरपेक्ष, ज्ञानरूप व आनंदरूप असे तत्त्व निश्चितपणे आहे. त्याचा अनुभव येईपर्यंत त्याचा श्रद्धेने स्वीकार करूनच त्याच्या अज्ञानाकडून त्याच्या ज्ञानाकडे गती मिळते. ही गतीची भाषा सुद्धा साधनकालापुरतीच वापरावी लागते. '**तमसो मा ज्योतिर्गमय**' ही श्रुतीची गतिसूचक भाषा अशीच आहे.

**अस्तीत्येवोपलब्धव्यस्तत्त्वभावेन चोभयो:।**
**अस्तीत्येवोपलब्धस्य तत्त्वभाव: प्रसीदति।।** कठ २-३-१३

'प्रथम असे तत्त्व आहेच आहे असा निश्चय करावा. नंतर त्याचे वेदान्तशास्त्रानुसार चिंतन करावे व त्याचा अनुभव घ्यावा. ह्या प्रकारे त्या तत्त्वाचा निश्चयपूर्वक स्वीकार करून त्याच्या चिंतनात राहणाऱ्याला त्याचे ते अनुभवाला येते'. त्याचा जणू प्रसाद मिळतो'. सकारात्मक विचाराची (Positive thinking) ही परिसीमा आहे.

***

## भक्तीची व्यथा

श्रीमद्‌भागवताच्या पहिल्या अध्यायामध्ये सुरुवातीलाच महर्षी नारद व भक्ती यांचा संवाद वर्णन केला आहे. ही भक्ती विषण्ण अन्त:करणाने यमुना नदीच्या काठी हताश होऊन बसली होती. तिच्या मांडीवर दोन वृद्ध पुरुष झोपलेले होते. द्वापार युगाच्या शेवटी भगवान श्रीकृष्णाने जेथे भक्तिरस भरभरून सर्वांना वाटला होता तोच यमुनाकाठ कलियुगात नीरस झाला. भक्तीच्या भोवती जमून शेकडो सख्या तिला वारा घालीत तिची समजूत काढीत होत्या. पण तिचा शोक जराही कमी होण्याचे लक्षण दिसत नव्हते. तेवढ्यात तिला नारदमुनी दिसल्यावर ती त्यांना म्हणाली –

**'भो भो: साधो क्षणं तिष्ठ मच्चिन्तामपि नाशय।'** १–४२

'हे साधू नारदा! जरा थांब आणि माझी ही व्यथा दूर कर'. एका अनोळखी स्त्रीने अचानक हाक मारल्याने नारद तिला म्हणाले–

**कासि त्वं काविमौ चेमा नार्य: का: पद्मलोचना:।**
**वद देवि सविस्तारं स्वस्य दु:खस्य कारणम्।।** १–४४

'तू कोण आहेस? हे तुझ्या बरोबरचे दोन पुरुष कोण? या कमलनयना मुली कोण आहेत? तुझ्या दु:खाचे कारण स्पष्ट करून सांग'. त्यावर ती भक्ती म्हणाली –

**अहं भक्तिरिति ख्याता इमौ मे तनयौ मतौ।**
**ज्ञानवैराग्यनामानौ कालयोगेन जर्जरौ।** १–४५

'अहो नारदा! मला भक्ती असे म्हणतात. हे पुरुष माझे दोन मुलगे आहेत. ज्ञान व वैराग्य अशी त्यांची नावे असून कालाने त्यांना जर्जर करून सोडले आहे.' मग ती म्हणाली, 'या माझ्याबरोबर असलेल्या मुलींची गंगा, यमुना, गोदावरी अशी नावे आहेत. मी ही अशी तरुण व माझी मुले मात्र जर्जर झालेली! नारदा, हे शोभते का?'

भागवतामधील कल्पनारम्य सत्यकथा संपली! जी भक्तीची व्यथा आहे तीच तथाकथित भक्तांची फजिती असते. भक्तीचा पहिला मुलगा जो 'ज्ञान' तो जर्जर का झाला? त्याची अशी दुर्दशा का उडाली? ह्याचे मुख्य कारण म्हणजे उपासना करणारे भक्तीपर्यंत पोहोचतच नाहीत.श्रवणापासून सुरु झालेल्या उपासनेचा



आत्मनिवेदनरूप भक्तीत सुखाने नकळत प्रवेश होतच नाही. तो तसा का व्हावा लागतो, कसा होतो, कोणाचा कोणात होतो व त्याने काय लाभ होतो एवढे प्रश्न विचारणारे उपासक किती असतात? हे भक्त कोणत्या भुलीमध्ये राहिल्याने स्वत:च्याच हिता आड कसे येतात त्याचे वर्णन श्रीज्ञानदेवांनी मार्मिक शब्दांत केले आहे –

**एऱ्हवीं स्थूलदृष्टी मूढ। मातें जाणती कीर दृढ।**
**परि तें जाणणेंचि जाणणेया आड। रिगोनि ठाके।।** ज्ञाने. ९–१४५

'माझ्याविषयी अत्यंत ढोबळ व उथळ कल्पना बाळगणारांनी त्यांच्या दृष्टीने मला पक्के जाणलेले असते. परंतु त्यांचे हे असले जाणणेच मला खऱ्या अर्थाने जाणण्याच्या आड डोंगरासारखे आडवे येते.' उपासना अज्ञानातून केल्याने भक्ती साध्य होत नाही असा ह्याचा सरळ अर्थ आहे. केवळ मूर्ती म्हणजे देव हे पहिले अज्ञान व सकामता हे दुसरे अज्ञान आहे. मूर्तीला देव मानून उपासनेचे एवढे बंड माजले की कबीराला दुसऱ्या टोकाला जाऊन निर्गुण श्रीरामाच्या उपासनेचा आग्रहाने प्रसार करावा लागला. खुद्द ज्ञानदेवांनी अशा पूजेची अक्षरश: रेवडी उडविली आहे.

**जंव आकारु एक पुढां देखती। तंव हा देव येणें भावें भजती।**
**मग तोचि विघडलिया टाकिती। नाहीं म्हणोनि।।** ज्ञाने.

देवाचा फोटो, चित्रे, ताईत, पदके, बिल्ले, मूर्ती, शालिग्रामासारखी प्रतीके, आंगठ्या, इत्यादींची तीर्थाच्या ठिकाणी जी रेलचेल असते ती ह्यामुळेच. रोजच्या पूजेतील मूर्तीला तडा गेला किंवा भिंतीवरील देवाची तसबीर पडून फुटती की छातीत धस्स होते! अशी मोडतोड झाली की त्यातील देवही मोडल्यासारखे वाटतात व आता देवाची आपल्यावर गैरमर्जी होणार या कल्पनेने रोजच्या पूजेतील देवाचीच भीती वाटू लागते! वास्तविक जगद्गुरू तुकोबोरायांनी समजावून सांगितले आहे की

**केला मातीचा पशुपति। परि मातीसी काय महती।**
**शिवपूजा शिवासि पावे। माती मातीमाजीं सामावें।।** १३९–१

मूर्तीच्या निमित्ताने निर्माण होणारा भाव, उपासनेमुळे वाढत जाणारे प्रेम, प्रेमाने प्रसन्न होऊन देवाकडून मिळणारा बुद्धियोग व त्याने होणारे ज्ञानस्वरूप आत्मनिवेदन असा हा प्रवास समजून–उमजून, पवित्र जीवन सांभाळीत करावा लागतो. मातीची

मूर्ती, मूर्तीमध्ये तत्त्वदर्शन व तत्त्वदर्शनाने तत्त्वानुभव ही प्रक्रिया साधली नाही तर एका मातीचीच महती उरते. म्हणून समर्थ म्हणतात –

**पूर्वपक्षेंसिं सिद्धान्त। पाहावा प्रकृतीचा अंत।**
**मग पावावा निवान्त। निश्चय देवाचा।।** दास. ५-१०-३४

पूर्वपक्षाचा म्हणजे स्वत:च्या देवाविषयीच्या कल्पनांचा; सिद्धान्त पक्षाशी म्हणजे उपनिषदे व संतांनी सांगितलेल्या व अनुभवाने जाणलेल्या वस्तुस्थितीशी मेळ घालून पाहावा. स्वत:ची समजूत पूर्णपणे बदलून त्यातील विरोध दूर करावा. स्वत:च्या शरीरासह जगताचा निरास करून यथार्थ चिंतनाने चिंतनातीत देवाचा निश्चय करावा. ह्याचा मुख्य उपायही समर्थांनी स्पष्ट सांगितला आहे.

**आधीं मुख्य देव जो कोण। मग आपण भक्त तो कोण।**
**पंचीकर्ण महावाक्यविवरण। केलेंचि करावें।।** दास. १२-३-५

सगुण-निर्गुणांच्या समन्वयाचा हा उत्कृष्ट मार्ग आहे. प्रथम देवाची कल्पना कोठे थांबते व मुख्य देव कोणता हे जाणलेच पाहिजे. माझ्यातील 'भक्त' कोण आहे, कोठे आहे व कसा आहे तेही पाहावे. नंतर निश्चित झालेला भक्त व निश्चय झालेला देव यांचा मूळ संबंध, कल्पित संबंध व संयोग-वियोग ह्यांविषयी स्वत:चा दृढ निश्चय करून घ्यावा! पंचीकरण व महावाक्य यांच्या श्रीगुरु-उपासनापूर्वक चिंतनाने हे साधू शकते.

वास्तविक निर्गुण देव हा इतका सरळ व जवळ आहे की सगुणाची गरजच भासू नये! श्रीज्ञानदेव म्हणतात –

**तया उपमा माप कां सुवावें। मग अव्यक्ता कां मानावें।**
**सिद्ध असतां कां निमावे। साधनवरी।।** ज्ञाने. ७-१५६
**परी हा बोल आघवा। जरी विचारिजतसे पांडवा।**
**तरी विशेषें या जीवां। न चोजवे गा।।** ज्ञाने. ७-१५७

'अथांग व पूर्ण अशा देवाला मापात घालून मर्यादित करण्याचा प्रयत्नच का करावा? मी स्वरूपाने निर्गुण निराकार असतांना मला मूर्तीच्या वगैरे रूपाने सगुण साकार का करावे? देव हा प्रत्येक व्यक्तीमध्ये अखंड असता साधनांचा प्रचंड खटाटोप तरी कशासाठी? पण अर्जुना, हे म्हणणे कितीही खरे असले तरी विचारशील तर या सर्वसामान्य जीवांना ते मान्य होण्यासारखे नसते. त्यांची काही केल्या



समजूतच पटत नाही'. आणि हीच बहुतेक सर्वांची अवस्था लक्षात घेऊनच सगुणाची सर्व उभारणी झाली आहे. '**मनवाचातीत तुझे हे स्वरूप। म्हणोनियां माप भक्ति केलें।।**' (तुका.) '**उपमा माप का सुवावे?**' असा ज्ञानदेवांचा प्रश्न आहे व त्याला तुकोबारायांचे वरील उत्तर आहे! शरीराने होणाऱ्या क्रिया, वाणीने केलेली बडबड व मनाने केलेला सूक्ष्मातिसूक्ष्म शोध यांपैकी कशानेही देव हस्तगत होत नाही. यावर उपाय शोधून तो पर्यायाने हस्तगत होण्यासाठी म्हणजे उपासनेसाठी त्याला आकाराच्या मापात आणावे लागले व तो देव तसा आलाही!

**तुका म्हणे भोळा भाविक तो देव। म्हणूनिया पाव धरुनी ठेलो।।**

तत्त्वदृष्टीने देव अनुपास्य आहे, कारण देव हेच आपले स्वरूप असल्याने उपासना कोणी कोणाची करावयाची? '**तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते।**' (केन १-१-४ते८) – 'ज्याची देव म्हणून आम्ही उपासना करतो तो 'तो' देव असत नाही'. हा गुंता सूक्ष्मबुद्धीने सोडवण्यास बसले असता आपण आपलीच परंतु निराळ्या रूपाची एक मूर्ती तयार करून तिची आपणच पूजा करतो असे म्हणावे लागते व नंतर पूजा-अर्चा, संवाद, रुसणी-फुगणी, भांडणे, वाकुल्या इ. सर्व भक्तीच्या अन्तर्गत चाललेले रम्य व्यापार आपले आपल्याशीच होतात. समोर मांडलेला देव हे केवळ निमित्तच असते! तुकाराम महाराजांच्या अभंगाचा अभ्यास केला असता हे स्पष्ट समजून येते.

**अनुभवे कळो येते पांडुरंगा। रुसावे ते का गा तुम्हावरी।।**

'अनुभव आल्यावर असे कळते की सर्व दोष माझाच असल्याने मला तुमचे दर्शन होत नाही. तुमच्यावर रुसून काय उपयोग'?

**असा जी सोंवळे आहा तैसेंचि निराळे।।**
**आम्ही नयो तुमच्या वाटा काय लटिकाची ताठा।।**

महाराज लटक्या रागाने देवाशी भांडताना म्हणतात 'देवा! तुम्ही स्वत:ला फार सोवळे समजत असाल तर खुशाल आहात तसेच राहा! तुम्हाला सोवळेपणाचा खोटा ताठा असेल तर आम्ही तुमच्या वाटेला जाणार नाही. पण देवा, तुम्ही हे पक्के समजून असा की एकदा निर्गुणाचे सोवळेपण सोडून तुम्ही सगुणात आल्यानंतर आता तुमचे सोवळे आम्ही मुळीच चालू देणार नाही!'

**तुमचा तुम्ही केला गोवा आता चुकविता देवा ।।**
**कासया हो रूपा – नांवा आलेति गा बापा ।।**
**तुका म्हणे आता न सरे हवाले घालिता ।।**

‘सगुणात तुम्ही स्वत: होऊन सापडला आहात. आता तुम्हाला निर्गुणात दडी देऊन बसता येणार नाही. तसे करावयाचे होते तर प्रथम नाव-रूप घेतलेतच कशाला? आता मात्र ‘मी मूळचा निर्गुण निराकार आहे’ अशी पारमार्थिक भूमिका घेतलीत तर ती आम्ही खपवून घेणार नाही’. सर्व संतांनी याच रीतीने भक्तीच्या जर्जर झालेल्या ज्ञान ह्या पुत्राला पुन्हा तरुण करून, आरोग्यसंपन्न करून भक्तीला प्रसन्न केले.

भक्तीचा दुसरा पुत्र ‘वैराग्य’. याच्या दुर्दशेला तर सीमाच नाही! शब्दज्ञानाचा च्यवनप्राश पाजून ‘ज्ञान’ या पुत्राला कसे तरी समाधान देता येते. पण त्याचा भाऊ मदतीला असल्याशिवाय तो तग धरूच शकत नाही. ज्ञानदेव म्हणतात ‘**तरी विरक्तीवांचून कंही । ज्ञानासि तगणेंचि नाहीं ।।**’ ( ज्ञाने. १५-३६).

देवाचे अज्ञान हे जसे त्याच्या प्राप्तीच्या आड येते त्याप्रमाणे सकामता हे एक वेगळ्या प्रकारचे अज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचू देत नाही. वैराग्य व विवेक नसला म्हणजे उपासनेमध्ये व पर्यायाने भक्तीमध्ये जी अनेक बंडे माजतात त्यांत दंभ व सकामता ही मुख्य आहेत. परमार्थ प्रांतातील वक्त्यांना तुकोबाराय पहिला तडाखा देतात.

‘**आशाबद्ध वक्ता । धाक श्रोत्याचिया चित्ता ।।**’ – ‘प्रवचनकार, व्याख्याते व कीर्तनकार ह्यांच्या मिजासी व बिदागी श्रोत्यांना कासावीस करतात’. जेथे कीर्तनाला जावे तेथे घोड्याला चारासुद्धा मागू नये असे तुकाराम महाराजांचे म्हणणे आहे! लांबचे प्रवास, वाढत्या किमती व प्रवासाची दगदग ह्यांचा हल्लीच्या संदर्भात विचार केला तर आज हे म्हणणे पूर्णपणे अव्यवहार्य ठरेल. तरी भलत्या गरजा व बिदागीला फाटा देणे अशक्य नसावे. काही मंडळींचा प्रवचने, व्याख्याने हा फावल्या वेळातील जोडधंदा झाला आहे अशी शंका येते. दुसऱ्याच्या खर्चाने आरामशीर प्रवास करून मान, कीर्ती व बिदागी मिळवीत फावला वेळ ‘सत्कारणी’ लावणारी बरीच मंडळी आहेत व त्यांना बोलावून स्वत:ला धन्य समजणाऱ्या श्रोत्यांनाही तोटा नाही! असे होण्याचे कारणही तुकोबा सांगतात- ‘**शब्दज्ञानें किती गौरविली वैखरी । साच ते अंतरीं बिंबेंचि ना ।।**’. वैराग्य नसतांना परमार्थशास्त्राचे अगदी चूर्ण करून ते सर्व घेतले तरी त्याचा उपयोग सोनामुखीसारखाच होणार. शब्दाने सुचविलेले तत्त्व जर ठसले नाही तर शब्द हे वायबारच ठरतात. हाच विचार मुंडक उपनिषदात ‘**नायमात्मा बलहीनेन लभ्यो न च प्रमादात्तपसो वाऽप्यलिङ्गात् ।**’ (३-२-४) या भाषेत मांडला आहे. प्रमाद, तपाचा अभाव व संन्यास किंवा फलत्याग नसणे या कारणाने व आत्मतत्पर नसल्याने आत्मलाभ होत नाही. प्रमाद घडणे हे निषिद्ध आचरणाची फिकीर नसल्याचे चिन्ह आहे. तपश्चर्येला आखीव-रेखीव जीवनाचे सातत्य हवे असते व लिंग म्हणजे संन्यासाला तीव्र मुमुक्षुत्वाची बैठक लागते.



निषिद्ध म्हणजे शास्त्रविरुद्ध वर्तनाविषयी बेफिकिर कोण असतो? देहभोगाची अनिवार इच्छा असल्यानेच अशी बेफिकिरी येते. ‘प्रमाद’ या शब्दांतच ‘निषिद्ध कशाला म्हणतात हे ठाऊक असून सुद्धा त्याची पर्वा न करणे’ असा गर्भित अर्थ आहे. आत्मसुखाची कल्पनाच नसणे, कल्पना असली तरी ती अस्पष्ट असणे, स्पष्ट कल्पना आली तरी त्या सुखाचा अनुभव अशक्य वाटणे व अनुभव शक्य आहे अशी खात्री झाली तरी त्यासाठी आवश्यक ती स्वत:ची पूर्वतयारी, सातत्य व योग्य असे मार्गदर्शन नसणे हे सामान्यपणे दिसते. हे सर्व माहीत असूनही देहसुख हेच आत्मसुखाहून सोयीस्कर व सुलभ वाटते. त्यामुळेच देहभोगावर भर दिला जाऊन विधी व निषेध या बाबी गौण होतात व त्यामुळे प्रमाद हे प्रमाद न वाटता ते प्रमादमय जीवन इतके सहज होते की विधि-निषेधाच्या संकल्पनाच नष्ट होतात! हा मानवी प्रवृत्तीचा सर्वसामान्य विचार झाला. मुमुक्षूने कोणते प्रमाद करू नयेत ह्याविषयी श्रुतीने स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. तैत्तिरीयाच्या प्रथम वल्लीचे नऊ ते अकरा हे अनुवाक हे यासाठी आवर्जून अभ्यास करण्यासारखे आहेत. ऋत म्हणजे सदाचार, सत्य, तप, दम, शम, वेदाध्ययन व शास्त्राभ्यास ह्यांविषयी कधीही प्रमाद करू नये. गुरुसेवा, प्रजापोषण, धर्म, शुभकर्मे व वैभवाची साधने यांविषयी प्रमाद करू नये. आत्मनिष्ठा व जीवननिष्ठा यांच्या संतुलित विचारांचा आशय साठविलेला इतका मोठा विचार एवढ्या कमी शब्दांत गुंफलेला क्वचितच कोठे असेल. प्रमाद करू पाहणाऱ्या आपल्या पित्याला नचिकेता सांगतो –

**अनुपश्य यथा पूर्वे प्रतिपश्य तथाऽपरे ।**

**सस्यमिव मर्त्यः पच्यते सस्यमिवाऽऽजायते पुनः ।।** कठ १-६

एका बालकाचा हा प्रमादाविरुद्ध आसूड आहे! पूर्वापर चालत आलेल्या प्रमादशून्य पूर्वजांचा दाखला देऊन तो जणू वैराग्याच्या मुळाशी असणाऱ्या विवेकाचे दर्शन करून देतो. मरणधर्मी असणारा मानव शरीराने निश्चितपणे नष्ट होतो, पण यवादी धान्याप्रमाणे वासनाबीज राहिल्याने फिरून जन्माला येतो. वैराग्य नसल्यामुळेच असे वासनाबीज उरू न देणारा परमार्थ हाती लागत नाही. तुकाराम महाराज सांगतात -

**इंद्रियांचा जय वासनेचा क्षय। संकल्पाहीवरी नयें मन।**
**तुका म्हणे न ये जाणीव अंतरां। अंतरीं या थारा आनंदाचा ।।**

'शमदमपूर्वक वासनाक्षय झाल्यावर मनाचे संकल्प थांबले की अन्त:करण आत्मानंदाने भरून जाते'.

ध्येयाला घट्ट धरून त्याच्या प्राप्तीसाठी ध्येयमय झालेल्या जीवनाला तपश्चर्या असे म्हणता येईल. कोणत्याही क्षेत्रात खरे तपस्वी फारच थोडे असतात. परमार्थक्षेत्रात तर ते अत्यल्प असतात. सत्-चित्-आनंदरूप परमात्म्याशी एकरूप होऊन राहणे हे पारमार्थिक ध्येय आहे. त्यासाठी असत्, जड व दु:खरूप जीवनाचा मनाने त्याग केल्याशिवाय म्हणजे विरक्तीवाचून ही ध्येयसाधना शक्य नसते. ध्येयाच्या नेमके विरुद्ध जाऊन ते कसे गाठले जाईल! पारमार्थिक ध्येय कसे ठरते? संतसंगतीचा खरा लाभ पारमार्थिक ध्येय ठरणे हा असतो. म्हणजे साधक, सिद्ध, संत, ग्रंथ इत्यादींचे सत्संगतीने परमार्थाचे ध्येय समजते, कळते, रुळते व ध्येय या अवस्थेपर्यंत पोहोचते. ज्या प्रमाणात ध्येयनिष्ठा वाढते त्या प्रमाणात ती निष्ठा जीवनव्यापी झाल्यावर या ध्येयनिष्ठ जीवनालाच तपश्चर्या असे नाव मिळते.

**लोकानुवर्तनं त्यक्त्वा त्यक्त्वा देहानुवर्तनम्।**
**शास्त्रानुवर्तनं त्यक्त्वा स्वाध्यासापनयं कुरु।।** (अध्यात्म उपनिषद्)

'लोकाचाराप्रमाणे वागणे सोडावे. देहाच्या गरजेप्रमाणे जगणे थांबवावे. शास्त्राच्या सांगण्याप्रमाणे कर्म करण्याची आवश्यकता नाही व आत्म्यावरील देहाच्या अध्यासाचा त्याग करावा'. ही खरी पारमार्थिक तपश्चर्या होय. तुकोबारायांनी सुचविलेली तपश्चर्या या श्रुतिवचनाशी जुळवून घेण्यासारखी आहे हे थोड्याच विचाराने लक्षात येईल -



**काळ सारावा चिंतनें। एकान्तवासीं गंगास्नानें।**
**देवाचे पूजनें। प्रदक्षिणा तुळशीच्या।।१।।**
**युक्त आहार विहार। नेम इंद्रियांसी सार।**
**नसावी बासर। निद्रा बहु भाषण।।२।।**
**परमार्थ महाधन। जोडी देवाचे चरण।**
**व्हावया जतन। हे उपाय लाभाचे।।३।।**
**देह समर्पिजे देवा। भार कांहींच न घ्यावा।**
**होईल आघवा। तुका म्हणे आनंद।।** (तु. गा. ६१८)

या अभंगाचा गद्यानुवाद करून अभंगाचा रसभंग का करावा? हीच जीवनपद्धती वरच्या कोटीमध्ये गेली की तिला संन्यास हे नाव मिळते. त्याग किंवा संन्यास यांत गीतेने केलेला सूक्ष्म फरक लक्षात घेऊन जीवनाची दिशा निश्चित करता येते व जीवनाला या दिशेने जितका वेग मिळेल तितके मुमुक्षुत्व तीव्र होत जाते. या सातत्यपूर्ण तपाचरणाची बैठक नादबिंदु उपनिषदात पुढीलप्रमाणे सांगितली आहे -

**आत्मानं सततं ज्ञात्वा कालं नय महामते।**
**प्रारब्धमखिलं भुंजन्नोद्वेगं कर्तुमर्हसि।।२१।।**
**उत्पन्ने चात्मविज्ञाने प्रारब्धं नैव मुञ्चति।**
**तत्त्वज्ञानोदयादूर्ध्वं प्रारब्धं नैव विद्यते।।२२।।**

'अरे बुद्धिमान मानवा! तू आत्मप्राप्तीसाठी सतत प्रयत्नशील राहा. अमूल्य वेळ त्यासाठीच खर्च कर. प्रारब्धाने येणाऱ्या यातनांचा व दु:खांचा उद्वेग करणे योग्य नाही. अरे, आत्मज्ञान झाले तरी या प्रारब्धभोगापासून सुटका होत नाही. परंतु तत्त्वज्ञान झाल्यावर प्रारब्धाच्या दु:खाचे प्रहार मात्र होण्याचे थांबते.' असा अनुभव आलेले तुकाराम महाराज सांगतात - '**संचित प्रारब्ध क्रीयमाण। अवघा झाला नारायण।।**'

संतांनी याच रीतीने भक्तीच्या ज्ञान व वैराग्य या दोन्ही जर्जर पुत्रांना नवसंजीवन देऊन भक्तीला प्रसन्न करून परमेश्वराशी एकरूपता साधली. म्हणूनच श्रुती आम्हाला गर्जून सांगते -

'**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत।**',
'**तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मा अमृतं गमय।।**'

# विटेवरील समचरण दृष्टी

**समचरण दृष्टि विटेवरी साजिरी। तेथें माझी हरि वृत्ति राहो।।**
**आणिक न लगे मायिक पदार्थ। तेथें माझें आर्त नको देवा।।**
**ब्रह्मादिक पदें दु:खाची शिराणी। तेथें दुश्चित्त झणीं जडो देसी।।**
**तुका म्हणे त्याचें कळलें आम्हा वर्म। जें जें कर्मधर्म नाशवंत।।**गा.१

श्रीसंत ज्ञानदेवांनी रचलेल्या पायावर कळस चढविणाऱ्या संत तुकोबारायांच्या अभंगगाथेतील हा पहिला अभंग आहे. त्यांच्या सुमारे साडेचार हजार अभंगांचे तत्त्वज्ञान व साधनविषयीचे सूत्र या अभंगात सापडते. सगुण, निर्गुण, वृत्तीचे साधन, वैराग्य, जगताचे मिथ्यात्व व कर्मधर्मांचे व्यर्थत्व ही ती सूत्रे होत. म्हणजे यातील एक ना एक सूत्राचा एक ना एक पदर त्यामध्ये सापडतो. त्यांच्या अभंगाच्या मंथनाचे हे नवनीत ठरते. हल्लीच्या अत्यंत गडबडीच्या व धकाधकीच्या जीवनात प्रामाणिक साधक प्रचंड पारमार्थिक वाङ्मयाच्या ओझ्याखाली दडपून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत असे सूत्रचिंतन उपयुक्त होईल. या सूत्रातील तत्त्वज्ञान उपनिषदांचे समुद्र पार करून आले आहे. साधना सर्व कसांना उतरलेली आहे. वैराग्य अग्निपरीक्षेला टिकलेले आहे. जगन्मिथ्यात्वनिश्चय जीवनात उतरला असून कर्मधर्माचे व्यर्थत्व जणू त्यांच्या रूपानेच अवतरले आहे! त्यांच्या अभंगरचनेला अशी उज्ज्वल पार्श्वभूमी असल्याने साधकासमोर त्यांचा भयचकित करणारा आदर्श उभा आहे.

या अभंगातील देव पंढरपूरचा श्रीविठ्ठल असून पहिल्या चरणात त्याची लक्षणे सांगितली आहेत व त्याच्या दर्शनाच्या साधनांचा सर्व भार त्याचेवरच घातला आहे. पुढील दोन चरणात दर्शनाला अनुकूल मनस्थितीची त्याच्याकडेच मागणी केली असून शेवटच्या चरणात अनुभवान्ती झालेला निष्कर्ष सांगितला आहे. 'सारखे चरण व सारखी दृष्टी असलेली श्रीविठ्ठलाची गोंडस मूर्ती विटेवर उभी आहे. माझी अन्त:करणवृत्ती सतत त्याच्या आकाराची होऊन राहू दे. या विठ्ठलाखेरीज इतर सर्व जडजीवात्मक सृष्टी मायिक असून तिचे मला जराही आकर्षण नसावे. प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचे अधिकारपद सुद्धा दु:खाने भरलेले असल्याने तेथे माझे



मन अनवधानाने जाऊ देऊ नकोस. देवा, कर्म व धर्म यांचे वर्म माझ्या चांगलेच लक्षात आले असून ते दोन्ही नाशिवन्त आहेत' हा या अभंगाचा भावार्थ.

ब्रह्माची तटस्थलक्षण व स्वरूपलक्षण अशी दोन लक्षणे आहेत. समचरण व समदृष्टी या दोन संकल्पनांनी ती सांगितली आहेत. या दोन्हींच्या व्याख्यांविषयी काहीशी मतभिन्नता असली तरी साधकांच्या सोयीच्या व्याख्या करता येणे शक्य आहे. परंपरेनुसार सर्वज्ञ, सर्वसाक्षी, इ. ईश्वराच्या लक्षणांना तटस्थ लक्षणे म्हणतात. सत्, चित्, आनंद, अनादि, नित्य, इ. ब्रह्मलक्षणांना स्वरूपलक्षणे म्हणतात. तटस्थ या शब्दाचा अलिप्त असा अर्थ होतो. काठावर राहणारा असाही अर्थ सूचित होतो. परंतु 'दोन काठांचे मध्ये राहणारा' हा अर्थ देखील तितकाच चपखल व अधिक उपयुक्त आहे. पाण्याचा ओघ दोन काठांच्या किंवा तीरांच्या मध्ये सीमित झाला की त्या पाण्याला 'नदी' असे नवे नाव मिळते. त्या काठातून ते बाहेर पडून काठ दिसेनासे झाले की त्या नदीलाच व्यापक पाण्याचे मूळचे नाव मिळते. याच रीतीने मूळचे व्यापक ब्रह्म विठ्ठलाच्या मूर्तीमध्ये सीमित झाल्याने व्यापक ब्रह्माचा एक चरण व सीमित ब्रह्माचा एक चरण असे दोन्ही चरण समत्वाने असतात. श्रीविठ्ठल ब्रह्मरूपाने निर्गुण व मूर्तीचे रूपाने सगुण असून दोन्हींचे मूल्य साधकाचे दृष्टीने समान आहे. श्रीज्ञानदेव म्हणतात – '**सगुण निर्गुण गुणाचें अगुण। हरिवीण मन व्यर्थ जाय।।**' (हरिपाठ ३-२) सगुण व निर्गुण, गुणयुक्त व गुणरहित या सर्वांत हरी समानत्वाने असतो. श्रीसंत एकनाथ म्हणतात –

**माझे स्वरूप निजनिर्गुण। अथवा वैकुंठीचे सगुण।**
**दोन्ही निश्चयें एकचि जाण। सगुण निर्गुण समसाम्य।।**

'माझे मूळचे निर्गुणरूप किंवा वैकुंठनिवासी सगुणरूप ही दोन्ही नि:संशयपणे एकरूप आहेत.' वैकुंठातील विष्णू व रामकृष्णादी सगुण अवतार हे सर्वस्वी श्रद्धेवर निर्भर असून श्रीविठ्ठलाचाही त्यातच समावेश आहे. या श्रद्धेला भोळाभाव असे म्हणतात. भोळा या शब्दाचा बावळट असा अर्थ नसून 'शुष्क व व्यर्थ चिकित्सा न करता संतांचे शब्दांवर विसंबून राहिलेला' असा अर्थ होतो. तुकोबा म्हणतात, '**तुका म्हणे नाही भोळेपणावीण। जाणीव तो शीण होत असे।**'. जे दिसते ते नष्ट होते, जे व्यक्त असते ते स्थूल असते व जे मर्यादित असते ते दु:खरूप असते असे वेदान्ताचे सिद्धान्त असले तरी; आणि विठ्ठल त्याप्रमाणे

व्यक्त, आकाराने मर्यादित असला तरी तो ब्रह्मरूपच आहे या निश्चयाला भोळाभाव असे म्हणतात. या भोळ्या भावाला विठ्ठलच जबाबदार आहे असे तुकोबा विठ्ठलालाच बजावतात! अतिशय मर्मस्पर्शी भाषेत ते म्हणतात –

**तुमचा तुम्हीं केला गोवा आतां चुकविता देवा।**
**कैसें सरे चाळवणें केलें काशाला शाहाणें।**
**कासया हो रूपा नांवा आलेति गा बापा।**
**तुका म्हणे आतां न सरे हवाले घालितां।।** तु. गा. ६१५

'पुंडलिकासाठी अवतार घेऊन तुम्ही स्वत:च स्वत:ला अडकवून घेतले आहे. आता 'शरीर मिथ्या असल्यामुळे मी मिथ्या आहे' अशा शब्दात बोलून तुमची जबाबदारी तुम्हाला चुकविता येणार नाही! आता हे अशाप्रकारे माझ्या बुद्धीला चाळवून-फसवून तुम्हाला ते कसे बरे पचेल? असे फसवायचे होते तर मला तुम्ही ज्ञानसंपन्न केलेच का? विठ्ठलाचे रूप धरून विठ्ठलाच्या नामाने प्रगट झालातच कशाला? वेदान्ताचा हवाला देऊन 'मी निर्गुण, निराकार, निरवयव आहे' असे जर आता सांगाल तर ते खपण्यासारखे नाही!' प्रत्यक्ष देवाला पेचात पकडणारे तुकोबाराय धन्य होत! असे पेचात पडल्याने निर्गुण निराकार ब्रह्मसुद्धा 'मी सगुण साकार आहे' असा भोळा भाव विठ्ठलाच्या रूपाने धरून बसते! म्हणूनच महाराज म्हणतात – '**तुका म्हणे भोळा भाविक तो देव। म्हणोनिया पाव धरूनी ठेलो।।**' – 'तो देवही भोळाभाव धरून बसल्याने मी त्याचे पाय घट्ट धरून बसतो.' असा हा दोन भोळ्यांचा मनोज्ञ व भावपूर्ण संगम हे भक्तिशास्त्राचे व भक्तांचे वैभव आहे.

भोळा भाव धरून बसलेल्या तुकाराम महाराजांना भक्ताला असा भोळा भाव का धरून बसावे लागते त्याची अगदी परिपूर्ण कल्पना आहे. '**मन वाचातीत तुझे हे स्वरूप म्हणूनिया माप भक्ती केले।**', '**यन्मनसा न मनुते**' किंवा '**यतो वाचो निवर्तन्ते**' हे उपनिषदांचे तत्त्वज्ञान त्यांना चांगले अवगत आहे. यामुळेच आलंबनाची आवश्यकता असते आणि आलंबनासाठी व अन्त:करणवृत्ती स्थिर होण्यासाठी त्या तत्त्वाला सगुण साकार व्हावे लागते. असे भोळे भाविक तुकाराम महाराज विठ्ठलाचे खरे स्वरूप कसे आहे ते विठ्ठलालाच सांगण्यासाठी त्यालाच संतांचे समोर उभे करतात व अद्वैत दृष्टीने दोघांचे सामरस्य त्याला सांगतात!



**अमर तूं खरा नव्हे कैसा मी दातारा।**
**चाल जाऊं संतांपुढें वाद सांगेन निवाडे।**
**तुज नांव जरी नाहीं तरी माझें दाव काई।**
**तुज रूप जरी नाहीं तरी माझें दाव काई।**
**खेळसी तूं लीला तेथें मी काय वेगळा।**
**साच तूं लटिका तैसा मीहि म्हणे तुका।।** तु. गा. २२०५

'देवा, तू जर अज, अजर व अमर असशील तर मी तसाच कसा नसेन? चल, आपण दोघे संतांचे समोर उभे राहू, तेच याचा निवाडा करतील. तुला जर नाम व रूप नसेल तर मला कोठे आहे ते दाखव तरी! तू जर लीलाशरीर धरून खेळतोस तर मी तरी तुझ्याहून वेगळा कोठे आहे? तू निर्गुणरूपाने सत्य व सगुणरूपाने मिथ्या आहेस तर मीही तसाच आहे.' ही ज्ञानदृष्टी, अद्वैतबुद्धी, प्रेम व भोळाभाव यांच्या मीलनातून भक्ती सिद्ध होते.

'समचरण' हे तटस्थ लक्षण आहे तर 'समदृष्टी' हे स्वरूप लक्षण आहे. दोन्ही मिळून एक ब्रह्मवस्तूच सिद्ध होते. तटस्थलक्षण हे जड व जीव सापेक्ष असते. स्वरूपलक्षण अप्रत्यक्षपणे सापेक्ष आहे (येथे व्यावृत्तीचा विचार करता येतो.). ब्रह्म कसे आहे हे सरळ सरळ सांगण्याच्या पद्धतीला स्वरूपलक्षण म्हणता येईल. दृष्टी हा शब्द 'दृष्' धातूपासून झाला आहे. विठ्ठलाची दृष्टी पारमार्थिक दृष्टीने द्रष्टा-दृश्यभावरहित आहे. तरीही कल्पित, मायिक किंवा भासमय – भ्रमरूप दृश्यात व जीवरूप द्रष्ट्यात ती अधिष्ठानरूपाने समान आहे. म्हणून या ठिकाणी 'दृष्टी' या शब्दयोजनेचा आश्रयरहित व विषयरहित दृक् किंवा स्वरूपभूत ज्ञान असा अर्थ होतो. थोडक्यात, त्रिपुटीरहित ज्ञानाला येथे दृष्टी असे म्हटले आहे. मायावादाची सरणी नीट कळली तर जगत् हे अध्यस्त, ब्रह्म हे अधिष्ठान व द्रष्ट्याला होणारा जगताचा भास म्हणजे अध्यास. अध्यस्ताला अधिष्ठानाशिवाय अस्तित्वच नसते. द्रष्टा जीव हाही आत्म्यावर अध्यस्त असल्याने तोही अधिष्ठानावरच अस्तित्वासाठी अवलंबून असतो. त्यामुळे म्हटले तर द्रष्टा व दृश्य अध्यस्त आहेत व म्हटले तर अधिष्ठानरूप आहेत. अधिष्ठान सत्य असते आणि अध्यास व अध्यस्त भ्रमरूप असतात. तरीही अधिष्ठानाशिवाय म्हणजे सत्याशिवाय त्यांना स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व नसल्यामुळे अध्यास-अध्यस्त भासकाली सत्यच मानले

पाहिजेत. फरक इतकाच, तो भास त्रिकालाबाधित नसल्यामुळे त्याला अनिर्वचनीय म्हणावे लागते. म्हणूनच महाराज म्हणतात – '**साच तू लटिका। तैसा मीही म्हणे तुका।।**' अधिष्ठान रूपाने तू साच म्हणजे त्रिकालाबाधित आहेस तर अध्यस्त रूपाने तू अध्यासापुरता 'साच' व अध्यस्ताची निवृत्ती होताच 'लटिका' म्हणजे मिथ्या ठरतोस. मी सुद्धा तसाच म्हणजे आत्मरूपाने साच व देहरूपाने लटिका आहे. पण देहभासकाली अनिर्वचनीय आहे. अशा रीतीने 'समदृष्टी' हे स्वरूपलक्षण असे सांगते की विठ्ठल अधिष्ठान व अध्यस्तरूपाने समान आहे. श्रीविठ्ठलाची समदृष्टी, भाव व प्रेम हेच निकष समानतेने सर्व भक्तांना लावते. वर्ण, जात, लिंग, रूप, परिस्थिती या कशाचाही विचार करीत नाही. '**ये यथा माम् प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम्**' हा नियम सर्वांना समत्वाने लागू आहे.

पुरुष सूक्त म्हणते –'**स भूमि विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम्**' 'तो विठ्ठल पृथ्व्यादिकांना आतबाहेर व्यापून दहा बोटांइतक्या विटेवर भक्तानुग्रहार्थ पाय जोडून उभा आहे'. या विटेचा इतिहास मानवी जीवनाचा पाया घालून देणारा आहे. विठ्ठलाची प्रत्यक्ष उपासना न करता प्रत्यक्ष विठ्ठल समोर आणून उभा करण्याचे सामर्थ्य कोणते असते ते त्या इतिहासाने सांगितले आहे. त्या कर्तव्यपालनाच्या सामर्थ्याने तो इतिहास घडवला. मातापित्याच्या निष्ठावान सेवेच्या कर्तव्यपालनाची पुंडलिकाची गौरवगाथा श्रीविठ्ठलाचे रूपाने साकार झाली. त्याने भिरकावून दिलेल्या विटेवर साजिरा विठ्ठल अठ्ठावीस युगे उभा आहे. विठ्ठल विटेवर उभा आहे याचाच अर्थ असा की निष्काम कर्म–कर्तव्याच्या आधाराशिवाय त्याचे दर्शन होणे अशक्य आहे. जगद्‌गुरू तुकोबारायांनी केलेली अभंगरचना व साधकदशेचा ठेवलेला आदर्श हाच त्यांचा निष्काम कर्तव्ययोग होता. कारण याच कर्तव्यांसाठी त्यांची योजना झाली होती. त्यांनी आपले प्रापंचिक कर्तव्य पार पाडले नाही असे ज्यांना प्रामाणिकपणे वाटते त्यांनी हे लक्षात घ्यावे. थॉमस एडिसन, लो. टिळक इत्यादी वेगवेगळ्या क्षेत्रातील महापुरुषांनी प्रपंचाकडे दुर्लक्षच केले. त्यांची मात्र स्तुती होते व संतांची निंदा होते! याचे कारण एकच की संतांच्या कार्याचे महत्त्व सामान्य माणसाच्या लक्षातच येत नाही कारण तो त्यांच्या गरजेचा विषय नसतो. म्हणून प्रत्येक साधकाने आपापले कर्तव्य निष्काम बुद्धीने चोखपणाने



करणे अत्यावश्यक ठरते. पूर्ण ज्ञान, कौशल्य, सातत्य, निष्ठा व प्रामाणिकपणे केलेल्या कोणत्याही व कोणीही केलेल्या कर्माला नियोजित फळ मिळतेच मिळते. अपेक्षा किंवा अपेक्षाराहित्य या दोन्हींचा त्या फळावर काहीच परिणाम होत नाही. लोभ, अधीरता, आत्मविश्वासाचा अभाव, स्पर्धा, मत्सर इत्यादी कारणांनी ही अगदी सरळ सरळ असलेली वस्तुस्थिती लक्षात येत नाही. निष्कामतेमुळे माणसाच्या प्रगतीचे दरवाजे बंद होतात हा फार मोठा भ्रम आहे. प्रत्येकाने आपल्या गुणसंपदेमध्ये सतत वाढ करून प्रगतीची नवी नवी क्षितिजे अवश्य पार करावीत. परंतु ही प्रगती दुसऱ्याच्या तुलनेसाठी व त्याला मागे टाकण्याच्या ईर्षेनेच केली पाहिजे का? ती निरपेक्षपणे होणेच शक्य नाही का? ती स्वतंत्रपणे स्वत:चे ध्येय म्हणून साधण्यास काहीच हरकत नसावी. उलट तुलना, स्पर्धा व ईर्षेमुळे मिळालेल्या वैभवाचा आस्वाद घेणे अशक्य होऊन बसते! या पायी सर्व संबंधित होरपळून निघाल्याची जगात अनेक उदाहरणे आहेत.

श्रीमत् आद्यशंकराचार्यांनी आपल्या पांडुरंगाष्टकात विठ्ठलाला 'आनंदकंद' असे विशेषण दिले आहे. तुकाराम महाराज 'साजिरी' असे विशेषण विठ्ठलाच्या मूर्तीला देतात. शिल्पशास्त्राचे निकष वापरले तर ती मूर्ती फार सुंदर आहे असे म्हणता येणार नाही. पण सर्व संतांनी सुंदर, राजस, सुकुमार, सुखरूप, आनंदकंद इ. विशेषणे समानार्थाने वापरली आहेत. या विठ्ठलमूर्तीचा साजिरेपणा तिच्या निर्गुण स्वरूपाच्या आनंदात साठविलेला आहे. काही शास्त्रकारांनी सत्, चित्, आनंद, नित्य व पूर्ण अशी ब्रह्माची पाच तटस्थ लक्षणे मानली आहेत. लक्षणे करणारा, ज्याची लक्षणे केली तो व केलेली लक्षणे अशा त्रिपुटीतून हे सर्व लक्षण प्रकरण जन्माला आले आहे. माणसाला नित्याच्या जीवनात असत्, जड, दुःख, अनित्य व अपूर्ण यांचा सतत अनुभव येत असतो. त्याला माणसाचे खरे स्वरूप या अनुभवाच्या पूर्णपणे विरुद्ध आहे हे समजावून सांगण्यासाठी जी खुणेची लक्षणे केली आहेत त्यांना तटस्थ लक्षणे म्हणतात. लक्षणाच्या चिंतनाने विपरीत कल्पना दूर सरून (व्यावृत्ती) सत्याचा अनुभव येताच ते लक्षण अनुभवात मावळून जाते व निरर्थक होते म्हणून ते तटस्थलक्षण (एरवी ही लक्षणे 'स्वरूपलक्षणे' म्हणून प्रसिद्ध आहेत). अनर्थकारी दु:खादिकातून निरर्थक तटस्थ लक्षणांच्या साह्याने आत्मानुभूती घेऊन जीवनाचे सार्थक करता येते. '**रसो वै स:**' या श्रुतीने हा आनंद

सूचित केला असून तेच प्रत्येक साधकाचे समजून उमजून निश्चित केलेले ध्येय असले पाहिजे. या रसानुभूतीने सुखरूप होऊन सुखाने जगून सुखाने देह सोडण्यात चौथा पुरुषार्थ सामावलेला आहे. तुकोबा आव्हान देऊन विचारतात – **'सुखरूप ऐसें कोण दुजें सांगा। माझ्या पांडुरंगा सारिखें तें ।।'** (तु.गा. २३५५)

असा सुखरूप पांडुरंग साजिरा आहे व म्हणून त्याची मूर्ती साजिरी आहे. विठ्ठलाशी जेव्हा साधकाची अन्त:करणवृत्ती एकरूप होते, म्हणजे ती विठ्ठलाकार होऊन त्याच्यासारखीच सुखरूप होते तेव्हा चौथा पुरुषार्थ सिद्ध होतो या दृष्टीने अभंगाच्या पहिल्या चरणाच्या उत्तरार्धाकडे पाहावे लागेल.

**'तेथे माझी हरी वृत्ती राहो'** हा पहिल्या चरणाचा उत्तरार्ध साधनाची नेमकी दिशा दाखवतो. परमार्थ प्राप्तीचे खरे साधन अन्त:करणवृत्तीने करावयाचे असते. अन्य कशाने नाही. पातंजल योगदर्शन म्हणते – **'योगश्चित्तवृत्तिनिरोध:'** – म्हणजे अष्टांग योगाचे साधन अन्त:करण-वृत्तीनेच करावयाचे असते. आसनादी अंगे सहकारी आहेत. भक्तिदर्शन सांगते – **'मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय'** (गीता १२-८). भक्तियोगाची साधनाही अन्त:करणवृत्तीने करावयाची असते. श्रवण कीर्तनादी अंगे सहकारी आहेत. ज्ञानयोगाची युक्ती अशी आहे – **'दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभि:'** (कठ १-३-१२)– 'अतिसूक्ष्म बुद्धिवृत्तीने पाहणाऱ्यालाच आत्म्याचा अनुभव येतो'. साधनचतुष्टयसंपन्न अवस्था सहकारी आहे. कर्मयोग सांगतो – **'असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुष:'** (गीता ३-१९) – कर्मफलाची आसक्ती सोडण्याचे काम अन्त:करणाने करावयाचे असते. अनासक्ती त्यानेच सांभाळावयाची! नित्यनैमित्तिकादी सहकारी साधने ठरतात.

हा सर्व प्रमाणप्रपंच मांडण्याचा हेतू हा की ज्या साधनेमुळे आत्मानुभव येतो ती साधना कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये, बाह्य सामग्री किंवा प्राणाने करावयाची नसून अन्त:करणवृत्तीने करावयाची असते हे नीट लक्षात यावे. मन, बुद्धी, चित्त व अहंकार यांना मिळून सामान्यत: अन्त:करण असे नाव आहे. हे अन्त:करण गाढ झोपेत, बेशुद्धीत किंवा समाधीत सुप्त असते. झोपेतून जाग येण्याच्या क्षणी डोळे उघडताच जेव्हा पहिला पदार्थ दिसतो तेव्हा अन्त:करणाची सुप्तावस्था जाऊन



'वृत्ती' ही अवस्था निर्माण होते म्हणजे अन्त:करणाच्या मूळ स्थितीत बदल (परिणाम) होतो. अन्त:करणाच्या स्वरूपातील ज्ञान करून देणाऱ्या परिणामाला वृत्ती असे म्हणतात. पाच ज्ञानेंद्रिये व स्मृती इत्यादिकांचे चिंतन या निमित्ताने अन्त:करणवृत्ती जागी होते. ही वृत्ती ज्याच्या स्वाधीन असते म्हणजे जो तिच्यावर नियंत्रण ठेवू शकतो तो तिचा हवा तसा उपयोग करून घेऊ शकतो. व्यवहारामध्ये वृत्ती हा शब्द 'स्वभाव' अशा अर्थाने वापरला जातो. अमुक व्यक्ती वृत्तीने चांगली आहे असा प्रयोग त्याच अर्थाने होतो. परमार्थामध्ये वृत्ती या शब्दाला अगोदर सांगितलेला निश्चित (Specific) अर्थ आहे. 'माझी वृत्ती समचरण व समदृष्टी असलेल्या विठ्ठलावर खिळून राहो' असे महाराज विठ्ठलाकडेच मागणे मागतात. 'मी माझी वृत्ती स्वाधीन ठेवून ती विठ्ठलाच्या स्वरूपावर स्थिर करीन' असे म्हणण्यात जेवढा अहंकार आहे तोही भक्तिशास्त्राला मान्य नाही. प्रत्यक्षात ही कृती स्वत:च करावयाची असली तरी ती विठ्ठलाच्या इच्छेनेच होणे शक्य आहे हा भाव जपण्यात भक्तीचे वैभव आहे. वृत्ती व ज्ञेय एकरूप (एकदेशस्थित) झाले की ज्ञान होते. सगुणाच्या बाबतीत ही प्रक्रिया सोपी आहे व निर्गुणाचे बाबतीत कठीण आहे. **'सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती'** किंवा **'तुझे रूप चित्तीं राहो'** या महाराजांच्या विनवण्या विठ्ठलावर वृत्ती खिळून राहण्यासाठी केलेल्या आहेत.

वृत्ती सतत विठ्ठलाकार म्हणजे ध्येयाकार राहण्यासाठी बाकी जीवनातील कोणत्याही बाबीला ध्येयाचा दर्जा असता कामा नये. देहनिर्वाह व प्राप्त परिस्थितीनुसार काही कर्मे करावी लागतात. ती उत्कृष्ट करावयाची असतात. तरीही कोणत्याच भव्य, दिव्य किंवा उदात्त कर्माला ध्येयाचा दर्जा नसावा. कारण कर्ता, कर्म व कार्य ही त्रिपुटी मिथ्या आहे असा वेदान्ताचा अबाधित सिद्धान्त आहे. म्हणून कर्तृत्वाचा अभिमान, क्रियेतील कौशल्याचा अहंकार व फलप्राप्तीची घमेंड असता कामा नये. थोडक्यात आसक्ती नसावी. **'आणिक न लगे मायिक पदार्थ। तेथें माझें आर्त नको देवा ।।'** या भाषेत हा विचार मांडला आहे. 'विठ्ठल' हे सत्य असून इतर जाणवणारे सर्व काही मायिक-मिथ्या-भासमय-भ्रमरूप-मोहजन्य-कल्पित-अध्यस्त असल्याने त्यांचेविषयी इच्छा व आसक्ती नसावी. यासाठी वैराग्य – विवेकयुक्त वैराग्य – आवश्यक ठरते. आपले नियोजित कर्तव्यकर्म उत्कृष्ट रीतीने करीत असता त्याचे नियोजित फळ मिळतेच मिळते. त्या फळाकडे डोळे लावून

बसण्याची मुळीच गरज नसते. अमुक किंवा इतके फळ मिळावे अशी अपेक्षाही निरर्थक असते. कारण ते कोणाच्याच हातात नसते. असा कर्मफलत्याग ध्यानाहून श्रेष्ठ असतो असे श्रीकृष्णाचे सांगणे आहे (**ध्यानात् कर्मफलत्याग:**). '**तेथे माझे आर्त नको देवा**' या मागणीत 'आर्त' शब्दाने आसक्ती व आसक्तीमुळे लागणारी तळमळ सूचित होते. नित्याच्या व्यवहारासाठी मायिक पदार्थांची गरज सर्वांनाच असते. अगदी संन्याशाला सुद्धा कौपिन, कमंडलू, कांबळे व अन्नाची गरज असते. पूर्वकर्म, शिक्षण, कौशल्य, कष्ट, प्रयत्नांचे सातत्य व शहाणपणा या उत्तम प्रारब्धाच्या लक्षणांनुसार व्यावहारिक पदार्थ कमी अधिक मिळतात. ही लक्षणे प्रयत्नाने कोणालाही कमाविता येतात. प्रयत्नानेच तर प्रारब्ध घडते. जनक प्रारब्धाने सम्राट झाला. तुकाराम महाराज प्रारब्धाने श्रीमंताचे गरीब झाले. '**आणिक न लगे मायिक पदार्थ**' ही भूमिका मात्र दोघांचे ठिकाणी सारखीच होती! वरील उत्तम प्रारब्धाची लक्षणे संत तुकोबांनी परमार्थाच्या दिशेने वळविली. राजा जनकाला पूर्वकर्माने सम्राटपदाचे भोग असूनही तो श्रेष्ठ आध्यात्मिक अधिकारी झाला. भोगविलासांच्या साधनांबरोबरच सर्वांना सत्तेच्या पदांचे मोठे आकर्षण असते. सत्तेचे व्यसन मदिरेच्या व्यसनाहूनही जास्त भिनते. सामान्य व दरिद्री कुटुंबप्रमुख सुद्धा या पदाच्या नशेत असलेला दिसतो. परंतु अतिसामान्य सत्तेच्या पदापासून ब्रह्मदेवाच्या अलौकिक पदापर्यंत सर्व पदे दु:खमिश्रित आहेत. सत्तेची पदे व सत्ता असल्याशिवाय समाजजीवनाचा गाडा चालत नाही. परंतु सत्तेची नशा चढली की तिचे काय परिणाम होतात ते आज भारतात सर्वत्र दिसत आहे. 'भोगशून्य राजा' ही कल्पना आज व्यासपीठावरील भाषणातसुद्धा उल्लेखिली जात नाही! माझ्या खऱ्या हिताचा विचार न करणारे चित्त अशा एखाद्या पदाकडे आकर्षित होऊ नये म्हणून महाराज विठ्ठलाला विनंती करतात '**ब्रह्मादिक पदे दु:खाची शिराणी। तेथे दुश्चित झणीं जडो देशी**' त्यांच्या हक्काचे संतपद सुद्धा त्यांनी नाकारले होते!

हे दृश्य जग उत्पन्न झाले आहे. ते आज आहे व कालान्तराने नष्ट होणार आहे. त्यामुळे तत्त्वत: या जगात कोणाहीकडून जे जे घडेल ते सर्व नाश पावणार आहे. म्हणून वर्तमानात होणारे कर्तव्यकर्म करीत असता भविष्यात मिळणाऱ्या फळांवर आसक्ती ठेवणे अविचाराचे लक्षण आहे. कारण भविष्य प्रलयाकडे नेणारे आहे. हा निराशावादाचा सूर नसून वास्तवाचा विचार करून त्यानुसार आपली



मन:स्थिती घडविण्याचा विचार होय. जगामध्ये आपली जबाबदारी उत्कृष्ट रीतीने पार पाडीत असतांना आपल्या मनाचे स्वास्थ्य, समाधान व प्रसन्नता सांभाळण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. व्यथांचे उसासे, शोकाचे उमाळे, विरहाचे चटके, अपयशाचे सुस्कारे, दर्पाचे फूत्कार, असुरक्षितपणाची अस्वस्थता, दुसऱ्याच्या उत्कर्षाने होणारा जळफळाट व अपमानाच्या वेदना यांनी भरलेले जीवन दूर ठेवण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. कर्म, कर्मसापेक्ष धर्म व पापपुण्यसापेक्ष फळ अशी व्यवस्था लक्षात घेतली असता व ही तिन्ही अनित्य आहेत हे पटल्यावर त्यांच्या अनावश्यक चिंतनाची मुळीच जरूर नाही. हे वर्म लक्षात न आल्याने माणसाचे जीवन त्याच्या हातातून रोज निसटत जाऊन शेवटी संपून जाते. न्याय, नीती, धर्म व कर्तव्याने बंदिस्त आयुष्य जगत असतांना अनित्य जगाचा व्यवहारापुरता विचार सहजच होतो. मात्र अन्त:करणवृत्ती अनादि-नित्य विठ्ठलाचे ठिकाणी स्थिर राहिली पाहिजे. जीवन्मुक्ती हे जिचे स्वरूप आहे अशी पारमार्थिक स्थिती लाभून '**आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे।**' असा अनुभव येतो. कोणत्याही क्षेत्रात आपापले कर्म करणाऱ्याला हा अनुभव येऊ शकतो. तो त्याने घ्यावा असा संतांचा आग्रह असतो व तो कसा घ्यावा हे सांगण्यासाठी संतांचा अवतार असतो.

**असंगोऽसि निराकारो विश्वसाक्षी सुखी भव।।** १-५

"'तू'ला ब्रह्मचर्यादी आश्रम नाहीत, 'तू' डोळे इत्यादी ज्ञानेंद्रियांनी दिसत नाहीस, 'तू' असंग, निराकार व अनंत ब्रह्मांडाचा साक्षी आहेस हे लक्षात घेऊन तू सुखरूप हो." भगवान शंकराचार्यांचा ह्याच अर्थाचा श्लोक प्रसिद्ध आहे. सुखी (म्हणजे येथे सुखरूप) होण्याआड येणाऱ्या बाबींचा येथे विचार केला आहे. भेदरहित व निर्विशेष आत्मरूपाला वर्ण, आश्रम, इत्यादी विशेष असणे शक्य नाही. म्हणून त्यांचे अनुसंधान सोडून आत्मानुसंधानात राहावे. आत्मा स्वसंवेद्य असल्याने ज्ञानेंद्रियांनी त्याचे ज्ञान होत नाही. म्हणजे ज्ञानेंद्रियांनी कळणारा पदार्थ आत्मा असणार नाही. म्हणून त्या पदार्थाच्या चिंतनात न राहता स्वरूपचिंतनात राहावे. आत्मरूप तू एकमेव अद्वितीय असल्याने असंग असून रूपरहित व उत्पत्यादिरहित नाहीत. प्रगाढ श्रद्धेने त्यांच्या चरणी बसून श्रद्धेचा परमविकास करून घ्यावा. 'मी कर्ता असेन तर मी जे करतो त्याला मला हवे ते फळ मिळाले पाहिजे' हा तर्क

वापरला तर जीवनात अपयशाचे तडाखे सोसल्यावर 'मी कर्ता' हा भ्रम राहणे शक्य नाही. कर्तेपणा ईश्वराच्या प्रारब्ध ह्या व्यवस्थेकडे जातो. त्याची शरणागती पत्करून अकर्त्या आत्म्याच्या अनुसंधानात राहून सुखरूप व्हावे.

**एको विशुद्धबोधोऽहमिति निश्चयवन्हिना।**
**प्रज्वाल्याज्ञानगहनं वीतशोक: सुखी भव।।** १-९
**यत्र विश्वमिदं भाति कल्पितं रज्जुसर्पवत्।**
**आनंदपरमानंद: स बोधस्त्वं सुखं चर।।** १-१०

दोरीवर साप दिसावा त्याप्रमाणे हे जग कल्पनेने भासते. तो भास लक्षात घेऊन सुखरूप होऊन सुखाने जीवन जग.

मंद अंधारात दोरीऐवजी साप दिसतो. अज्ञानाच्या अंधारात ब्रह्माऐवजी जग भासते. हे भासणारे जग सत्य वाटले की त्या जगातील शब्द-स्पर्शादी विषयांची संगीतादी साधनेही सत्य वाटतात. ती सुखे आगमापायी असतात हे अनुभवूनही माणूस त्यांचा पाठलाग सोडीत नाही. जीव आत्मरूप असून आत्मा सुखरूप आहे हे न समजल्यामुळे जीव विषयांच्या पाठलागात व त्यांची साधने कमाविण्यात आयुष्य संपवतो. हे सर्व जाणत्याकडून नीट समजावून घेऊन ठसवून घ्यावे म्हणजे सुखरूप आत्मा मी आहे असा अनुभव येऊन जीवन आनंदमय बनते.

***



## सुखी भव

'सुखी भव' ह्या दोन शब्दांत सर्व जीवांच्या आशा-आकांक्षांचे सार आहे. त्यांच्या सर्व उलाढाली ह्याच दिशेने चालतात. सर्व व्यापांचा हाच उद्देश असतो. सर्व विचारांचा केंद्रबिंदू तोच असतो. हा आशीर्वाद मिळावा म्हणून सर्वांची धडपड असते. हा सुखी होण्याचा कार्यक्रम किती यशस्वी होतो, ते ज्याचे त्याला चांगलेच ठाऊक असते. 'आपण आहे त्यात सुखी आहोत' असे जगाला दाखविण्याचा सर्वजण प्रयत्न करतात. 'आहे त्यात' ह्या शब्दातच दु:ख दडलेले असते. कधी कधी दु:खाचा किंवा सुखाचा उद्रेक होतो. कधी तरी 'सुखी माणसाचा सदरा' घालावासा वाटतो. कधी तरी 'असा सदरा खरेच असेल का' अशीही शंका दाटून येते. 'आपल्यालाच तो का मिळत नाही' असे प्रत्येकालाच वाटते! ह्या परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न आजपर्यंत कितीतरी जणांकडून, कितीतरी प्रकारांनी केला गेला आहे व आजही केला जात आहे. सर्वच माणसांची ती निकडीची गरज आहे.

सुखी होण्याचा प्रयत्न हा व्यावहारिक, दैवी व पारमार्थिक अशा तीन प्रकारे करता येतो. व्यावहारिक प्रयत्न हे कष्ट, बुद्धी व दृश्य जगातील साधनसंपत्ती वापरून केले जातात. दैवी प्रयत्नांना दैवी कृपेची अपेक्षा असते. देवता, वेताळ, इ. प्रसन्न व्हावेत असे वाटते. पारमार्थिक प्रयत्नांना ईशकृपा, गुरुकृपा, अधिकार व तत्त्वज्ञानपूर्वक विचार यांची गरज आहे. भारतीय मनोरचनेचा विचार केला असता पहिल्या दोन प्रयत्नांच्या थोड्या फार मदतीने सुखी होण्याचा प्रयत्न केला जातो; परंतु वेदान्तशास्त्राच्या यथार्थ चिंतनाने तिसऱ्या प्रकारामुळे केवळ सुखी न होता 'सुखरूपता' येते. हे साधन करणारे क्वचित कोणी असतात. अष्टावक्र गीतेमध्ये 'सुखी भव' हा आशीर्वाद देऊन त्यासाठी काय करावे लागते ते सांगितले आहे.

**न त्वं विप्रादिको वर्णो नाश्रमी नाक्षगोचर:।**
**असंगोऽसि निराकारो विश्वसाक्षी सुखी भव।।** १-५

''तू'ला ब्रह्मचर्यादी आश्रम नाहीत, 'तू' डोळे इत्यादी ज्ञानेंद्रियांनी दिसत नाहीस, 'तू' असंग, निराकार व अनंत ब्रह्मांडाचा साक्षी आहेस हे लक्षात घेऊन तू सुखरूप हो.'' भगवान शंकराचार्यांचा ह्याच अर्थाचा श्लोक प्रसिद्ध आहे. सुखी (म्हणजे येथे सुखरूप) होण्याआड येणाऱ्या बाबींचा येथे विचार केला आहे. भेदरहित व निर्विशेष आत्मरूपाला वर्ण, आश्रम, इत्यादी विशेष असणे शक्य नाही. म्हणून त्यांचे अनुसंधान सोडून आत्मानुसंधानात राहावे. आत्मा स्वसंवेद्य असल्याने ज्ञानेंद्रियांनी त्याचे ज्ञान होत

नाही. म्हणजे ज्ञानेंद्रियांनी कळणारा पदार्थ आत्मा असणार नाही. म्हणून त्या पदार्थाच्या चिंतनात न राहता स्वरूपचिंतनात राहावे. आत्मरूप तू एकमेव अद्वितीय असल्याने असंग असून रूपरहित व उत्पत्यादिरहित असल्याने निर्विकार आहेस. हे सर्व दृश्य विश्व तुझ्या स्वरूपावर भासत असल्याने तू त्याचा केवळ साक्षी आहेस. त्याच्या उत्पत्ती, स्थिती व लयाशी तुझा संबंध नाही, हे सर्व लक्षात घे. तू सत्‌चित् व आनंदरूप आत्मा आहेस, हे समजावून घेऊन तू सुखरूप हो.

**यदि देहं पृथक्कृत्य चिति विश्राम्य तिष्ठसि।**
**अधुनैव सुखी शान्तो बन्धमुक्तो भविष्यसि।।** १-४

'शरीराला 'स्व'पासून वेगळे करून जर तू स्वस्थचित्त झालास तर देहबंधनातून सुटून तू स्वरूपत्वाने शांत होशील'. 'मी देह आहे' हे फार मोठे बंधन आहे. बंधनातील जीव सुखी होत नाही. पंचदशी ग्रंथामधील पंचकोशांच्या यथार्थ चिंतनाने पंचकोशरूप देह मी नसून त्यांचा प्रकाशक आत्मा मी आहे, असा अनुभव येतो. हा अनुभव चित्तामध्ये स्थिर होऊन ते आत्मचिंतनात रमले असतांना त्याला शांतिरूप सुखाचा अनुभव येतो.

**अहं कर्तेत्यहंमानमहाकृष्णाहिदंशित:।**
**नाहं कर्तेति विश्वासामृतं पीत्वा सुखी भव।।** १-८

''मी कर्ता आहे' हा अहंकाररूप मोठा काळा सर्प तुला चावला आहे. 'मी कर्ता नाही' अशी श्रद्धा दृढपणे सांभाळून त्या श्रद्धेच्या अमृतपानाने सुखरूप हो''.

जीव कर्ता, ईश्वर करविता व आत्मा अकर्ता आहे. हा विचार सातत्याने सांभाळला तर कर्तृत्व ईश्वराचे असल्याने जीवाने त्याचा अहंकार धरू नये हे लक्षात येते. '**त्वमेव प्रत्यक्षं कर्तासि**' अशी ईश्वररूप श्रीगजाननाची स्तुती लक्षात ठेवावी. अकर्ता असलेला आत्मा 'मी' आहे, असा अभ्यास करावा. कर्तृत्वाचा अहंकार जीवाला कर्माच्या चक्रात गुंतवून ठेवतो. म्हणून त्याने पुन:पुन्हा एकमेव अद्वितीय विमल आत्मा 'मी' म्हणून जाणून घ्यावा. असा निश्चयरूप अग्नी पेटवून, प्रगाढ अज्ञान दूर करून शोकरहित होऊन तू सुखरूप हो.

आत्मा एकमेव अद्वितीय आहे. त्यामुळे 'मी' असा वेगळा कोणी असणे शक्य नाही. म्हणून तोच मी आहे असा निश्चय सांभाळावा. ह्याच पद्धतीने त्याचे ज्ञान होते. ह्या निश्चयाचा जणू अग्नी धडाडला म्हणजे आत्म्याच्या अज्ञानाचा मागमूस राहत नाही. आत्म्यावाचून जडचेतनात्मक भिन्न भासणारी सृष्टी बाधित होते. ही सृष्टी सत्य समजल्यामुळेच त्यात घडलेल्या व आगामी घटनांचा शोक होतो. ती बाधित झाली म्हणजे शोक जाऊन सुखरूपता येते.



काय करू नये ह्याबरोबरच काय करावे ह्याचेही मार्गदर्शन अष्टावक्र ऋषींनी केले आहे. अहंकाराचा त्याग म्हणजे आत्मज्ञान असे समीकरण नाही. त्या त्यागानंतर स्वरूपाची ओळख व स्वरूपानुभव येऊन कल्पित अज्ञानाचा नाश व्हावा लागतो. मरणाला काळसर्प म्हटले आहे. प्रत्येक अज्ञानी जीवाला हा काळसर्प योग असतोच. त्याचे पारिपत्य त्रंबकेश्वराला जाऊन श्रीनिवृत्तिनाथांकडून करून घ्यावे. श्रीसंत सेनामहाराजांकडून हजामत करून घ्यावी. त्यासाठी पैसे द्यावे लागत नाहीत. प्रगाढ श्रद्धेने त्यांच्या चरणी बसून श्रद्धेचा परमविकास करून घ्यावा. 'मी कर्ता असेन तर मी जे करतो त्याला मला हवे ते फळ मिळाले पाहिजे' हा तर्क वापरला तर जीवनात अपयशाचे तडाखे सोसल्यावर 'मी कर्ता' हा भ्रम राहणे शक्य नाही. कर्तेपणा ईश्वराच्या प्रारब्ध ह्या व्यवस्थेकडे जातो. त्याची शरणागती पत्करून अकर्त्या आत्म्याच्या अनुसंधानात राहून सुखरूप व्हावे.

**एको विशुद्धबोधोऽहमिति निश्चयवन्हिना।**
**प्रज्वाल्याज्ञानगहनं वीतशोक: सुखी भव।।** १-९
**यत्र विश्वमिदं भाति कल्पितं रज्जुसर्पवत्।**
**आनंदपरमानंद: स बोधस्त्वं सुखं चर।।** १-१०

दोरीवर साप दिसावा त्याप्रमाणे हे जग कल्पनेने भासते. तो भास लक्षात घेऊन सुखरूप होऊन सुखाने जीवन जग.

मंद अंधारात दोरीऐवजी साप दिसतो. अज्ञानाच्या अंधारात ब्रह्माऐवजी जग भासते. हे भासणारे जग सत्य वाटले की त्या जगातील शब्द-स्पर्शादी विषयांची संगीतादी साधनेही सत्य वाटतात. ती सुखे आगमापायी असतात हे अनुभवूनही माणूस त्याचा पाठलाग सोडीत नाही. जीव आत्मरूप असून आत्मा सुखरूप आहे हे न समजल्यामुळे जीव विषयांच्या पाठलागात व त्यांची साधने कमाविण्यात आयुष्य संपवतो. हे सर्व जाणत्याकडून नीट समजावून घेऊन ठसवून घ्यावे म्हणजे सुखरूप आत्मा मी आहे असा अनुभव येऊन जीवन आनंदमय बनते.

***